**(सभापतीरस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)**

**सभागृहाच्या कामकाजाबाबत**

**तालिका सभापती** : आज बुधवार, दिनांक 11.4.2012 रोजी सकाळी 10.30 वाजता महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्याचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे. तेव्हा सभागृहाची बैठक सकाळी 10.20 वाजता स्थगित होऊन 10.40 वाजता पुन्हा भरेल.

श्रीमती शोभा फडणवीस : काल सभागृहामध्ये असे सांगण्यात आले की, दुष्काळावरील चर्चेसाठी मंत्र्यांच्या उत्तरासह सकाळी 10.00 ते दुपारी 12.30 वाजेपर्यन्त वेळ देण्यात येईल. आता ही वेळ 11.45 पर्यन्त कमी करण्यात आलेली आहे. पुन्हा सकाळी 10.20 ते 10.40 पर्यन्त सभागृहाची बैठक स्थगित करण्यात येणार आहे. मग दुष्काळावरील चर्चेसाठी वेळ वाढवून देण्यात येणार आहे काय ? सकाळी 10.00 वाजता सभागृहामध्ये येऊन प्रतीक्षा करण्याची आम्हाला काय गरज होती ? एक तर विदर्भावर शासनाकडून सातत्याने अन्याय होत आहे, निदान सभागृहामध्ये तरी विदर्भावर अन्याय होऊ देऊ नका, आम्हाला बोलण्याची संधी द्या.

श्री. विनायक मेटे : काल नियम 97 अन्वये दुष्काळाच्या प्रश्नावर या सभागृहामध्ये चर्चा सुरु झाली. ती चर्चा काल अपूर्ण राहिली. खरे म्हणजे काल अधिक वेळ बसून या चर्चेला उत्तर देण्याची माननीय मंत्री महोदयांची तयारी होती. दुष्काळाच्या प्रश्नावर अनेक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची इच्छा आहे. सरकारची देखील सन्माननीय सदस्यांच्या सूचना स्वीकारण्याची तयारी आहे. वर्तमानपत्रामधून दुष्काळाच्या प्रश्नाची चिरफाड कशी करण्यात आली यासंबंधीच्या बातम्या प्रसिध्द झालेल्या आहेत. माझी विनंती आहे की या दुष्काळाच्या चर्चेला वेळेचे बंधन घालू नका. आवश्यकता असेल तर मंत्र्यांचे उत्तर दुपारच्या सत्रात ठेवावे.

**तालिका सभापती** : सभागृहाची बैठक सकाळी 10.20 वाजता स्थगित न करता चर्चा चालू ठेवायची काय ?

डॉ. नीलम गो-हे : कार्यक्रम जसा ठरलेला आहे त्याप्रमाणे तो करु. आवश्यकता असेल तर चर्चेसाठी वेळ वाढवून द्यावी.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती** : महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंती निमित्त त्यांच्या पुतळयाला पुष्पहार अर्पण करण्याच्या कार्यक्रमासाठी सभागृहाची बैठक सकाळी 10.20 ऐवजी 10.25 वाजता स्थगित करण्यात येईल आणि 10.35 वाजता सभागृहाची बैठक पुन्हा भरेल. सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गो-हे यांनी दुष्काळाच्या प्रश्नावरील चर्चेला सुरुवात करावी.

--

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती

**मु.शी.**: राज्यात निर्माण झालेली दुष्काळी परिस्थिती या विषयावर
सर्वश्री विनोद तावडे,दिवाकर रावते,पांडुरंग फुंडकर,
रामदास कदम,जयंत प्र.पाटील,संजय केळकर,डॉ.दीपक सावंत,
सर्वश्री प्रीतमकुमार शेगावकर,चंद्रकांत पाटील,डॉ.नीलम गोऱ्हे,
श्रीमती शोभा फडणवीस,सर्वश्री परशुराम उपरकर,केशवराव
मानकर,रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल व डॉ.रणजित पाटील,
वि.स.स.यांनी उपस्थित केलेली अल्पकालीन चर्चा.

(चर्चा पुढे सुरु

डॉ. नीलम गो-हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या दुष्काळासंबंधीच्या चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी उभी आहे.

सभापती महोदय, आज राज्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली असल्यामुळे महाराष्ट्रातील संपूर्ण जनतेचे लक्ष या सभागृहाकडे लागलेले आहे. 20 एप्रिल रोजी हे अर्थसंकल्पीय अधिवेशन संपणार आहे. खरीप हंगामाची 6201 आणि रब्बी हंगामाची 1552 गावे टंचाईग्रस्त असल्याच्या संदर्भात शासनाने अनेक जी.आर.काढलेले आहेत. या चर्चेच्या निमित्ताने मला प्रामुख्याने तीन महत्वाच्या मुद्यांकडे शासनाचे लक्ष वेधायचे आहे. ग्लोबल वॉर्मिंगमुळे तापमानामध्ये होणारा बदल, पर्जन्यमानात, ऋतुचक्रात होणारे बदल, वाढणारी थंडी यासंबंधीची चर्चा या सभागृहामध्ये अनेक वेळा झालेली आहे. एकूणच तापमान वाढल्यामुळे जगामध्ये अनेक ठिकाणी आलेले पूर .....

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

आणि त्यामुळे पाण्याच्या नियोजनामध्ये निर्माण झालेला असमतोल याचा देखील विचार झाला पाहिजे. ग्लोबल वॉर्मिंगच्या संदर्भात राज्य शासनाने सभागृहात दिलेले उत्तर लक्षात घेता आम्ही या प्रश्नाचा गांभीर्याने विचार करतो आहोत का? चर्चेच्या वेळी आपल्यापैकी अनेक माननीय सदस्य सभागृहात उपस्थित होते. परंतु प्रत्यक्षात संपूर्ण यंत्रणेमध्ये बदल करण्यासाठी कोणती पावले उचलली, त्या दृष्टीने विचार झाला की नाही याचे उत्तर शोधण्याची गरज आहे.

सभापती महोदय, पाऊस झाल्यानंतर यंदा पाण्याची टंचाई होणार नाही अशा प्रकारची विधाने वारंवार सरकारकडून आणि हवामान तज्ज्ञांकडूनही केली गेली होती. असे असताना आपण पाण्याचे नियोजन न केल्यामुळे हा दुष्काळ निसर्गनिर्मित आहे असे म्हणण्यापेक्षा तो मानवनिर्मित आहे असे म्हणावे लागेल. प्रशासनामधील नियोजनाच्या अभावामुळे मानवनिर्मित दुष्काळ निर्माण झालेला आहे. या प्रश्नाचा राजकारणापलीकडे जाऊन विचार झाला पाहिजे आणि त्यावरील उत्तर शोधले पाहिजे.

सभापती महोदय, ग्लोबल वॉर्मिंगबद्दल आपण चर्चा करतो. पुन्हा पाऊस सुरु झाला की त्याबद्दल काही बोलत नाही. पर्यावरणाबाबत जी दूरगामी पावले उचलली पाहिजेत ती उचलली जात नाहीत. त्या संदर्भात राज्य पातळीवर कृती आराखडा तयार केला पाहिजे. केंद्र शासनाने याबद्दल ज्या काही सूचना दिलेल्या आहेत त्यांची काटेकोर अंमलबजावणी केली पाहिजे. या दुष्काळाच्या संदर्भात बरीच चर्चा सुरु झाली आहे. केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी पश्चिम महाराष्ट्रात पहिल्यांदा माढा लोकसभा मतदारसंघातील पाणी टंचाईबद्दल भाष्य केले त्यानंतर राज्यात पाणी टंचाईच्या विषयावर चर्चा सुरु झाली. दिनांक 15 मार्च, 2012 पासून विधिमंडळाचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरु झाले. आज पुण्यासारख्या शहरात पाणी टंचाई जाणवते आहे. अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यात सभागृहात या विषयावर चर्चा झाली होती. अशा वेळेला महाराष्ट्राच्या काही भागात पाण्याची टंचाई आहे याची जाणीव राज्य सरकारला असून सुध्दा माढा लोकसभा मतदारसंघातील पाणी टंचाईची चर्चा सुरु झाली नाही तोपर्यंत राज्य सरकारने त्या भागाकडे लक्ष दिले असे चित्र दिसत नव्हते.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे.......

सभापती महोदय, काल सर्वपक्षीय पश्चिम महाराष्ट्रातील आमदारांनी माननीय राज्यपालांची भेट घेऊन मागणी केली की, पश्चिम महाराष्ट्राला पॅकेज दिले पाहिजे. विदर्भ आणि मराठवाड्यातही तीच परिस्थिती आहे. तेथील अनुशेषाच्या प्रश्नावर जे पॅकेज वापरले गेले त्यामुळे कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचा निधी कमी झाला असा दावा सरकार करीत आहे. विदर्भ आणि मराठवाड्याविरुध्द पश्चिम महाराष्ट्र असा राजकीय वाद निर्माण झाला आहे. अनुशेष आणि विकासापासून वंचित असणाऱ्या भागांचा विचार करताना जिल्हा हा घटक धरण्यात आला. परंतु जे दुष्काळी तालुके आहेत, वर्षानुवर्षे जे दुष्काळाचा सामना करीत आहेत ते तालुके विकासापासून वंचित राहिले आहेत. म्हणून निकष बदलणार नसतील तर जे वंचित तालुके आहेत त्यांना दुष्काळाबाबत कशा प्रकारे मदत द्यायची हे आपल्यासमोर आव्हान आहे. काही भागांवर जास्त अन्याय होतो. राजकीयदृष्ट्या ज्यांचे वर्चस्व आहे ते जास्त निधी घेत आहेत. हे खरे असले तरी पाणी टंचाईमुळे जे शेतकरी आपल्या अधिकारापासून वंचित आहेत त्यांचा विचार प्राथम्याने झाला पाहिजे. पुन्हा पॅकेजपुरता विचार झाला तर त्यामध्ये कोणकोणत्या भागाचा समावेश होणार आहे?

सभापती महोदय, मला पी.साईनाथ यांचे "दुष्काळ आवडे सर्वांना" हे पुस्तक आठवते. त्या पुस्तकामध्ये त्यांनी हेच मांडले आहे की, दुष्काळाच्या निमित्ताने ज्या वस्तूंची खरेदी केली जाते, जी कामे दाखविली जातात त्या माध्यमातून वेगवेगळया पध्दतीने भ्रष्टाचार झालेला दिसतो. म्हणून पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळाचा विचार होत असताना कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महांडळाचे कामकाज किती असमाधानकारक झाले याबद्दलची चर्चा आणि विचारविनिमय करण्यासाठी राजकीय इच्छाशक्ती दिसून आली पाहिजे. कृष्णा खोरे पाटबंधारे विकास महामंडळाचा विचार केला तर 8615 कोटी रुपयांची कामे झाली. 1800 कोटी रुपयांनी अंदाजित खर्च वाढला आहे. निर्माण झालेली सिंचन क्षमता मात्र अपेक्षेपेक्षा कमी आहे. सिंचन क्षेत्र 2,34,181 हेक्टर आहे. 1996 मध्ये 190 प्रकल्पांचे नियोजन केले होते. 16 वर्षे होऊनही कामे अपूर्ण आहेत.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले..... 10:10

डॉ. नीलम गोऱ्हे........

भ्रष्टाचार त्याच बरोबर अयोग्य नियोजन याचाही विचार केला पाहिजे. महामंडळाने 11 उपसा सिंचन योजनांच्या माध्यमातून 1 लाख 10 हजार हेक्टर सिंचन क्षमता निर्माण करण्याचे नियोजन केले आहे. त्यातून 7 योजनांवर 503.54 कोटी एवढा खर्च झाला पण एकही हेक्टर जमीन ओलिताखाली आली नाही म्हणून या सर्व योजनांच्या माध्यमातून 2.16 हेक्टर एवढेच सिंचन क्षेत्र तयार झाले आहे.

याबाबतची परिस्थिती मंत्री महोदय सांगतीलच पण मी त्या निमित्ताने सांगू इच्छिते की, अधिवेशन चालू असताना पुण्यात यशदा येथे बैठक होते पण त्या बैठकीसाठी मला वाटत नाही की, एका तरी विधानसभा आणि विधान परिषदेच्या आमदाराला बोलावले असेल. आमचे म्हणणे असे आहे की, जरी प्रत्येक सदस्याला बोलाविणे शक्य नसले तरी किमान विरोधी पक्षाला विश्वासात घेऊन काही निर्णय घेतले पाहिजेत. माननीय राज्यपालांकडे शासन बैठक झाली पण विरोधी पक्षाला विश्वासात घेतले जात नाही आणि स्वत: सर्व प्रकारचे नियोजन करुन जमेल तेवढ्या विरोधी पक्षाने केलेल्या सूचना स्वीकारणे हीच या राज्याची, यशवंतराव चव्हाण आणि वसंतराव नाईक यांची परंपरा आहे काय हा भाग महत्वाचा आहे. मग विरोधी पक्षाला बैठकीला बोलाविले नाही म्हणून तोडमोड केली तरी टीका होते पण पुण्यात बैठक घेऊन सुध्दा विरोधी पक्षाला त्या बैठकीसाठी बोलाविले जात नाही, किंवा गट नेत्यांनाही त्याची कल्पना दिली जात नाही, माननीय राज्यपालांकडे बैठक घेतली जाते आणि विरोधी पक्षाला आमंत्रित केले जात नाही. अशा प्रकारे प्रत्येक गोष्टीचे श्रेय शासनानेच घ्यावयाचे ही कार्य पध्दती या शासनाची आहे. त्याचा परिणाम असा होतो की, तालुका पातळीवर मग यांना विचारणारे कोणीच राहत नाही. केवळ "होयबा" लोकांना विश्वासात घेऊन सर्व कामाचे श्रेय घेणार असाल आणि खोटी कागदपत्रे घेऊन काम करणार असाल तर ते योग्य नाही.

महोदय, आजही राज्यात रोजगार हमी योजनेच्या बाबतीत अशी परिस्थिती दिसून येते की, अनेक ठिकाणी जेसीबीद्वारे कामे केली जातात. ही कामे करणाऱ्या कंत्राटदारांवर तहसीलदारांचा वचक नसतो पण ज्या जिल्हाधिकाऱ्याकडून अशा कामांचे नियोजन झाले पाहिजे त्यांच्याकडून देखील काहीच कारवाई होत नाही. या निमित्ताने आमची मागणी अशी आहे की, अशा सर्व प्रकरणांची सीआयडी मार्फत चौकशी करावी. त्याचे कारण म्हणजे रोजगार हमी मध्ये जे घोटाळे

....2

डॉ. नीलम गोऱ्हे.....

उघडकीस आले त्यातून पुढे काहीच निष्पन्न झाले नाही किंवा कोणत्याही अधिकाऱ्यावर कारवाई सुध्दा झाल्याचे दिसत नाही. उदाहरण द्यावयाचे झाले तर सोलापूर येथे रोजगार हमी योजनेत जो घोटाळा झाला त्यात एकही माणूस दोषी सापडला नाही. नंतर त्याच प्रकरणात आत्महत्या व खून सुध्दा झाल्याचे आपण ऐकले आणि हे संपूर्ण प्रकरण दुसरीकडे वर्ग करण्यात आले.

महोदय, रोजगार हमी योजनेच्या संदर्भात चौकशी करण्यासाठी वेगवेगळ्या समित्यांची स्थापना शासनाने केली पण त्यांनी दिलेल्या अहवालानुसार अंमलबजावणी मात्र झाली नाही. तर दुसरीकडे राज्यात पिण्याचे पाणी पुरविण्यासाठी टँकरचा वापर होतो. टँकरमधून पाणी घेण्यासाठी लोकांमध्ये झुंबड उडते, मारामाऱ्या होतात, मग अशा परिस्थितीत पाण्याचे वाटप कशा पध्दतीने करणार याचा खुलासा झाला पाहिजे. तसेच काही गावांमध्ये मोठमोठ्या टाक्या बांधलेल्या आहेत. गावात टँकर आल्यानंतर त्या टाक्यांमध्ये पाणी ओतून टाकीच्या नळाच्या माध्यमातून हे पाणी वाटप होत असते, ही पध्दत योग्य आहे. त्यानंतरचा मुद्दा म्हणजे धरणात गाळ साचल्याने आणि तो साफ न केल्याने त्या धरणाची साठवण क्षमता कमी झालेली असते त्यामुळे पाणी सोडून द्यावे लागते. त्याचा परिणाम म्हणून पुराचा सामनाही करावा लागतो.

कालच मी रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या संदर्भात सभागृहात मुद्दा उपस्थित केला होता. प्रत्यक्षात मजूर कामावर नसताना तेच काम सुरु असल्याचे दाखविण्यात आले. त्याचप्रमाणे सांगली जिल्ह्यात हिंगणगाव या गावातील परिस्थितीबाबत श्री. शिवाजी शिंदे यांनी मंत्री महोदयांना निवेदन सुध्दा पाठविलेले आहे. या गावात रोजगार हमी योजनेचे काम 2 मार्च, 2012 पासून जेसीबीच्या माध्यमातून सुरु झाले आहे. या संपूर्ण कामाची चौकशी झाली पाहिजे. त्यानंतर हा दुष्काळ मानव निर्मित असून या मानव निर्मित संकटाच्या संदर्भात पर्याय म्हणून कृत्रिम पावसाबाबत शासनाचे काय प्रयत्न सुरु आहेत याचाही खुलासा होणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे टँकरबाबतची मागणी लोकांनी नक्की कोणाकडे करावयाची याबाबत शासनाची भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. जालना शहरात महिन्यातून फक्त दोन दिवस पाण्याचा पुरवठा होतो अशा शहरांबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे, पश्चिम महाराष्ट्राचा विचार करीत असताना , जेथे फक्त दोनच दिवस पाणी पुरवठा केला जातो त्यामुळे लोक स्थलांतर करण्याच्या मार्गावर आहेत

....3



PFK/ D/ KTG/ पूर्वी श्री. भोगले..... 10:10

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे.....

अशा शहरांचा विचार शासन काय करणार आहे, सन 1972 च्या दुष्काळात "महाराष्ट्र टाईम्स" या दैनिकात बातमी प्रसिध्द झाली होती की मुंबईत एक लाख मंगळसूत्रे विकली गेली होती, अशीच परिस्थिती या वर्षी देखील येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. अशा प्रकारे स्थलांतरित होणाऱ्या लोकांच्या कुटुंबीयांवर जी परिस्थिती येते ती शब्दाने वर्णन करण्यासारखी नाही म्हणून ग्रामीण भागातून शहरात जे लोक स्थलांतरित होतील.......

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे ....

त्या लोकांना कशा पध्दतीने सामावून घेतले जाणार आहे याबाबत विचार होणे आवश्यक आहे. रोजगार हमी योजनेचे काम, पिण्याच्या पाण्याच्या योजना तसेच कृत्रिम पावसाच्या संदर्भात जे जे कोणी भ्रष्टाचार करतील त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता असून विरोधी पक्षांना विश्वासात घेतल्याचे नाटक न करता विरोधी पक्षांना खऱ्या अर्थाने विश्वासात घेऊन मूल्य मापन झाले तर निश्चितपणे लोकशाही मजबूत होईल एवढे मी या ठिकाणी सांगते व माझे दोन शब्द पूर्ण करते.

धन्यवाद.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपकराव साळुंखे (सोलापूर स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, दुष्काळाच्या संदर्भात उपस्थित करण्यात आलेल्या अल्पकालीन चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. दुष्काळाच्या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी विनंती वजा सूचना केल्या असून मी देखील दुष्काळी भागाचा आमदार म्हणून काही सूचना करु इच्छितो.

महाराष्ट्रात मुख्यत्वे ओला दुष्काळ व कोरडा दुष्काळ पडत असतो. ओल्या दुष्काळात किमान जनावरांना चारा तरी मिळतो म्हणून ओला दुष्काळ आपल्याला काही अंशी परवडणारा असतो. परंतु कोरडया दुष्काळाने आज महाराष्ट्रात मोठया प्रमाणात थैमान घातलेले आहे. दुष्काळी भागातील 14-15 आमदारांनी काल माननीय राज्यपाल महोदयांची भेट घेतली होती. पश्चिम महाराष्ट्रावरच अन्याय होतो असे आम्हाला वाटत नाही तर महाराष्ट्रातील सर्व दुष्काळी भागांना शासनाने मदत करण्याची आवश्यकता आहे असे आम्हाला वाटते. महाराष्ट्रातील सर्व दुष्काळी भागांना मदत करण्याची भूमिका राज्य शासनाने घेतलेली आहे. तसेच दुष्काळाच्या संदर्भात राज्य शासनाने मागील आठ दिवसात निर्णय घेतलेले आहेत परंतु यामध्ये काही त्रुटी राहिलेल्या आहेत.

गेल्या 50 वर्षाचा आढावा घेतला तर आपल्याला दिसून येईल की, पश्चिम महाराष्ट्रातील 35 तालुक्यांमध्ये सातत्याने कोरडा दुष्काळ पडत आहे. गेल्या 50 वर्षाच्या काळात शासनाने दुष्काळावर जेवढे पैसे खर्च केले तेच पैसे पाणी पुरवठयाच्या योजनांवर खर्च केले असते तर टेंभू, म्हैसाळ व उरमोडी धरणे पूर्ण झाली असती. या धरणांची कामे पूर्ण झाली असती तर कितीही मोठा दुष्काळ पडला असता तरी या भागातील लोकांना अडचणीचा सामना करावा लागला नसता. टेंभू, म्हैसाळ व उरमोडी या धरणांचे पाणी दुष्काळी पट्टयाला मिळणार आहे. त्यामुळे मी आपल्यामार्फत शासनाला विनंती करणार आहे की, दुष्काळाच्या संदर्भात संपूर्ण राज्याचा आढावा घेत असतांना पश्चिम महाराष्ट्रातील टेंभू, म्हैसाळ व उरमोडी या धरणाच्या कामांना प्रायोरिटी दिली तर या भागातील दुष्काळ कायमचा संपेल. टेंभू, म्हैसाळ व उरमोडी या धरणापैकी दोन योजना एआयबीपीमध्ये समाविष्ट झालेल्या आहेत. दर दोन तीन वर्षानंतर पडणा-या दुष्कळासाठी शासन कोटयावधी रुपये खर्च करीत असते परंतु या दरम्यानच्या काळात टेंभू, म्हैसाळ व उरमोडी हे प्रकल्प पूर्ण करण्याचा प्रयत्न केला तर निश्चितपणे या भागातील दुष्काळ कायमचा मिटू शकेल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दीपकराव साळुंखे....

सभापती महोदय, दुष्काळाला तोंड देता यावे यासाठी शासनाने चारा डेपो सुरु केलेले आहेत. चाऱ्यासाठी शासनाने जे दर ठरवून दिलेले आहे ते फार कमी असल्यामुळे कोणताही ठेकेदार टेंडर भरण्यास धजावत नाही. त्यामुळे चारा डेपोत निम्म्यापेक्षा कमी चारा जमा झालेला आहे. त्यामुळे मी शासनाला विनंती करतो की, चाऱ्याच्या दरा विषयी शासनाने पुन्हा एकदा जिल्हाधिकारी, आयुक्त यांच्या बरोबर बैठक घेऊन फेर विचार केला तरच शेतकऱ्यांच्या जनावरांना चारा मिळू शकेल.

सभापती महोदय, शासनाने चाऱ्याच्या संदर्भात 75 व 25 टक्क्याचा निर्णय घेतलेला आहे. या निमित्ताने मी शासनास विनंती करतो की, शासनाने मागील दुष्काळामध्ये शेतकऱ्यांच्या जनावरांसाठी चारा मोफत दिला होता तशाच प्रकारे 100 टक्के मोफत चारा यावर्षीही शासनाने उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती आहे.

सभापती महोदय, पाणी पुरवठयाच्या संदर्भात टँकरसाठी टेंडर भरलेली आहेत. 1998 मध्ये टँकरचे जे दर होते तेच दर आतासुध्दा आहेत. पाण्याच्या टँकरची अवस्था फार दयनीय आहे. लोकांना पाणी मिळावे यासाठी अगोदर टँकर सुरु करावा लागतो व टँकर सुरु करण्यासाठी रोज उठून टँकर ढकलत बसावे लागते. अशी टँकरच्या संदर्भात परिस्थिती आहे. गेल्या 14 वर्षाच्या काळात डिझेलचे दर 10-15 वेळा वाढलेले असल्यामुळे टँकरचे दर वाढवून देण्याची आवश्यकता आहे. टँकरची स्थिती चांगली असण्याची आवश्यकता आहे. अनेक भागात सकाळी उठल्यानंतर पाणी भरण्याच्या ऐवजी नादुरुस्त टँकर ढकलण्यात निम्म्या गावाचा अर्धा दिवस जात असतो. शासनाने नवीन टँकर घेण्याच्या संदर्भात सूचना दिलेल्या आहेत ही चांगली बाब आहे. शासनाने चांगले टँकर भाडयाने घेतले तरी दुष्काळी भागातील पाण्याची समस्या काही अंशी तरी सुटण्यास मदत होईल.

सभापती महोदय, राज्यात पावसाची नोंद सर्कल ऑफिसर व तलाठयांच्या सांगण्यावरुन घेतली जाते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दीपकराव साळुंखे...

कुठल्याही जिल्हा परिषदेच्या क्षेत्रात, पंचायती समितीच्या क्षेत्रात पर्जन्यमापक यंत्र नाही. त्यामुळे अमुक एवढा पाऊस पडला असे सांगण्यात येते. त्यामुळे मी माननीय मंत्री महोदयांना विनंती करणार आहे की, प्रत्येक तालुक्यामध्ये पर्जन्यमापक यंत्रे बसवावित. ते शक्य नसेल तर किमान दुष्काळी तालुक्यात पर्जन्यमापक यंत्रे बसविण्यात यावीत. त्यामुळे नेमका किती पाऊस पडला याची नोंद होईल आणि ती शासन दरबारी राहील. त्यामुळे पुढचे निर्णय शासनाला घेता येईल.

पैसेवारी संबंधी देखील अनेक माननीय सदस्यांनी मत व्यक्त केले आहे. पैसेवारी म्हणजे काय ? तलाठी, सर्कल हे शेतकऱ्यांच्या रानामध्ये जातात. ज्वारी, गहू बघतात आणि त्याचे किती उत्पन्न निघते यावर पैसेवारी काढली जाते. मी माननीय मंत्री महोदयांना सांगेन की, नवीन आलेल्या तलाठी, सर्कल यांना पैसेवारी म्हणजे काय व ती कशी काढायची हे देखील माहीत नाही. तेव्हा याबाबतीत त्यांना प्रशिक्षण द्यावे, एवढेच या निमित्ताने सांगतो. शासनाने दुष्काळाची गंभीर दखल घेऊन दुष्काळी भागातील जनतेला दिलासा देण्यासाठी प्रयत्न करावा. आताच सन्माननीय सदस्या श्रीमती नीलम गोऱ्हे यांनी सांगितले की, सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन प्रत्येक दुष्कळी जिल्ह्याच्या ठिकाणी बैठक घ्यावी व सर्वांच्या सल्ल्याने या संकटाला तोंड देण्याची भूमिका सरकारने घ्यावी अशा प्रकारची विनंती करतो आणि माझे भाषण संपवितो. जय हिंद जय महाराष्ट्र.

....

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी अतिशय गंभीर विषयावर सभागृहात चर्चा उपस्थित केली आहे. त्याबद्दल मी त्यांचे सर्वप्रथम आभार मानतो. जवळ जवळ संपूर्ण महाराष्ट्रात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. मागच्या आठवड्या पासून काही ठराविक जिल्ह्यांमध्ये दुष्काळ पडल्याची चर्चा या सभागृहात आणि महाराष्ट्रातील सर्व वर्तमानपत्रातून पहायला मिळत आहे. या सभागृहात अनेक वक्त्यांनी या पूर्वी भाषण करत असताना एकच विषय मांडला की, परतीचा पाऊस व्यवस्थित झाला नसल्यामुळे आज दुष्काळाची परिस्थिती निर्माण झालेली आहे. परतीचा पाऊस जेवढा ह्या दुष्काळी परिस्थितीला जबाबदार आहे तेवढेच हे सरकार सुद्धा याला जबाबदार आहे, असे माझे ठाम मत आहे.

पहिला टंचाई आराखडा पंचायत समितीकडून जिल्हा परिषदेकडे ऑक्टोबर महिन्यामध्ये जातो. यावेळेस माहिती घेतली असता ऑक्टोबर पासून जानेवारी महिन्या पर्यंतचा टंचाई कृती आराखडा पंचायत समितीकडून जिल्हा परिषदेकडे गेला. जिल्हा परिषदेकडून जिल्हाधिकाऱ्याकडे गेला. तो पर्यंत सरकारला कळले नाही की, आपल्या राज्यातील अनेक जिल्ह्यात आणि तालुक्यांमध्ये दुष्काळी परिस्थिती निर्माण होणार आहे. म्हणून मी म्हणतो की, सरकार सुद्धा या दुष्काळी परिस्थितीला तेवढेच जबाबदार आहे.

यशदा मध्ये टंचाई संबंधीची बैठक सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी घेतली आणि अनेक माननीय मंत्री त्यात सहभागी झाले होते. महाराष्ट्रातील 9 जिल्हे दुष्काळग्रस्त म्हणून घोषित केले. दुर्दैवाची गोष्ट आहे की, मराठवाड्यातील फक्त लातूर आणि उस्मानाबाद जिल्ह्यातील 34 गावांचा समावेश दुष्काळग्रस्त म्हणून झालेला आहे. मराठवाड्यातील या दोन जिल्ह्यातील काही गावे सोडली तर अन्य गावांमध्ये पाण्याची अडचण नाही काय, दुष्काळाची परिस्थिती नाही काय ? तेथे गंभीर परिस्थिती असताना अंतिम पैसेवारीच्या आकडेवारीमुळे अनेक गावे दुष्काळग्रस्त म्हणून घोषित होत नाही, हे मराठवाड्याचे दुर्दैव आहे. या दुष्काळावर चर्चा करीत असताना सन्माननीय मंत्री महोदयांकडून आमची एवढीच अपेक्षा आहे की,

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. धनंजय मुंडे....
महाराष्ट्रामध्ये सर्वव्यापी दुष्काळ पडलेला असतांना ठराविक जिल्ह्यांमध्ये, ठराविक तालुक्यांमध्ये आणि ठराविक गावांमध्ये पैसेवारी लावण्यात आली....

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : माननीय सदस्यांनी आपले भाषण थांबवावे. आता महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करण्यासाठी सभागृहाची बैठक 10 मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे

(सभागृहाची बैठक सकाळी 10.25 ते 10.35 वाजेपर्यंत स्थगित झाली)

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

**सभापतीस्थानी - तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)**

**तालिका सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मराठवाड्यातील फक्त 34 गावेच दुष्काळग्रस्त घोषित व्हावीत ही आमच्यासाठी फार दुर्दैवाची गोष्ट आहे. फक्त अंतिम पैसेवारीमुळेच मराठवाड्यातील गावे दुष्काळग्रस्तांच्या यादीमध्ये आली नाहीत ही वस्तुस्थिती आहे.मराठवाड्यामध्ये दुष्काळ हा पाचवीला पुजलेला आहे. तसेच विदर्भाची देखील तशीच अवस्था आहे.पण कोणास ठाऊक, मागच्या काळामध्ये जी अंतिम पैसेवारी काढण्यात आली होती, ती मराठवाड्यात 50 टक्क्याच्या पुढे दाखविण्यात आल्यामुळे येथील गावे दुष्काळग्रस्त म्हणून समजण्यात आली नाहीत. जानेवारी महिन्यामध्ये मराठवाड्यातील 76 पैकी 33 तालुक्यांमध्ये दुष्काळग्रस्त परिस्थिती आहे असे भूजल सर्वेक्षण विभागाने सांगितले होते.परंतु आज दुष्काळग्रस्त तालुक्यांची संख्या 61 पर्यंत गेलेली आहे.अशा वेळी जरी आपण ही परिस्थिती सावरण्याचा प्रयत्न केला तरी देखील शासनाला काही नियम शिथिल करावे लागतील आणि असे झाले तरच आपण दुष्काळी आणि टंचाईच्या परिस्थितीला सामोरे जाऊ शकतो.

सभापती महोदय, मी याठिकाणी एक उदाहरण देतो. दुष्काळग्रस्त परिस्थिती म्हटल्यानंतर टंचाई आलीच. बीड जिल्ह्यात जवळजवळ 1100 सार्वजनिक विहिरींमध्ये पाणी नाही. तसेच 1500 हातपंप देखील कोरडे आहेत. एकूण 140 जे लहान-मोठे प्रकल्प आहेत त्यापैकी 40 प्रकल्पांमध्ये 30 टक्केच पाणी शिल्लक आहे. 9151 पैकी 1176 पंप कोरडे आहेत अशा वेळी प्रत्येक पंचायत समितीने तेथील परिस्थितीचा कृती आराखडा ऑक्टोबरमध्ये दिलेला असताना 21 कोटी रुपयांचा टंचाई कृती आराखडा जिल्हाधिकारी यांनी मंजूर केला आहे परंतु आजपर्यंत त्यातील केवळ 1 कोटी रुपये खर्च झाले आहेत. अशी परिस्थिती असताना आज बोअर्स्चे अधिग्रहण करावे लागणार आहे.या चर्चेच्या निमित्ताने मला सांगावयाचे आहे की, आज आमच्या जिल्ह्यामध्ये 1200 प्रकरणांच्या संदर्भात अधिग्रहणाची मागणी करण्यात आली असून 1200 पैकी 250 अधिग्रहणाच्या बाबतीत भूजल विभागा कडून सर्वेक्षण झालेले आहे.यानंतर पुढे राहिलेले सर्वेक्षण करुन अधिग्रहण करणे आणि लोकांना पाणी देणे किती कठीण आहे हे आपण सर्वांनी याठिकाणी समजण्याची आवश्यकता आहे. आज अनेक ठिकाणी अधिग्रहण होऊ शकत नाही तेथे पाण्याच्या टँकरची मागणी केली जाते. मात्र अशा प्रकारची मागणी करण्याची पध्दत एवढी किचकट आहे की, त्यासाठी प्र-पत्रक (अ) व प्र-



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे . . ..

पत्रक (ब) या दोन गोष्टींचा मेळ घालणे हा विषय अधिकारी, जिल्हा परिषद पंचायत समिती आणि जिल्हाधिकारी यांच्यासाठी अतिशय अडचणीचा विषय आहे. प्र-पत्रक-ब हा विषय देखील किचकट आहे की, यामध्ये तहसीलदार, बी.डी.ओ.आणि उप अभियंता, पाणी पुरवठा यांनी संयुक्तपणे पहाणी करुन अहवाल द्यावयाचा आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

पत्रक "अ" म्हणजे भूजल सर्वेक्षण. भूजल विभागाच्या अधिकाऱ्यांनी सर्व्हे करुन सुचवावयाचे की, अमुक गावात अधिग्रहण केले पाहिजे, अमुक गावात टँकर दिला पाहिजे.त्यानंतर शासनाकडून टँकर मिळतो. अशीच परिस्थिती चाऱ्याच्या बाबतीत आहे.

सभापती महोदय, आमच्या जिल्ह्यात चारा पुरविण्या संदर्भात निविदा काढण्यात आली. परंतु एकाही ठेकेदाराने निविदा भरली नाही. टँकर पुरविण्या संदर्भात देखील दोन वेळा निविदा काढण्यात आल्या, परंतु एकाही ठेकेदाराने निविदा भरलेली नाही. ठेकेदारांनी निविदा न भरण्याचे कारण म्हणजे शासनाने प्रती कि.मी.1 रुपये 50 पैसे असा रेट ठरवून दिलेला आहे. इतक्या कमी रेटमध्ये कोणता ठेकेदार पुढे येईल ? हा रेट फार पूर्वीपासूनचा आहे त्यामध्ये बदल करण्यात आलेला नाही.

सभापती महोदय, राज्याच्या अनेक भागांत आज दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झालेली आहे. या दुष्काळी परिस्थितीला आपण सामोरे कसे जाणार हा महत्वाचा प्रश्न आहे. तेव्हा या बाबत व्यवस्थापन करण्याची आवश्यकता आहे. शासनाने टँकर आणि चारा पुरविण्या संदर्भातील अटी शिथिल करण्याची आवश्यकता आहे. तरच दुष्काळी भागातील लोकांना दिलासा मिळू शकेल.

सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी "यशदा"मध्ये दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी एक बैठक घेतली होती. त्या संदर्भातील बातमी वर्तमानपत्रात आली होती. त्या बातमीचे कात्रण माझ्याजवळ आहे. त्या बातमीमध्ये असा उल्लेख आहे की, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सांगितले आहे की, "ज्या भागातून टँकरसाठी मागणी येईल त्या भागात 24 तासाच्या आत टँकर दिला जाईल." मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, आम्ही 24 तास प्रयत्न केले तरी टँकर पुरविला जात नाही. शासन नियमामध्ये बदल करीत नाही तोपर्यंत यामध्ये काही फरक पडणार नाही. टँकर आणि चारा पुरविण्या संदर्भातील नियम कठीण आणि किचकट आहेत. तेव्हा त्या नियमांमध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. हे नियम बाजूला ठेवले तरच आपण दुष्काळी परिस्थितीला तोंड देऊ शकतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.धनंजय मुंडे......

सभापती महोदय, आज मराठवाड्यामध्ये, विदर्भामध्ये व अन्य जिल्ह्यांत दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. त्याकडे माननीय मंत्री महोदयांनी जातीने लक्ष देण्याची आवश्यकता आहे. शासन नरेगा आणि रोहयोमधून अनेक कामे हाती घेते. शासन "नरेगा" योजना राबवित आहे. या योजनेतंर्गत 0 ते 250 हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणणाऱ्या तलावातील गाळ काढण्याची कामे घेण्यात येतात. परंतु या योजनेची व्याप्ती 0 ते 250 हेक्टर क्षेत्र इतक्या मर्यादे पर्यंत न ठेवता ती मर्यादा 250 हेक्टरच्या पुढे वाढविण्यात यावी. तसेच रोहयोमधून देखील तलावांतील गाळ काढण्याची कामे घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे. टँकर आणि चारा पुरविण्याच्या संदर्भातील अटी शिथिल करण्यात याव्यात अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे आणि अन्य सन्माननीय सदस्यांनी नियम 97 अन्वये जी अल्पकालीन चर्चा उपस्थित केलेली आहे त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, दिनांक 3 एप्रिल, 2012 रोजी सुध्दा याच विषयाशी मिळताजुळता प्रस्ताव येथे मांडण्यात आला होता आणि त्या प्रस्तावाला माननीय कृषी मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

यामध्ये शासनाचे काम कसे चालते, कसा सावळागोंधळ चालतो हा मूळ मुद्दा आहे. मागच्या वेळी नियम 260 अन्वये चर्चेला आलेला प्रस्ताव जवळपास या प्रस्तावासारखाच असताना त्या प्रस्तावावरील चर्चेला माननीय कृषी मंत्र्यांनी उत्तर दिले. यावेळी कालपासून माननीय मंत्री डॉ. पतंगराव कदम हे या प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देण्यासाठी हजर आहेत. मागच्या प्रस्तावावरील चर्चेत काही सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळाली नाही. बऱ्याच सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी मिळत नाही हा भाग वेगळा आहे पण शासन म्हणून दुष्काळाशी संबंधित जे विभाग आहेत त्या सर्व विभागाचे मंत्री वेगवेगळे उत्तर देणार आहेत की सगळ्यांचे मिळून कोणी तरी एक मंत्री उत्तर देणार आहे, हे कळत नाही. सन्माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम पुढच्या काळात मुख्यमंत्री व्हावेत या बाबत आमच्या त्यांना शुभेच्छा आहेत. ते सक्षम सुध्दा आहेत. परंतु माझे स्वत:चे मत असे आहे की, दुष्काळासारख्या प्रश्नावर माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तर देणे अपेक्षित आहे.

सभापती महोदय, मी आपल्याला सांगू इच्छितो की, गेल्या अनेक वर्षापासून आपल्याकडे दुष्काळ किंवा अन्य कोणते ना कोणते संकट येत राहते. कधी कोरडा दुष्काळ पडतो तर कधी ओला दुष्काळ पडतो. कधी काही हजार कोटी रुपये द्यावे लागतात तर कधी शेकडो कोटी रुपये द्यावे लागतात आणि शासन असो किंवा प्रशासन असो, तात्पुरती मलमपट्टी करण्याकडे आपणा सगळ्यांचा जास्तीत जास्त भर असतो. परंतु कायमस्वरुपी उपायोजना करण्याकरिता, हा मूलभूत प्रश्न सोडविण्याकरिता आपण काय उपाययोजना करतो ? यासाठी दुर्दैवाने आपण म्हणावे तसे प्रयत्न करीत नाही. गेल्या वेळी आपण दोन हजार कोटी रुपये दिले. आता माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम काय करतात, मला माहीत नाही. परंतु निश्चितपणे हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

सभापती महोदय, खरे तर या ठिकाणी आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांचे महाराष्ट्राने आभार मानले पाहिजेत. आदरणीय श्री. पवार साहेब बोलले म्हणून आपल्याला थोडी तरी जाग आली. आपण रविवारी पुण्यामध्ये बैठक घेतली, त्या ठिकाणी काय आदेश दिले आणि त्याची खाली

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

काय अंमलबजावणी झाली, हे काळ ठरवील. हा भाग वेगळा आहे. परंतु आदरणीय श्री. पवार साहेब जर बोलले नसते तर आपण आताही जागे झाला असता असे मला वाटत नाही. आपण काही तरी बैठक घेतली असती का, उपाययोजना केली असती का, या बाबतीत निश्चितच शंका बाळगण्यास हरकत नाही. आपण एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, ....

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. कालच्या चर्चेमध्ये सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब या ठिकाणी बोलत असताना त्यांनी सांगितले की, श्री. पवार साहेबांनी सांगितल्यानंतर हे केलेले आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्य त्यांना अडवित होते. आपण ते कामकाजातून काढून टाकावे असा निर्णय दिला. सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांनी सांगितले की, श्री. पवार साहेबांनी सांगितले की, हा दुष्काळ आहे आणि नुसती खर्डा-भाकरी खाऊन दुष्काळ टळणार आहे का ? त्यावर सन्माननीय सदस्यांनी आक्षेप घेतला होता. त्यामुळे सन्माननीय सदस्यांनी श्री. पवार साहेबांबद्दल बोलणे बरोबर नाही, असे मला वाटते.

श्री. विनायक मेटे : त्यावर आक्षेप घेतला नव्हता.

श्री. रमेश शेंडगे : सभापती महोदय, मी स्पष्ट करु इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते यांच्या बद्दल माझ्या मनामध्ये खूप आदर आहे. पण सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी ज्या पध्दतीने आदरणीय श्री. शरदचंद्र पवार साहेबांचे नाव घेतले, त्यांनी ज्या टीकात्मक दृष्टीकोनातून नाव घेतले, त्यांनी ज्या उपहासाने नाव घेतले त्याला आक्षेप घेतला होता. एका बाजूला सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेब त्यांना जाणता राजा म्हणून संबोधतात आणि दुसऱ्या बाजूला ते या पध्दतीने बोलले म्हणून मी त्यावेळी आक्षेप घेतला होता.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी आपली भावना चांगली ठेवावी त्यामुळे कोणी आक्षेप घेण्याचे कारण नाही. मूळ मुद्दा असा आहे की, यामध्ये कोणावर टीकाटिप्पणी करावी असा हा विषय नाही. हा जबाबदारीचा विषय आहे. आपल्याकडे खाते आहे आणि आपल्याकडे प्रत्येक वर्षी किती पाऊस पडतो, कोणत्या जिल्ह्यामध्ये किती पाऊस पडतो, कोठे पाऊस पडत नाही, कोठे जास्त पाऊस पडतो, कोठे कमी पाऊस पडतो, हे आपल्याला माहीत

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे .....

असते. मग आपल्याला ते कळावयास नको का ? तहान लागल्यानंतर विहीर खोदावयाची का ? हा जो प्रकार आहे तो आपण कधी बंद करणार, याचा आपण कधी विचार करतो का ? मघाशी बोलत असताना सन्माननीय सदस्य श्री. धनंजय मुंडे यांनी कालावधी सांगितला. कोणकोणत्या महिन्यामध्ये दुष्काळाचा किंवा टंचाईचा सामना करण्यासाठी काय काय करावे लागते हा ठरलेला कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम ठरलेला असताना सुध्दा आपण आजतागायत ते का करु शकत नाही ? या ठिकाणी शासन आहे, शासनानंतर अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासन आहे. त्याच्या जोडीला प्रत्येक जिल्ह्याचा आढावा घेण्यासाठी पालकमंत्री नेमलेले आहेत. पालकमंत्र्यांच्या मदतीला आणि जिल्हा प्रशासनाचा आढावा घेण्याकरिता आपण पालकसचिव नेमलेले आहेत.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/ पूर्वी श्री.बरवड 10:50

श्री.विनायक मेटे....

बीड जिल्ह्यामध्ये गेल्या 5-6 महिन्यांपासून पालक सचिव गेलेले नाहीत. (अडथळा) दुष्काळाचा आढावा घेण्यासाठी शासनाच्या दृष्टीने पालक मंत्री महत्वाचे आहेत. मी सन्माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांना सांगू इच्छितो की, कोणकोणत्या जिल्ह्यामध्ये कोणते पालक सचिव भेट देण्यासाठी गेले आहेत, त्यांनी टंचाईसाठी किंवा दुष्काळासाठी किती बैठका घेतल्या आहेत याची माहिती घ्यावी. एकाही पालक सचिवांनी या प्रश्नासाठी बैठक घेतली नसेल तर कशासाठी पालक सचिवांना नेमले जाते ?

श्री.जयंत प्र.पाटील : कोर्टाच्या आदेशामुळे सचिव खूप चिंतेमध्ये आहेत. त्यामुळे या प्रश्नासाठी त्यांच्याकडे वेळ नाही.

श्री.भाई जगताप : सचिवांचे ते कामच आहे, त्यांना पळवाट काढता येत नाही. त्यांना चिंता वाटण्याचे कारण नाही. सचिव म्हणजे शासनाचा ते एक भाग आहेत, कणा आहेत. राज्यातील कामे योग्य पध्दतीने व सुरळीतपणे कशी चालू राहतील हे पाहणे त्यांचे कामच आहे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, शासनाने पालक सचिवांना दुष्काळाच्या कामासाठी भाग पाडावे. पुणे येथे माननीय मुख्यमंत्री, माननीय उप मुख्यमंत्री आणि आपण बैठक घेऊन प्रशासनाला आदेश दिले आहेत. ते आदेश खालच्या स्तरावरील यंत्रणेपर्यंत जाणे आवश्यक आहेत. मग ते आदेश टंचाईसंबंधी, दुष्काळासंबंधी, शेत मजुरांना काम मिळण्यासंबंधी, जनावरांच्या चाऱ्यासंबंधी दिले असतील तर त्या आदेशांची अंमलबजावणी कशाप्रकारे होत आहे, त्याची देखरेख करण्यासाठी शासनाकडे यंत्रणा आहे काय ? सभापती महोदय, हे मी आपल्याला माहितीसाठी सांगतो की, काल अनेक सन्माननीय सदस्यांनी आपल्या भाषणामध्ये असा उल्लेख केला आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी माणगावमध्ये पाहणी केल्यामुळे दुष्काळाच्या कामाला गती मिळाली आहे ते चांगले झाले. परंतु भेटीच्या ठिकाणी दुसऱ्या दिवशी काहीही दिसत नव्हते. यामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांचा दोष नाही. परंतु मंत्री महोदयांनी त्याकडे एक उदाहरण म्हणून पहावे. माननीय मुख्यमंत्र्यांनी भेट दिलेल्या साईटच्या ठिकाणी असे घडू शकत असेल तर बाकीच्या ठिकाणी कोणीही जाणार नाही. त्या ठिकाणची परिस्थिती कशी असू शकेल, तेथे आदेशांची अंमलबजावणी

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ D/ KTG/

श्री.विनायक मेटे....

कशी होत असेल, कोण खबरदारी घेणार, कोण देखरेख करणार आहे ? मंत्री महोदय, आज कदाचित काही घोषणा करतील, शासनाने केलेल्या उपाययोजनांची माहिती देतील, धोरण जाहीर करतील, पण पुढे काय ? गरजवंतांपर्यंत या योजना जाणार आहेत काय हा खरा प्रश्न आहे. योजना राबविण्यासाठी यंत्रणांनी प्रभावीपणे काम केले पाहिजे.

गेल्या 3-4 वर्षापूर्वी पडलेल्या दुष्काळाच्या वेळी शासनाने काही निर्णय घेतले होते. त्यासंबंधी सभागृहात चर्चा झालेली आहे. त्यावेळी चारा डेपो, जनावरांच्या छावण्या, रोजगार हमी योजनेची कामे, शेत तळे यासंबंधी मागण्या करण्यात आल्या होत्या. परंतु चारा डेपो सुरु करण्यात आल्यानंतर जनावरांच्या छावण्यामध्ये शेतकऱ्यांची जनावरे ठेवण्यात आली नव्हती. तेथे शेकडो बोगस जनावरांना ठेवण्यात आले होते. त्या छावण्यांवर शासनाने करोडो रुपये खर्च केले होते. बोगस जनावरे ठेवून करोडो रुपयांची बिले उचलण्यात आली होती, त्यामुळे संबंधितांचेच उखळ पांढरे झाले असे नाही तर अधिकाऱ्यांचेही भले झाले होते. सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी अधिकाऱ्यांनी जनावरांचे शेण खाल्ले असे म्हटले होते. यामध्ये जे कोणी अधिकारी, पदाधिकारी गुंतले असतील त्यांच्या बाबतीत शासनाची कोणती भूमिका राहणार आहे ?

सभापती महोदय, पिण्याच्या पाण्यासाठी टँकर्सची मोठ्या प्रमाणात आवश्यकता भासणार आहे, बोअर्सचे अधिग्रहण केले जाणार आहे. परंतु अनेक ठिकाणी पाणी माफिया तयार झालेले आहेत त्यांची शासनामार्फत खबरदारी घेण्याची गरज आहे. परंतु दुष्काळच्या मूळ कारणांचा शोध घेणे आवश्यक आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ D/ D/ KTG/ MMP/ पूर्वी श्री. खंदारे 10:55

श्री. विनायक मेटे...

पूर्वीच्या काळी पाणी अडवा आणि पाणी जिरवा ही योजना गावागावामध्ये राबविण्यात येत होती. प्रत्येक गावामध्ये नालाबंडिगची कामे होत होती. ती योजना आता पुन्हा सुरु करण्याची आवश्यकता आहे. आपण पूर्वी बोअरवेल घेत होतो त्यावेळी 200 ते 250 फूटावर पाणी लागत होते. आता 350-400 फूटावर देखील पाणी लागत नाही एवढी भूगर्भातील पाण्याची पातळी खाली गेलेली आहे. ही भूगर्भातील पाण्याची पातळी कशी वाढेल यादृष्टीने शासनाने उपाययोजना करावयास पाहिजे. पाणी अडवा आणि पाणी जिरवा ही योजना कुठेही भ्रष्टाचार न होता चांगल्या त-हेने राबविली गेली तर भूजलपातळी निश्चितच वाढण्यास मदत होईल. सन्माननीय सदस्य श्री. अमरीश पटेल यांनी शिपरपूर येथे नदी आणि ओढे अडवून, ते खोल करुन पाणी अडविण्याचे आणि जिरवण्याचे काम केलेले आहे. तशा प्रकारचे काम संपूर्ण महाराष्ट्रामध्ये केले पाहिजे. ते केले तर आपल्याला दुष्काळावर मात करता येईल.

सभापती महोदय, नदीजोड प्रकल्प महाराष्ट्रामध्ये राबविण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रामध्ये पडणारे पावसाचे पाणी कर्नाटक, आंध्रप्रदेश, गुजरात या राज्यामध्ये वाहून जाते. हे पाणी अडवून ते महाराष्ट्रातील दुष्काळी भागात जेथे सातत्याने पाण्याची तीव्र टंचाई असते अशा भागामध्ये नेले पाहिजे. हे काम एक-दोन वर्षात होणार नाही. या कामासाठी 10-12 किंवा 15 वर्षाचे नियोजन करा आणि कामाला सुरुवात करा. हे काम झाले तर राज्यातील 55 ते 60 टक्के कोरडवाहू जमीन कमी झाल्या शिवाय राहाणार नाही. जमीन ओलिताखाली येईल आणि शेतकरी सुखी होईल शिवाय दुष्काळाचा सामाना करण्यासाठी कोणतीही अडचण येणार नाही.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी या ठिकाणी शेततळयांचा उल्लेख केला. शासन 3 हजार शेततळी करणार आहे. ही शेततळी करावीत पण त्याच बरोबर भूगर्भातील पाण्याची पातळी वाढण्यासाठी जलसंधारणाची कामे देखील मोठ्या प्रमाणावर करण्याची गरज आहे. आज जलसंधारणाच्या कामाकडे पूर्णपणे दुर्लक्ष झालेले दिसते. केन्द्र सरकारकडून अनेक योजनांसाठी निधी मिळतो. केन्द्र शासनाच्या योजना राबविण्यासाठी राज्य शासनाने मॅचिंग ग्रॅण्ट उपलब्ध करुन द्यायला पाहिजे. परंतु ती देखील राज्य शासन उपलब्ध करुन देत नाही. दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली की शासन कोटयवधी रुपये खर्च करते. ते पैसे कुठे खर्च होतात ते

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनायक मेटे...

समजत नाही. दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी शासनाने मोठ्या प्रमाणावर जलसंधारणाची कामे हाती घेतली पाहिजेत. गावोगावी पाणी अडवा आणि पाणी जिरवा ही संकल्पना राबविली पाहिजे.

सभापती महोदय, पश्चिम महाराष्ट्रातील जत, आटपाडी, खानापूर, माण, खटाव, कवठेमहांकाळ आणि फलटण असे सात दुष्काळी तालुके आहेत. या दुष्काळी तालुक्यांचा वारंवार उल्लेख होतो. मग राज्यातील इतर तालुक्यांचे काय ? विदर्भ, मराठवाडा, खानदेश या प्रदेशातील दुष्काळी भागाकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे.

सभापती महोदय, अनेक सन्माननीय सदस्यांनी पीक आणेवारीचा उल्लेख केला. 50 पैशापेक्षा कमी आणेवारीमध्ये खरीप आणि रब्बी हंगामाचे जिल्हे घेतलेले आहेत. त्यामध्ये मराठवाड्यातील कमी जिल्हे आहेत. ही आणेवारी काढण्याची जुनी पध्दत बंद करावी अशी अनेक सन्माननीय सदस्यांनी मागणी केलेली आहे.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे......

पूर्वीच्या काळात मार्केट कमिटीमध्ये कपड्याखाली हात घालून दर ठरविले जायचे. तसाच हा प्रकार सुरु आहे. ही आणेवारीची पध्दत कधी थांबविणार आहात? आणेवारी, नजरअंदाज आणि अंतिम पैसेवारीचा प्रकार बदलला पाहिजे.

सभापती महोदय, गव्हारी हे बीड जिल्हयातील गाव आहे. त्या गावाला 25 वर्षापासून टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. ग्रामस्थांना 2-3 कि.मी.वरुन पाणी आणावे लागते. मी त्या त्या काळातील जिल्हाधिकारी, तहसीलदार, पालकमंत्री यांच्याशी प्रत्यक्ष बोललो होतो. गव्हारी गावाला अद्याप पाणी पुरवठा सुरु झालेला नाही. बीड जिल्हयातील टंचाई आराखड्यामध्ये देखील गव्हारी गावाचा समावेश होत नाही. आंधळं दळतंय आणि कुत्रं पीठ खातंय असा कारभार करु नये. लोकांना विश्वास वाटेल, समाधान वाटेल आणि गरज पूर्ण होईल अशा पध्दतीने नियोजन करण्यात यावे. जी काही योजना तयार केली जाईल त्यामध्ये भ्रष्टाचार होणार नाही, जनावरांना चारा पुरेसा आणि योग्य पध्दतीने पुरविला जाईल याची दक्षता घेण्यात यावी व मराठवाडा आणि बीड जिल्हयाचा दुष्काळीमध्ये समावेश करण्यात यावा एवढे बोलून माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये उपस्थित करण्यात आलेल्या दुष्काळाच्या संदर्भातील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी आणि त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, कोकणामध्ये 150 ते 200 इंच पाऊस पडतो अशी नोंद केलेली आहे. परंतु या पाण्याचे नियोजन करण्यासाठी स्वामीनाथन समितीने ज्या काही उपाययोजना सुचविल्या आहेत त्या अंमलात आणण्याची गरज आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात 167 गावांमध्ये पाणी टंचाई निर्माण झालेली आहे. 250 कोटी रुपये खर्चाचा प्रस्ताव प्रशासनाकडून मंत्रालयामध्ये सादर करण्यात आला आहे.

सभापती महोदय, माननीय वनमंत्री सभागृहात उपस्थित आहेत. मी त्यांचे लक्ष कोकणातील वृक्षतोडीकडे वेधू इच्छितो. कोकणामध्ये मोठया प्रमाणात वृक्षतोड होत असल्यामुळे टंचाईची परिस्थिती निर्माण होण्यास हातभार लागत आहे. काल एका याचिकेच्या संदर्भात जनसुनावणी झ ााली. गाडगीळ समितीच्या अहवालानुसार सिंधुदुर्ग जिल्हयातील वृक्षतोड बंद करण्यात यावी अशा प्रकारचे आदेश हायकोर्टाने दिलेले आहेत. याची माहिती मंत्री महोदयांना आहे का? कोकणामध्ये जी वृक्षतोड होत आहे ती तत्काळ बंद करावी असे आदेश हायकोर्टाने सिंधुदुर्गच्या जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयात अनेक प्रकल्प येऊ घातले आहेत. माननीय वनमंत्री यांच्याकडेच मदत व पुनर्वसन विभागाचा कार्यभार आहे. मदत व पुनर्वसन विभागाने योग्य ते काम न केल्यामुळे अनेक प्रकल्पांचा खर्च 10 ते 20 पटीने वाढला आहे. टाळंबा प्रकल्पाचा खर्च 72 कोटी रुपयांवरुन 816 कोटी रुपयांवर गेला आहे. 1984 मध्ये या प्रकल्पाचे काम सुरु झाले होते. नरडवे प्रकल्पाचा खर्च 32 कोटी रुपयांवरुन 4446 कोटी रुपयांवर गेला आहे. अशा प्रकारे अनेक प्रकल्पांच्या खर्चामध्ये मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. शासनाने आधी पुनर्वसन आणि मग धरण अशा प्रकारचे धोरण निश्चित केले आहे. सिंधुदुर्ग जिल्हयात 18 पैकी 1 मोठ्या, 4 मध्यम आणि 13 लघुपाटबंधारे प्रकल्पांची एकूण मूळ किंमत 270 कोटी रुपये होती, ती आता 2150 कोटी रुपयांवर गेली आहे. महाराष्ट्र राज्याला हा भूर्दंड सहन करावा लागणार आहे. स्थानिक लोकांचे पुनर्वसन करण्यासाठी निधी योग्य प्रमाणात न मिळणे, लोकांचे पुनर्वसन वेळेत न होणे यामुळे प्रकल्पांच्या निर्मितीला ग्रामस्थांचा सातत्याने विरोध होत आहे.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ......

म्हणून या प्रकल्पाची किंमत दहा ते वीस पटीने वाढली आणि ते पूर्णही झालेले नाहीत, याचा विचार करुन अशा प्रकल्पांसाठी तातडीने निधी देण्याची गरज आहे. त्याचबरोबर सिंधुदुर्ग जिल्हा सन 1998 मध्ये शासनाने टँकरमुक्त केला पण या वर्षी या जिल्ह्यातील संपूर्ण गावांमध्ये टँकरची मागणी होत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे ज्या नळ पाणीपुरवठा योजना आहेत त्यांची मर्यादा संपलेली असल्याने नुतनीकरणाची आवश्यकता आहे. तसेच काही योजना भार नियमनामुळे चालत नाहीत आणि तिसरे कारण म्हणजे ज्या ज्या ठिकाणी अशा योजनांचे स्त्रोत आहेत त्याला आमच्या कोकणात कोंडी असे म्हणतात. त्या कोंडीच्या ठिकाणी माती साचलेली असल्याने त्यावरही उपाययोजना करणे आवश्यक आहे कारण जवळपास सर्वच नळ योजना अशा कोंडीतूनच उगम पावलेल्या आहेत त्यातील गाळ काढण्याची गरज आहे. या सर्व कामासाठी शासनाने 250 कोटी रुपये द्यावे अशी या 167 गावातील लोकांची मागणी आहे, हा निधी तात्काळ देण्यात यावा अशी विनंती करतो व माझे दोन शब्द संपवितो.

-------

.........2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : महोदय, पाणी टंचाई आणि दुष्काळग्रस्त जनतेच्या व्यथा मांडण्यासाठी मी उभी आहे.

महोदय, सुरुवातीलाच मी गान सम्राज्ञी लता मंगेशकर यांनी गायिलेल्या एका भावगीताचा उल्लेख करु इच्छिते. त्या म्हणतात की, "कळा लागल्या जीवा, मला की ईश्वरा ठावे, कुणाला काय हो त्याचे, कुणाला काय सांगावे " या ठिकाणी पाणी टंचाईचा अर्थ काय हे मंत्री महोदयांनी समजून सांगितले पाहिजे. पुण्याला एक वेळ नळाला पाणी येत नाही म्हणून पाणी टंचाई आहे असे म्हणावयाचे की, अकोला येथे चार चार दिवस पाणी येत नाही म्हणून पाणी टंचाई आहे असे सांगावयाचे, की दोन दिवस नळच येत नाही किंवा कोणाला पाणीच मिळत नाही म्हणून टंचाई आहे हे स्पष्ट झाले पाहिजे. पाणी टंचाईचा भाग नेमका कोणता आहे हे देखील सभागृहाला कळले पाहिजे. एक वेळ सभागृहात ओरडून सांगितले की, आमच्याकडे पिण्याचे पाणी मिळत नाही असा भाग पाणी टंचाईचा भाग म्हणून समजावयाचा की, कितीही वेळा सांगितले तरी पाणी मिळत नाही असा भाग टंचाईचा की पंप बंद होऊन चार-चार दिवस झाले तरी सुरु होत नाही असा भाग पाणी टंचाईचा आहे याची व्याख्या स्पष्ट होणे आवश्यक आहे.

महोदय, राज्यात एकूण 41035 गांवे आणि 525 शहरे आहेत. परंतु राष्ट्रीय पाणीपुरवठा योजनेच्या अंतर्गत आजपर्यंत पाणी पुरवठ्याच्या लक्ष्या नुसार केवळ 6502 गांवांचाच विचार होत आहे. आजपर्यंत या माध्यमातून ज्या ज्या ठिकाणी जलस्वराज्य योजना, पेय जल योजना, शिवकालीन योजना अशा विविध योजना राबविल्या आहेत पण त्यापैकी किती योजना बंद झाल्या त्याचा विचार कधी तरी शासनाने केला आहे काय किंवा त्या दुरुस्त करण्याचे प्रयत्न तरी केले आहेत काय, याचे स्पष्टीकरण होणे आवश्यक आहे. महोदय आमच्या जिल्ह्यात गोंडपिंपरी जलस्वराज्य योजना हाती घेतली. योजनेचे काम संपूर्ण झाले पण केवळ योजनेपर्यंत पाणी जोडण्यासाठी नदीपासूनच्या एक किलोमीटरचा खर्च केला नाही म्हणून योजना बंद आहे, अशा योजनांची शासनाला माहिती आहे काय याचाही खुलासा होणे आवश्यक आहे.

महोदय, शासनाचा प्रामुख्याने खाजगी विहिरी अधिग्रहित करण्यावर भर असतो. अशा प्रकारे शासनाने सन 2009-10 मध्ये 4347 खाजगी विहिरी अधिग्रहित केल्या होत्या, 2010-11 मध्ये 616 विहिरी ताब्यात घेतल्या आणि पाणी पुरवठा केला अशा प्रकारचा डांगोरा शासन नेहमी

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस .....

पिटत असते. आपण यावर्षी राज्याचे सुवर्ण जयंती महोत्सवी वर्ष साजरे करीत आहोत. पण या सुवर्ण महोत्सवी वर्षापर्यंत राज्यातील जनतेला सिंचनाची गोष्ट तर दूरच आहे पण किमान पिण्याचे पाणी सुध्दा देऊ शकलो नाही ही खरोखरच लाजिरवाणी गोष्ट आहे. एकीकडे आपण दुष्काळ दुष्काळ करायचे आणि दुसरीकडे राज्यात आत्महत्या होत असतात ही खरोखरच दुर्दैवाची गोष्ट आहे. राज्यात पिण्याच्या पाण्याच्या टंचाईचा फायदा घेऊन टँकर माफिया मोठ्या प्रमाणात तयार होत आहेत, त्याला आधारही आहे. त्याचा परिणाम म्हणून वर्षानुवर्षे जे भाग टँकरचे ठेवले त्या भागात सन 2010 मध्ये 270 टँकर आणि 188 बैल बंड्यांच्या माध्यमातून पाण्याचा पुरवठा करण्यात आला आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

सन 2010-2011 मध्ये 10535 गावे व 250 वाडयांना टँकर आणि बैलबंडीने पाणी पुरवले होते. महाराष्ट्र टँकर मुक्त करण्यात येईल अशी आघाडी शासनाने घोषणा केली होती परंतु टँकर मुक्त महाराष्ट्र होण्याऐवजी टँकर अधीन महाराष्ट्र आपण केलेला आहे असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, देशाला स्वातंत्र्य मिळून 64 वर्षे झालेली आहेत. हे वर्ष आपण सुवर्णमहोत्सवी वर्ष म्हणून साजरे करीत आहोत. आज राज्यात सुवर्णजयंतीचा ढोल बडवण्यास सुरुवात झालेली आहे. सगळीकडे आबादी आबाद आहे, प्रगतिशील महाराष्ट्र आहे असे सांगितले जाते परंतु प्रत्यक्षात राज्यातील जनतेला पिण्याचे पाणी सुध्दा देऊ शकत नाही हे खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, जलसंधारणाच्या संदर्भात शासनाने कायदा केला असून सांगण्यात आले आहे की, कृषी सिंचनाला पहिले प्राधान्य, पिण्याच्या पाण्याला दुसरे प्राधान्य व उद्योगाला तिसरे प्राधान्य दिले जाईल अशी घोषणा करण्यात आली. ही घोषणा झाल्याबरोबर सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी टेबल बदड बदड बदडले, मुख्यमंत्र्याचे स्वागत केले परंतु राज्यात प्रत्यक्षात पाणी टंचाई आहे. एकीकडे जमिनीतील पाण्याची पातळी खोल चालली आहे. आमच्याकडे वर्धा नदी आहे. या नदीवर सहा विद्युत प्रकल्प शासनाने मंजूर केलेले असून त्यातील धारीवाल प्रकल्पाला भूगर्भात रेडीयल वेल खोदण्याची परवानगी दिली आहे. रेतीच्या खाली तसेच भूपृष्ठाच्या खाली 11 मिटर जाण्याची संधी दिली आहे. भूजल विभागाने स्पष्ट केले आहे की, अशा प्रकारे रेडीयल वेल खोदली तर या ठिकाणच्या 15 कि.मी. पर्यंतच्या गावांना पाणी मिळू शकणार नाही. आजही वर्धा नदीमध्ये उन्हाळयात पाणी नाही ही वस्तुस्थिती आहे. शासन उद्योगाला वाचवणार आहे की, जनतेला वाचवणार आहे? शासन गावाला पिण्याचे पाणी देणार आहे की, उद्योगाला पाणी देणार आहे? हे शासन केवळ वीज निर्माण करुन माणसांना मारण्याचे धोरण राबवित आहे.

सभापती महोदय, मागील वर्षी अनियमित पाऊस झाला होता. सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात पिकासाठी पावसाची गरज होती त्यावेळी पाऊस आला नाही. परंतु ज्यावेळेस कापणीची



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

वेळ आली त्यावेळी म्हणजे नोव्हेंबर महिन्यात पाऊस आला व त्यामुळे धानाचे व सोयाबीनचे मोठया प्रमाणात नुकसान झाले होते. आमच्या शेतकऱ्यांच्या हातात पीक शिल्लक नाही. जे काही धान्य आहे ते सर्व काळे पडलेले आहे हे आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना सांगितले होते परंतु असे असतांना आमच्या भागाची आणेवारी 51 टक्के काढण्यात आली. आणेवारी काढतांना कोणत्याही धानाचे किंवा सोयाबीनच्या पिकाची तपासणी करण्यात आली नाही. असे असतांना शासनाने घोषणा केली होती की, कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यावर जेवढा कापसाचा पेरा दाखवला असेल तेवढी नुकसान भरपाई दिली जाईल. तसेच धान व सोयाबीन पिकविणाऱ्या शेतकऱ्याचे 25 टक्क्याच्यावर नुकसान भरपाई झाली असेली तरी 25 टक्केच मिळते. आतापर्यंत 50 टक्क्याच्या वर नुकसान झाले असेल तर त्याबाबत आमच्या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळत होती परंतु आता 25 टक्क्याचा रेट कोठून आणला आहे याचे स्पष्टीकरण आम्हाला मिळण्याची आवश्यकता आहे.

आम्ही असेच समजलो होतो की, 25 टक्क्यापर्यंत नुकसान झाले त्यावरील लोकांना नुकसान भरपाई मिळेल. परंतु धान व सोयाबीन उत्पादकांच्या संदर्भात शासनाने कोणतेही स्पष्ट स्पष्टीकरण दिलेले नाही.

सभापती महोदय, ज्या भागाचा 16 टक्के सिंचनाचा रेशो आहे त्या ठिकाणी दुष्काळ नाही परंतु पुण्यासारख्या भागात 50-58 टक्के इरिगेशन असलेल्या, नाशिक जिल्हयामध्ये चांगल्या प्रकारचे इरिगेशन आहे परंतु याठिकाणी दुष्काळाचा हे शासन डांगोरा पिटत आहे. मराठवाडा, विदर्भ, खानदेश तसेच कोकणाच्या एकाही गावाचा यामध्ये समावेश करण्यात आलेला नाही. केवळ श्रीमंतालाच मोठे करावयाचे आणि विदर्भातील लोकांना दूर लोटावयाचे व त्यांना बिना पाण्याने मारावयाचे असा प्रकार या शासनाने सुरु केलेला आहे. त्यामुळे हे सर्व बंद करुन विदर्भ, मराठवाडा, खानदेश व कोकणासहीत आमच्या योजना प्रथम पूर्ण करा व मगच श्रीमंताचे लाड करा एवढे बोलून मी माझे दोन शब्द पूर्ण करते.

---------

श्री. रमेश शेंडगे (नामनियुक्त) सभापती महोदय, महाराष्ट्रातील 9 जिल्हयांना टंचाई सदृष्य परिस्थितीला तोंड द्यावे लागत आहे. भीषण पाणी टंचाई, भीषण चारा टंचाई तसेच वेगवेगळया नैसर्गिक आपत्तीला या 9 जिल्हयांना तोंड द्यावे लागत आहे. राज्यामध्ये 37322 गावांमध्ये रब्बी हंगामाची पिके घेतली जातात. त्यामध्ये 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असणारी 6201 गावांमध्ये टंचाईग्रस्त परिस्थिती निर्माण झालेली आहे. देशाचे कृषी मंत्री आदरणीय श्री. शरद पवार साहेबांना धन्यवाद द्यावयाचे आहेत की, त्यांनी दुष्काळी भागाचा दौरा करीत असतांना महत्वाच्या व निकडीच्या काही बाबी शासनाच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

त्यामुळे आघाडी सरकारने तातडीने उपाययोजना करून टंचाईसदृश्य गावांच्या बाबतीत चांगल्या प्रकारची उपाययोजना करण्याचे निर्णय घेतले. आदरणीय मुख्यमंत्री आणि उप मुख्यमंत्री महोदयांनी यशदा,पुणे येथे बैठक घेतली. या बैठकीला राज्य शासनातील मंत्री महोदय व प्रमुख अधिकाऱ्यांना बोलावून चांगल्या प्रकारची योजना जाहीर करून आदेश दिले.

1972 पासून बघत आलो आहोत की, आपले राज्य वेगवेगळ्या भागामध्ये दुष्काळाला सामोरे जात आहे. आज आपल्या राज्यामध्ये 83 मोठे प्रकल्प आहेत. आज तेथे 43 टक्के पाणी साठा आहे. हाच पाणी साठा गेल्या वर्षी 61 टक्के होता. मध्यम प्रकल्प 223 आहेत. गेल्या वर्षी या प्रकल्पांमध्ये 58 टक्के पाणी साठा होता, तर या वर्षी तो फक्त 39 टक्के आहे. लघु प्रकल्प 2116 आहेत. या प्रकल्पांमध्ये 28 टक्के पाणी साठा असून गेल्या वर्षी 64 टक्के पाणी साठा होता.

एप्रिल, मे, जून महिन्यात कधी पाऊस पडेल हे आपल्याला माहीत नाही. त्यामुळे हा जो पाणी साठा आहे तो किती दिवस पुरणार आहे, कशा प्रकारे पुरणार आहे हे माहीत नाही. टंचाईमुळे दुष्काळग्रस्त भागातील लोकांची ससेहोलपट होत आहे. यातील काही तालुके हे कायम दुष्काळी आहेत. त्यामुळे सिंचनाच्या योजना राबविताना जे कायम दुष्काळी तालुके आहेत, त्यांच्याकडे आपण प्रामुख्याने लक्ष दिले पाहिजे.

सन 1972-73 पासूनचा आढावा घेतला तर असे दिसून येईल की, ज्या ज्या वेळी आपण दुष्काळी परिस्थितीला, टंचाईला सामोरे जातो त्यावेळी या राज्यातील काही तालुके, काही गावे ही कायम दुष्काळी असतात. त्यामध्ये काहीही फरक पडलेला नाही. मी कवठेमहांकाळ तालुक्यात राहतो. सांगली जिल्ह्यातील जत, आटपाडी, खानापूर, साताऱ्या मधील माण-खटाव तसेच सोलापूर मधील सांगोला, मंगळवेढा पश्चिम महाराष्ट्रातील अनेक तालुके कायम दुष्काळी असतात. असेच तालुके मराठवाडा, विदर्भ, कोकणात आहेत. कोकणातील काही तालुक्यांना देखील नैसर्गिक आपत्तींना सामोरे जावे लागते. ऐन वेळेला टंचाई निर्माण झाल्यानंतर शासन कोणती उपाययोजना करणार आहे ? निसर्गाचा कोप हा कधीही सांगून येत नाही. त्यामुळे अशा प्रसंगाना सामोरे जाण्यासाठी कायम दुष्काळी तालुक्यांसाठी कायम नियोजन करणे आवश्यक आहे. ....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे...

सिंचनासाठी निधी येतो. तो जास्तीत जास्त कायम दुष्काळी तालुक्यांसाठी दिला पाहिजे. भूजलाची पातळी कमी व्हायला लागली आहे. आपण बोअरिंग घेतो. 200 फुटा पर्यंत बोअरिंग घेण्याची शासनाची अट आहे. आज 200 फुटा पर्यंत गेल्यावर देखील पाणी मिळत नाही. म्हणून माझी विनंती राहील की, 200 फुटा ऐवजी 300 फुटा पर्यंतच्या खोली पर्यंत गेलो पाहिजे. तरच आपल्याला पाणी मिळेल. तसा आपण प्रयत्न करावा. पाणी उपसण्यासाठी जी यंत्रे वापरतो ती सुद्धा चांगल्या प्रतीची नाहीत. आपण चांगल्या प्रतीची यंत्रे वापरायला पाहिजेत. आज टॅन्करने पाणी पुरवठा सुरू केला आहे. डिझेल नसल्यामुळे टॅन्कर उभे असतात. या टॅन्करना पेट्रोल पंपावर डिझेल मिळावे यासाठी कलेक्टर मार्फत वेगळी यंत्रणा राबविली पाहिजे, असे मला वाटते.

कायदा करून, नियम करून, जी.आर.काढून निसर्गाचे चक्र बदलता येत नाही. नैसर्गिक आपत्तीला सामोरे जाण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. यामध्ये कुठल्याही प्रकारचे राजकारण न आणता ग्लोबल वॉर्मिंगचे संकट जगावर येत आहे त्याचाही अभ्यास करून मोठ्या प्रमाणावर नियोजन करायला हवे.

दुष्काळी भागातील डाळींब, बोरे हे पीक नेस्तनाबूत व्हायला लागले आहे. हे जे महाभयंकर संकट दुष्काळी तालुक्यांवर आले आहे त्याकडे लक्ष दिले पाहिजे. पश्चिम महाराष्ट्रातच नव्हे तर राज्यातील ज्या ज्या भागांमध्ये हे संकट आले त्याकडे आपण लक्ष दिले पाहिजे. मला सभागृहातील नेत्यांना विनंती करावयाची आहे. आपण पश्चिम महाराष्ट्र, पश्चिम महाराष्ट्र अशी ओरड न करता पश्चिम महाराष्ट्रातील जी गावे खरोखर कायम दुष्काळी आहेत, त्यांना 10-10 दिवस पाणी मिळत नसेल तर त्यांच्यासाठी उपाययोजना करण्यासाठी सहकार्य करावे. पश्चिम महाराष्ट्रातील दुष्काळी गावात पाहुणा आला तर त्याला खायला देण्या पेक्षा मी पाणी कुठून देऊ ही धास्ती त्या ग्रामीण भागातील जनतेला पडते. तेव्हा अशा भागातील लोकांसाठी देखील आपण जाणीव ठेवली पाहिजे.

आपल्या राज्यामध्ये गायींची संख्या 1कोटी 52 लाख 59 हजार 702 आहे. म्हशींची संख्या 63 लाख 2938 आहे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रमेश शेंडगे....

आणि शेळयांची संख्या 1 कोटी 9 लाख 81 हजार 181 इतकी आहे. आपण पिण्याच्या पाण्याचे नियोजन करतो, गाई-म्हशींचे, पशुधनाचे नियोजन करतो परंतु शेळया-मेंढयांचे नियोजन केले जात नाही. त्यामुळे गावाकडील सर्व मेंढपाळ तडफडायला लागले आहेत. माझी आपणास विनंती आहे की, या नियोजनामध्ये शेळया-मेंढयांचा देखील समावेश करण्यात यावा आणि ग्रामीण भागातील जनतेला चांगल्या प्रकारे न्याय द्यावा. ग्रामीण भागामध्ये जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी मते मागण्यास सर्व नेतेमंडळी फिरली, परंतु दुष्काळाचे जे संकट आले आहे त्यासाठी राज्यातील प्रमुख नेत्यांनी जनतेला दिलासा देण्यासाठी फिरावे एवढीच मी विनंती करु इच्छितो. आदरणीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार साहेबांच्या आदेशानंतर नियम 97 अन्वये या ठिकाणी चर्चा घडवून आणली आहे त्याबद्दल सर्व माननीय सदस्यांना धन्यवाद देऊन मी माझे भाषण संपवितो.

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.दिलीपराव सोनवणे (नाशिक विभाग शिक्षक) : सभापती महोदय, नियम 97 अन्वये माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे, माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व अन्य माननीय सदस्यांनी या ठिकाणी चर्चा घडवून आणल्याबद्दल मी प्रथमत: त्यांना धन्यवाद देतो, त्या बाबत माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, चालू वर्षी पाऊस अतिशय कमी पडला, खरीप पिकासाठी तो पुरेसा पडला नाही. त्यानंतर परतीच्या पावसाने पाठ फिरविल्यामुळे खरीप पिकाबरोबर रब्बी पिकाचा हंगामही कोरडा गेला. कापूस, धान, तेलबिया आणि सोयाबीन या पिकांवर त्याचा परिणाम झाला. खरीपाचे पिक निम्म्यावर आले. कोरडवाहू शेतकरी रब्बी पीक घेऊ शकला नाही. एका बाजूला शेतकऱ्याला शेतीमधून चांगले उत्पन्न मिळाले नाही तर दुसऱ्या बाजूला त्याच्या शेतीमालाला भाव मिळाला नाही त्याचा शेतकऱ्यांना फटका बसला आहे. परतीचा पाऊस न पडल्यामुळे आज शेतकऱ्यांची, लोकांची, जनावरांची गंभीर अवस्था निर्माण झाली आहे. सभापती महोदय, ग्लोबल वार्मिग म्हणा किंवा हवामानामध्ये झालेल्या बदलामुळे पर्जन्यमानावर विपरीत परिणाम होत आहे. त्याचा परिणाम म्हणून राज्यातील संपूर्ण शेतकरी संपलेला आहे. दर दोन-तीन वर्षानंतर अशाप्रकारची स्थिती राज्यामध्ये निर्माण होत असते.

महाराष्ट्राच्या दोन तृतीयांश भागामध्ये पर्जन्यमान फार थोडके आहे, तसेच जमिनीमध्ये सुपिकता राहिलेली नाही. तेथील जमीन सिंचनाखाली नसून ती सिंचनाखाली येणे अत्यंत गरजेचे आहे. महाराष्ट्रामध्ये कोरडवाहू शेतकऱ्यांचा प्रश्न खऱ्या अर्थाने गंभीर स्वरुपाचा आहे. कै. यशवंतराव चव्हाण साहेबांनी 50 वर्षापूर्वी सूचित केले होते की, आपल्या राज्याला खऱ्या अर्थाने कोरडवाहू शेतकऱ्यांचा प्रश्न भेडसावणार आहे. त्यादृष्टीने आजपर्यन्त ज्याप्रकारे विचार होणे आवश्यक होते तसा तो झालेला नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या आत्महत्त्या राज्यामध्ये दिवसें दिवस वाढत असल्याचे आपण पहात आहोत. ज्या भागामध्ये सिंचनाची सोय निर्माण करण्यात आली, ती कायम स्वरुपी असेल की नाही हे आपल्याला सांगता येत नाही. धरणाचे पाणी अग्रक्रमाने शेतीला उपलब्ध करुन दिले पाहिजे. परंतु कालांतराने आपल्याला त्यामध्ये बदल करावा लागला. नागरी वस्त्या, कारखाने, औष्णिक वीज केंद्रे यांचा विचार अगोदर होऊ लागला. पर्यायाने सिंचनाचे क्षेत्र कमी होऊ लागले आणि दुष्काळी भागाचे क्षेत्र वाढू लागले आहे.



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. दिलीपराव सोनवणे...

सभापती महोदय, या ठिकाणी एका कविने म्हटलेल्या काही ओळी मी उधृत करीत आहे. कवितेचे शीर्षक "शेतकऱ्याच्या मुक्तीतून" आहे.

"पोशिंदा तो माझा । एक शेतकरी ।
सर्व जगा तारी । एकुलाची ॥1॥
दुष्काळी सुकाळी । थांबला न कदा ।
पोटासाठी सौदा । नोहे कदा ॥2॥
अवर्षनी कधी । दृष्टी ढगाकडे ।
दुःखाचे ते पाढे । सदा त्याच्या ॥3॥
थांबवेना कर्म । असा कर्मयोगी ।
शेष तो ते भोगी । घामाचे हो ॥4॥
ऐसा सत्यदासा । गांजिती सकळ ।
करिती उखळ । पांढरे ते ॥5॥
शिवा म्हणे तूज । काय देणे घेणे ।
सत्याचे मोजणे । तुझ्या दारी ॥6॥

या सत्याच्या दासाला, शेतकऱ्याला न्याय देण्यासाठी आणि दुष्काळाचा प्रश्न कायम स्वरुपी मिटविण्यासाठी दुष्काळसदृश असे न म्हणता शासनाने राज्यामध्ये दुष्काळ जाहीर करावा. त्याचबरोबर जलसिंचनाची कामे मोठया प्रमाणात हाती घेण्यात यावीत. जळगाव जिल्ह्यातील हातनूर धरण हे गाळाने भरले आहे, तो गाळ काढण्यात आला तर धरणातील पाण्याची क्षमता वाढेल. आपण थ्री आर योजना प्रभावी पध्दतीने राबविली पाहिले. त्याचप्रमाणे पुढील वर्षी तरी शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी आपण नरेगा योजना राबविली पाहिजे. त्याचप्रमाणे नदी जोड योजना, पाणी अडवा, पाणी जिरवा योजना असेल अशा प्रभावी योजना हाती घेऊन शेतकऱ्यांना वाचविणे अत्यंत गरजेचे आहे. म्हणून माझी आपल्याला विनंती आहे की, आपण दुष्काळसदृश परिस्थिती न म्हणता दुष्काळ जाहीर करावा आणि शेतकऱ्यांना वाचवावे, शेतकऱ्यांना जगवावे अशी विनंती करुन माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

----

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या या राजधानी मध्ये असलेल्या या सभागृहामध्ये एका गंभीर विषयावर कालपासून चर्चा सुरु आहे. राज्यामध्ये निर्माण झालेल्या टंचाईग्रस्त परिस्थितीबाबत शासनाने करावयाची उपाय योजना अशा प्रकारचा हा चर्चेचा विषय आहे.पण याठिकाणी एका गोष्टीचा प्रामुख्याने उल्लेख केला पाहिजे की, माझ्या जिल्ह्याचे आदरणीय पालकमंत्री डॉ.पतंगराव कदम याठिकाणी उपस्थित आहेत. बाकी जिल्ह्यामध्ये काय झाले आहे, कसे झाले आहे याची मला कल्पना नाही.कदाचित याबाबतीत शासनाकडून निवेदन केले जाईल. मात्र आमचे पालकमंत्री माननीय डॉ.पतंगराव कदम साहेबांनी मात्र आमच्या सांगली जिल्ह्यामध्ये उपाययोजना करण्याकरता बैठक घेणे आणि त्या माध्यमातून यंत्रणा कामाला लावणे यासाठी जी पावले उचललेली आहेत, ती अत्यंत वाखाणण्यासारखी आहे.

सभापती महोदय, यासंबंधात मला काही सूचना करावयाच्या आहेत. पहिली सूचना अशी की, भूमीहीन शेतकऱ्यांना आपले पशुधन वाचविण्यासाठी अल्प दरामध्ये चारा देण्याबाबत आदेश देण्यात आले आहेत. पण यामध्ये थोडी सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. पशुधनाचे पालन करणाऱ्यांचे तीन वर्ग आहेत. खेड्यापाड्यातील एक वर्ग असा आहे की, ज्याच्याकडे जमीनच नाही. भूमीहीन आहे. जो शेतमजूर आहे परंतु तो गाई-म्हशी, शेळ्या-मेंढ्या पाळतो आणि त्यावर त्याचा संसार, त्याची गुजराण अवलंबून आहे. दुसरा शेतकरी अल्प भू-धारक आहे आणि तिसरा सधन शेतकरी आहे.पण दुष्काळाचे चटके सर्वांनाच बसत आहेत. मी या निमित्ताने शासनाला अशी विनंती करीन की, जो भूमीहीन,शेतमजूर आहे, जो पशुधनाचे पालन करीत आहे त्याला मात्र शासनाने मोफत चारा देण्याची आवश्यकता आहे. एवढेच नाहीतर तो चारा उचलून नेण्याचीही ज्याची तयारी नाही, त्याला तो घरपोच करावा असे मी म्हणणार नाही. पण गावपोच तरी करावा कारण या शेतमजुराची टेम्पोकरता 400-500 रुपये भाडे देण्याची कुवत नाही याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, माझी दुसरी मागणी अशी आहे की, जे अल्प भू-धारक शेतकरी आहेत त्याबाबतीत शासकीय व्याख्या आहे. या शेतकऱ्याकडे गाई-म्हशीचे पालन केले जाते, त्याला सवलतीचा जो दर आहे त्यापेक्षा निम्म्या दराने चारा देण्याची आवश्यकता आहे. जे सधन शेतकरी आहेत त्यांना सवलतीच्या दराने चारा देण्यात यावा. त्याशिवाय राज्यातील पशुधन वाचणार नाही असे मी सांगू इच्छितो. त्याचबरोबर आपण विविध उपाययोजना करीत असताना अजूनही काही गावागावांमध्ये थोडीफार गायराने शिल्लक आहेत. पण ही गायराने शिवकालीन काळामध्ये देण्यात



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भगवानराव साळुंखे . . . .

आली आणि पशुधन जतन करणे हा त्यामागचा हेतू आहे. ती गायराने सामाजिक वनीकरणाच्या माध्यमातून जतन करुन त्यातून चारा लागवड प्रकल्प कसा राबविता येईल असाही विचार करावयास पाहिजे. नाहीतर नेमेची येतो पावसाळा याप्रमाणे नेहमीच टंचाईची परिस्थिती निर्माण होते आणि मग आपण तात्पुरत्या उपाययोजना करतो. मात्र पुढच्या अधिवेशनामध्ये तशाच प्रकारच्या चर्चा सदनामध्ये पुन्हा-पुन्हा मांडल्या जातात आणि ही बाब तुम्हाला आणि आम्हाला कोणालाच भूषणावह नाही. म्हणून टंचाईमुक्त महाराष्ट्र करण्याच्या दृष्टीकोनातून या बाबतीत दूरगामी उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय, तसेच पाण्याचे दुर्भिक्ष हा फार मोठा विषय आहे. यासाठी शासनाच्या माध्यमातून देखील बऱ्याच उपाययोजना केलेल्या आहेत. त्यातील काही उपायांकडे मी आपले लक्ष वेधत आहे.आपल्याकडे खूप पाझर तलाव आहेत पण माननीय डॉ.पतंगराव कदमसाहेब आपल्याही जिल्ह्यामध्ये आणि इतर सर्व जिल्ह्यामध्ये असलेले पाझर तलाव हे गाळाने भरलेले आहेत. त्यामुळे त्यातील गाळ काढण्याची नितांत आवश्यकता आहे.काही पाझर तलावांची खोदाई करण्याची आवश्यकता आहे.काही पाझर तलावांची डागडुजी करण्याची आवश्यकता आहे आणि काही पाझर तलावांची ऊंची वाढविण्याची आवश्यकता आहे. सभापती महोदय, आपण राजेवाडीचा पाझर तलाव पाहिला तर तो ब्रिटीशकालीन आहे. त्याची डागडुजी करण्याची आवश्यकता आहे

सभापती महोदय, दुसरा मुद्दा असा की, आपण अलीकडे नवीन पाण्याच्या योजना काढत आहोत. परंतु जुनी पारंपारिक काही तळी आहेत. त्याची डागडुजी करणे आणि त्यासंदर्भात उपाय योजना करणे गरजेचे आहे. कारण पाण्याचे जे स्त्रोत आहेत, ते आपल्याला टिकवावे लागतील. अशा वेळी जुने स्त्रोत बुजवा आणि नवीन तयार करा आणि त्यातून आम्ही काहीतरी नवीन करुन दाखवित आहोत,आम्ही फार मोठे काहीतरी अभियांत्रिकी स्वरुपाचे करीत आहोत असे म्हणण्यामध्ये काही स्वारस्य नाही याकडेही मी मुद्दाम लक्ष वेधू इच्छितो.

सभापती महोदय, मी एका गोष्टीकडे शासनाचे लक्ष वेधू इच्छितो. माझ्या सांगली जिल्ह्यात 10-10, 15-15 गावांसाठी पाण्याच्या योजना सुरु केल्या होत्या. पण त्या योजना बंद आहेत. या योजना कशा प्रकारे पुन्हा सुरु करता येतील आणि पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष कसे दूर करता येईल यासाठी देखील प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे अशी मी शासनाला विनंती करीत आहे. एवढे बोलून मी माझे भाषण संपवितो.





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती (श्री.मोहन जोशी)** : यानंतर सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी एक मिनिटामध्ये आपले विचार मांडावेत.त्यानंतर 11.30 वाजता माननीय मंत्री महोदयांचे उत्तर सुरु होईल.

श्री.हेमंत टकले (विधानसभेव्दारा निर्वाचित) : सभापती महोदय, आता सन्माननीय मंत्री महोदयांचा फारसा वेळ घेण्याची आवश्यकता नाही. परंतु या चर्चेमध्ये सर्व सन्माननीय सदस्यांना सहभागी होताना खूप बरे वाटले असते. याठिकाणी आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदचंद्रजी पवार साहेबांबद्दल उल्लेख करण्यात आला. मला असे वाटते की, त्या भागातील लोकसभेचे प्रतिनिधी म्हणून आणि त्यांच्या कर्तव्याचा भाग म्हणून त्यांनी आपल्या भागातील दुष्काळाच्या संबंधात पहाणी करण्याकरता आणि त्यादृष्टीने उपाययोजना करण्याकरता कृषी मंत्री म्हणून नाही तर एक लोक प्रतिनिधी या नात्याने आढावा घेतला होता.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले..

त्यानंतर या विषयाला चालना मिळाली असेल तर ते चांगले आहे. या ठिकाणी अनेक सन्माननीय सदस्यांनी मुद्दे मांडलेले आहेत. मला देखील काही मुद्दे मांडावयाचे होते, परंतु वेळे अभावी मी फक्त दोन-तीन मुद्दे मांडणार आहे. इंग्रजीमध्ये एक म्हण आहे "Every crisis brings opportunities." कोणतीही आव्हानात्मक परिस्थिती आली की जनतेची सेवा करण्याची चांगली संधी आहे असे समजून सरकारने काम केले पाहिजे.

सभापती महोदय, इंग्रजीमध्ये आणखी एक म्हण आहे की "Where there is a will, there is a way" आजच्या सरकारमध्ये तशी इच्छा शक्ती आहे. परंतु आजच्या प्रशासन यंत्रणेमध्ये त्या इच्छा शक्तीचा अभाव असेल, दुष्काळ असेल तर आपणास दुष्काळी परिस्थितीचा सामना करता येणार नाही.

सभापती महोदय, शासनाचे इतर विभाग चांगल्या प्रकारे काम करीत नसल्यामुळे सर्व भार पुनर्वसन व मदत कार्य विभागावर येतो की काय असा मला प्रश्न पडतो. इतर विभागांनी चांगले काम केले तर त्या विभागाला इतके काम करावे लागणार नाही आणि सर्वांच्या स्वप्नातील सुजल,संपन्न असा महाराष्ट्र घडविता येईल अशीच माझी या मागची धारणा आहे. आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपले आभार मानून माझे दोन शब्द पूर्ण करतो.

------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम (पुनर्वसन व मदत कार्य मंत्री ) : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी नियम 97 अन्वये उपस्थित केलेल्या अल्पकालीन चर्चेवर शिवसेना पक्षाचे गट नेते श्री.दिवाकर रावते, सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, रमेश शेंडगे, पांडुरंग फुंडकर, दीपकराव साळुंखे, धनंजय मुंडे, विनायक मेटे, परशुराम उपरकर, डॉ.नीलम गोऱ्हे, सन्माननीय सदस्य सर्वश्री. भगवान साळुंखे आणि हेमंत टकले यांनी आपापले विचार मांडले.

सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.विनोद तावडे यांनी अत्यंत तडफेने आणि अत्यंत जिव्हाळ्याने पाण्याच्या प्रश्नापासून जनावरांच्या चाऱ्यापर्यंत आणि इतर अडचणींबाबत आपली मते मांडली. त्यांच्या आणि आमच्या मतामध्ये काही फरक आहे असे मला बिलकूल वाटत नाही. दुष्काळी परिस्थितीमध्ये सापडलेल्या जनतेला मेहरबानी म्हणून नव्हे तर कर्तव्य म्हणून मदत करणे हे शासनाचे कर्तव्य आहे.

सभापती महोदय, मला या गोष्टीचे दु:ख होत आहे की, या ठिकाणी सातत्याने सातारा आणि सांगली जिल्ह्यामध्ये दुष्काळ आहे अशी चर्चा होत होती. फक्त सांगली आणि सातारा जिल्ह्यामध्येच दुष्काळ आहे काय या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे आहे. संपूर्ण महाराष्ट्र एक आहे आणि या महाराष्ट्रातील जनता एक आहे. अडचणीत सापडलेल्या जनतेला मदत करणे हे शासनाचे कर्तव्य आहे. तेव्हा असे विभाग पाडून त्यावर चर्चा करण्याची आवश्यकता नाही.

सभापती महोदय, शासन स्व.श्री.यशवंतराव चव्हाण यांची जन्मशताब्दी साजरी करीत आहे. श्री.यशवंतराव चव्हाण मुख्यमंत्री झाले तेव्हा श्री.माडखोलकरांनी त्यांना प्रश्न विचारला की, हे राज्य कोणाचे आहे ? त्यांच्या प्रश्नाचा रोख हे राज्य मराठ्यांचे आहे काय असा होता. माननीय श्री.यशवंतरावांनी त्यांना उत्तर दिले "हे राज्य सर्वांचे आहे, महाराष्ट्रात राहणाऱ्या लोकांचे हे राज्य आहे आणि त्याच परिसरातील देवराष्ट्रे नंतर चार कि.मी.अंतरावरील सोनसळ गावातून मी आलो आहे." तेव्हा आम्ही फक्त दोन जिल्ह्यांतील लोकांच्या अडचणी पाहतो अशा प्रकारच्या कल्पना मेहरबानी करुन कोणी करु नयेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी या ठिकाणी एक मुद्दा उपस्थित केला. माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार साहेब हे त्यांच्या मतदारसंघातील दुष्काळी भागांची

..3..

डॉ.पतंगराव कदम..

पाहणी करण्यासाठी गेले होते. त्यांनी तेथील दुष्काळी परिस्थिती पाहिल्यानंतर सरकारला जाग आली असे सांगण्यात आले, परंतु तसे बिलकूल नाही. मी या ठिकाणी नमूद करु इच्छितो की, मंत्रिमंडळाने पुनर्वसन व मदत कार्य मंत्री यांच्या म्हणजे माझ्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची एक सब कमिटी नेमलेली आहे. या कमिटीची बैठक मी दर मंगळवारी घेतो. मी सर्व सभासदांना सांगितले आहे की, दर मंगळवारी दुपारी 3.00 वाजता बैठक होईल. तसेच सर्व पालक मंत्री महोदयांनी या बैठकीस उपस्थित रहावे अशी मी त्यांना विनंती केलेली आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते व सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी देखील युतीच्या काळात मंत्री म्हणून काम केलेले आहे.

यानंतर श्री.बरवड..

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम ....

या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी काही बाबी सांगितले. मी सांगू इच्छितो की, शासनाने सर्व जी.आर. एकत्र केले आणि सर्व विधानसभा व विधान परिषदेच्या सदस्यांना दिले. कारण अधिकारी नेहमी सांगतात की, आम्हाला जी.आर मिळाला नाही, आम्हाला आदेश आले नाहीत. हे जे जी.आर. कशाला काढले आहेत, त्यांचा काही उपयोग नाही असे सांगण्यात आले. सरकारचे आदेश किंवा जी.आर. असल्याशिवाय अधिकारी काही करु शकत नाहीत. मग जी.आर काढले हे आम्ही चुकीचे केले आहे का ? आपल्याकडे नवीन काही तंत्रज्ञान असेल तर आम्हाला सांगावे. आम्ही सर्व जी.आर. काढले. केव्हा आणि कशी ॲक्शन घेतली आहे ते मी तारखेवार सांगतो. ते जी.आर. आम्ही लोकांपर्यंत पोहोचविले आणि जिल्हाधिकाऱ्यांना सांगितले की, एक सेल निर्माण करा आणि रोजच्या रोज माहिती घ्या. शेवटी गाव पातळीवर कशी अंमलबजावणी होते हा सगळ्यात महत्वाचा विषय आहे. आमच्याकडून जी.आर. निघाले. जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत आदेश गेले. ते आदेश तहसीलदारांपर्यंत गेले. यामध्ये महत्वाचा निर्णय पाण्याच्या संदर्भात आहे. पाण्याचा निर्णयाचा 50 टक्के आणेवारीशी काही संबंध नाही. एखाद्या गावामध्ये 50 टक्के सरासरी आणेवारी नसेल तर त्या ठिकाणी पाणी द्यावयाचे नाही का ? पाणी देण्याचा आराखडा वेगळा आहे. त्याला आपण 50 टक्केचा क्रायटेरिया लावत नाही. गेल्या वर्षी 110 कोटी रुपये खर्च केले. आता सुध्दा यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना 25 लाख रुपयांचे आणि आयुक्तांना 1 कोटी रुपयांचे अधिकार दिलेले आहेत. आयुक्तांना सांगितले आहे की, यासाठी प्रस्ताव आल्याबरोबर रोजच्या रोज ते मंजूर झाले पाहिजेत. अशा प्रकारचे आदेश माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले आणि आम्ही त्या पध्दतीचे आदेश आयुक्तांना आणि जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत. नाही तर प्रस्ताव पाठवल्यानंतर पुन्हा महिना पंधरा दिवस तो धूळ खात पडणार, असे टंचाईमध्ये चालणार नाही. अशा पध्दतीचे अनेक ठोस निर्णय घेतले. दुष्काळी जनतेला पिण्याचे पाणी आणि जनावरांना चारा या बाबी अतिशय महत्वाच्या आहेत.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी सांगितले की, लोकांचे स्थलांतर व्हावयास लागले आहे. या राज्यामध्ये एकाही जिल्ह्यामध्ये चाऱ्यासाठी आणि पिण्याच्या

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

डॉ. पतंगराव कदम ....

पाण्यासाठी आम्ही कोणाचेही स्थलांतर होऊ देणार नाही एवढे अभिवचन मी या सदनाला देतो. या पध्दतीचे निर्णय शासनाने घेतलेले आहेत. सन्माननीय सदस्यांनी पैशाची चिंता करु नये. दादा पैसे देतात का असे सन्माननीय सदस्य विचारत आहेत. यामध्ये दादांचा वगैरे काही संबंध नाही. यामध्ये आपण छोटे-मोठे राजकारण आणूच नका. शेवटी सरकार एक आहे. मंत्रिमंडळ निर्णय घेते. कोणी एकटा मंत्री निर्णय घेत नाही. यदाकदाचित बजेटला कट लागला तरी हरकत नाही. अतिवृष्टीच्या वेळी सुध्दा मीच मंत्री होतो. महाराष्ट्रामध्ये दोन वेळा अतिवृष्टी झाली. मी संपूर्ण महाराष्ट्रभर फिरलो. त्यावेळी ज्यांची काही तक्रार राहिली असा एकही जिल्हा राहिला नाही. दिवसभर फिरत होतो आणि संध्याकाळी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेऊन ताबडतोब निर्णय घेत होतो. बुधवारी समजेल असा जी.आर. काढत होतो. नाही तर जी.आर. काढणारे असे शहाणे असतात की ते कोणालाही समजणार नाही असा जी.आर.काढतात. सगळ्यांना समजेल असे जी.आर. आम्ही काढले. ते जी.आर. आणि पैसे लगेच जिल्हाधिकाऱ्यांकडे जात होते. रेव्हेन्यू खात्याची आपली यंत्रणा अजून सक्षम आहे. मी आपल्याला एका जी.आर.ची गंमत सांगतो. आताच एक पाच जनावरांचा जी.आर. निघाला. ज्या मोठ्या कमर्शियल डेअरीज आहेत त्यांना यातून वगळले होते. एक किंवा दोन म्हशी दूध देत असतील तर त्यांनाही कमर्शियल केले होते. या पध्दतीने काही चुकीचे निर्णय होतात. काना मात्रा पाहून प्रशासन काही निर्णय घेताना चुकते.

सभापती महोदय, या पध्दतीने आदेश काढल्यानंतर श्री. शरद पवार जाऊन आले. लगेच चर्चा सुरु झाली की, आताच जाग आली. श्री. शरद पवार खर्डा-भाकरीबाबत म्हणाले. हे सर्व मिडियामधील आहे. त्यांना माननीय राज्यपालांबद्दल काय म्हणावयाचे होते ? अनुशेषाबद्दल आपण ठराव करुन त्यांना अधिकार दिले असल्यामुळे आपण दुष्काळासाठी वेगळे पैसे द्यावेत असे म्हणतो पण आपण ते देऊ शकत नाही. त्याला माननीय राज्यपालांची मान्यता पाहिले. काल सर्वपक्षीय आमदार माननीय राज्यपालांना भेटले. परवा माननीय राज्यपालांनी मला आणि आमचे तीन सचिव, पाणीपुरवठा विभागाच्या श्रीमती मालिनी शंकर, श्री. प्रवीण परदेशी आणि श्री. गिरीराज, आम्हाला त्यांनी माहिती घेण्यासाठी बोलविले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम...

तेव्हा राज्यपालांना या विषयामध्ये ओढणे आणि त्यांच्यासंबंधी सदनामध्ये चर्चा करणे बरोबर होणार नाही. यापूर्वी पडलेल्या दुष्काळाच्या वेळी आम्ही तत्कालीन राज्यपाल श्री.महंमद फजल यांना भेटलो होतो. त्यावेळी त्यांनी 1500 कोटी रुपये दिले होते, परंतु दुसऱ्याच दिवशी वैधानिक विकास मंडळाने ते कापून घेतले होते. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांना मी सांगू इच्छितो की, आमच्या भागावर सुध्दा अन्याय होत असतो. हे शासन विदर्भावर अन्याय करु शकत नाही. कारण आम्ही विदर्भातील 63 आमदारांमुळेच सत्तेमध्ये बसलो आहोत. ते जर सरकारच्या पाठीमागे नसते तर आम्ही सत्तेमध्ये बसू शकलो नसतो. त्यामुळे सरकारचे विदर्भावर अधिक लक्ष आहे. त्याचप्रमाणे मराठवाड्यावर जास्त लक्ष आहे. कोकणावर सुध्दा लक्ष आहे. त्यांनी पाणी अडविले पाहिजे. खानदेशावर अधिक लक्ष आहे. स्व.यशवंतराव चव्हाण यांनी आपल्याला संस्कृती दिलेली आहे. त्या संस्कृतीनुसार सबंध महाराष्ट्राचा विकास झाला पाहिजे. हा महाराष्ट्र एक राहिला पाहिजे. खऱ्या अर्थाने त्याची प्रगती झाली पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे.

सन्माननीय सदस्य श्री.भगवानराव साळुंखे यांना मी सांगू इच्छितो की, मी मागील दुष्काळाच्या वेळी 15 दिवसामध्ये बैठक घेत होतो. त्यावेळी अशी चर्चा सुरु होती की, पतंगराव कदम यांनी अधिकाऱ्यांना झापले आहे. तशी वस्तुस्थिती नव्हती. कारण सर्व आयएएस अधिकाऱ्यांशी माझे चांगले संबंध आहेत. कामाच्या वेळी काम झाले पाहिजे अशी शासनाची भूमिका आहे. त्यामध्ये आणि आमच्यामध्ये हेवादावा असण्याचे कारण नाही. माननीय श्री.शरद पवार यांनी दुष्काळी भागाचा दौरा केल्यामुळे सरकारला जाग आली असे म्हणणे असत्य आहे. एवढेच मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

सभापती महोदय, मदत व पुनर्वसन मंत्री म्हणून माझ्या अध्यक्षतेखाली आतापर्यंत एकूण 9 बैठका झालेल्या आहेत. दिनांक 4 ऑक्टोबर, 2011 रोजी पहिली बैठक झाली होती. त्यानंतर दिनांक 12 ऑक्टोबर, 2011, दिनांक 8 नोव्हेंबर, 2011, दिनांक 24 नोव्हेंबर, 2011, दिनांक 30 नोव्हेंबर, 2011, दिनांक 2 जानेवारी, 2012, दिनांक 22 फेब्रुवारी, 2012, दिनांक 28 फेब्रुवारी, 2012 आणि दिनांक 6 मार्च, 2012 रोजी बैठक घेतलेली आहे. शासनाने खरीप

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पिकासाठी, पैसेवारीसंबंधी निर्णय घेतलेले आहेत. हंगामी पैसेवारी जाहीर करण्याची तारीख 15 सप्टेंबर होती आता सुधारित तारीख 31 सप्टेंबर आहे. 15 डिसेंबर पासून 15 जानेवारीपर्यंत घोषित करता येते. रब्बी हंगामाची हंगामी पैसेवारी जाहीर करण्याची तारीख 31 डिसेंबर होती, सुधारित हंगामाची हंगामी पैसेवारी 31 जानेवारी पर्यंत करता येते. त्याप्रमाणे दिनांक 28.9.2011 रोजी पहिला शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. त्यामुळे माननीय श्री.पवार साहेब आल्यामुळे सरकार जागे झ ााले असा सन्माननीय सदस्यांचा जो समज झालेला आहे तो खरा नाही. शासन निर्णयाप्रमाणे प्रत्येक हंगामात पैसेवारी घोषित करण्यात आली आहे. त्यामध्ये सातारा, सांगली, धुळे, नाशिक व अहमदनगर जिल्ह्यातील 958 गावे व 4 सुविधा देण्यात आल्या आहेत. दिनांक 3.1.2012 रोजीच्या शासन निर्णयात जनावरांसाठी चारा डेपो सुरु करणे, छावण्या उभ्या करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामध्ये 4 ऐवजी 6 सुविधा जाहीर केल्या आहेत. दिनांक 18.1.2012 रोजी अंतिम पैसेवारी घोषित झाल्यानंतर खरीप पैसेवारी शासन निर्णयात सुचवून घोषित करण्यात येऊन एकूण 6 सुविधा देण्यात आल्या. अंतिम पैसेवारी जाहीर करण्यात आलेल्या जिल्ह्यातील गावांची संख्या पुढील प्रमाणे आहेत. नाशिक जिल्ह्यातील 581 गावे, धुळे जिल्ह्यातील 147 गावे, नंदुरबार जिल्ह्यातील 4 गावे, अहमदनगर जिल्ह्यातील 431 गावे, लातूर जिल्ह्यातील 34 गावे, सातारा जिल्ह्यातील 274 गावे, सांगली जिल्ह्यातील 340 गावे, नागपूर जिल्ह्यातील 496 गावे, गोंदिया जिल्ह्यातील 50 गावे, गडचिरोली जिल्ह्यातील 1116 गावे, अमरावती जिल्ह्यातील 1981 गावे, बुलढाणा जिल्ह्यातील 747 गावे अशा एकूण 2600 गावांमध्ये 50 पैशापेक्षा कमी आणेवारी जाहीर झाली आहे. शासनाने निरनिराळ्या बाबींसाठी सूट दिलेली आहे. काही भागात दिवसेंदिवस परिस्थिती बदलत जाईल त्याची वेळोवेळी नोंद घेण्यात येईल. जमीन महसुलात सूट दिलेली आहे. सरकारी कर्जाचे रुपांतर केलेले आहे. वीज बिलामध्ये 33 टक्के सूट दिलेली आहे, रो.ह.योा.अंतर्गत घेण्यात येणाऱ्या कामांच्या निकषांमध्ये बदल केलेले आहेत. परीक्षा शुल्कामध्ये सूट दिलेली आहे. शेतीशी निगडित असलेल्या कर्जाच्या वसुलीस स्थगित दिलेली आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई दूर करण्यासाठी टँकर्स व बैलगाड्यांमार्फत पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे.

3...



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**तालिका सभापती ( श्री.मोहन जोशी )** : मंत्री महोदय, सभागृहाची वेळ 11.45 पर्यंत आहे. आपले उत्तर पूर्ण होण्यासाठी सभागृहाची वेळ वाढवावी लागेल. आपल्याला उत्तरासाठी आणखी किती वेळ लागणार आहे ते आपण सांगावे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, माझे उत्तर पूर्ण होण्यासाठी मला आणखी 10 मिनिटांचा वेळ लागणार आहे.

**तालिका सभापती** : सभागृहाची वेळ दुपारी 12 वाजून 5 मिनिटांपर्यंत वाढविण्यात येत आहे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी वीज कनेक्शन तोडले जात असल्याचा मुद्दा मांडला होता. शासनाने खंडित वीज पुरवठा पूर्ववत करण्याबाबत अधिकाऱ्यांना सक्त आदेश दिलेले आहेत.

यानंतर श्री.शिगम....

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम....

सन्माननीय सदस्य श्री. पांडुरंग फुंडकर यांनी जो मुद्दा उपस्थित केला होता त्याबाबत मी सांगू इच्छितो त्यावेळी त्यांचा मेहता हजर होता. शेवटी सरकारने सांगितले की तुमची काही अडचण असेल तर सरकार पैसे भरेल. कुणाचीही वीज तोडायची नाही, तोडलेली वीज जोडायची अशा स्पष्ट सूचना दिलेल्या आहेत. खालच्या स्तरावर कुणी गडबड केली तर त्याच्यावर कारवाई करण्यात येईल.

महाराष्ट्र शासनाने रब्बी पिकांची हंगामी पैसेवारी घोषित केली. त्यामध्ये 9 सुविधा दिलेल्या आहेत. अहमदनगर 337, उस्मानाबाद 116, सातारा 75,सांगली 90, सोलापूर 505,गडचिरोली 78 अशी 1231 रब्बी गावे आहेत. रब्बी पिकांची अंतिम पैसेवारी शासनाने घोषित केलेली आहे. त्यामध्ये 10 सुविधा घोषित केलेल्या आहेत. त्यामध्ये नाशिक 636 औरंगाबाद डिव्हिजन 116, पुणे 86, सातारा 75, सांगली 103, सोलापूर 476 गडचिरोली 90 अशी एकूण 1552 गावे आहेत. 9 फेब्रुवारी 2012 रोजी टंचाईसदृश्य परिस्थिती असलेल्या भागामध्ये करावयाच्या उपाययोजना बाबत शासनादेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या निर्णयाद्वारे चारा वाटप डेपो, गुरांच्या छावण्या, चारा खरेदीचे दर निश्चित करणे, चारा बियाणे देणे, केवळ ऊसाचे वाढे न देता कडबा, सुग्रास क्षेत्रातील चारा देणे, चारा उपलब्ध करण्याकरिता कृषी विद्यापीठ व महामंडळाची मदत घेणे अशा उपाययोजना केलेल्या आहेत. आम्ही 35 हजार हेक्टरवर चारा निर्माण केलेला असून 15 एप्रिल पासून हा ओला चारा मिळण्याची शक्यता आहे. सन्माननीय सदस्य श्री. भगवान साळुंखे यांनी ज्या सामान्य शेतक-याचा उल्लेख केला त्या छोट्या शेतक-याला चा-यासाठी 90 टक्के सबसिडी दिलेली आहे. फक्त 10 टक्के पैसे त्या शेतक-याने भरावयाचे आहेत. एका पंचायत समितीच्या गणामध्ये चारा डेपो उघडण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. एखाद्या गणामध्ये दूर अंतरावर गाव असेल तर त्या ठिकाणी देखील ट्रकद्वारे चारा पोहोचविण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. इतरांना चा-यासाठी 75 टक्के सबसिडी दिलेली आहे. त्यांनी फक्त 25 टक्के भरावयाचे आहेत. राज्यात 628गावे, 3100 वाडयांना टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येतो. गेल्या वर्षी 17 गावे आणि 27 वाडया होत्या. सध्या सातारा, सांगली, सोलापूर, अहमदनगर या ठिकाणी चारा डेपो आणि छावण्या उभारण्यात आलेल्या आहेत. अहमदनगरमध्ये 37 चारा डेपो आणि 2 छावण्या आहेत. आवश्यकते नुसार छावण्या सुरु करण्याच्या सूचना जिल्हाधिका-यांना दिलेल्या आहेत.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. पतंगराव कदम...

शासनाने काढलेल्या आदेशांची अंमलबजावणी करण्यामध्ये जी यंत्रणा कमी पडेल तिच्यावर कारवाई करण्यात येईल. आम्ही तहसीलदारांना सकाळी 7.00 वाजता बाहेर पडून दुपारी 12.00 वाजेपर्यन्त गावोगावी फिरुन परिस्थितीचा आढावा घेण्यास सांगितलेले आहे. प्रस्ताव आले नाहीत अशी सबब सांगू नका असेही त्यांना सांगितलेले आहे. पालकमंत्र्यांना मिटींग घेण्यास सांगिलेले आहे. तसेच नव्याने निवडून आलेल्या पंचायत समितीच्या सभापतींना देखील परिस्थितीचा आढावा घेण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. कर्नाटक राज्याला आपल्या राज्यातून पाणी पाहिजे. त्यासाठी आज दुपारी 1.00 वाजता कर्नाटक राज्याचे तीन मंत्री आपल्या राज्याच्या माननीय मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहेत. आम्ही देखील कर्नाटकच्या मंत्र्यांना पडसलगी धरणातून पाणी देण्यास सांगितलेले आहे. या दुष्काळी परिस्थितीमध्ये केवळ माणसांनाच नाही तर जनावरांना देखील पाणी मिळाले पाहिजे, जनावरांना चारा मिळाला पाहिजे या दृष्टीने शासनाने व्यवस्था केलेली आहे. विहिरीत पाणी टाकले...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.पतंगराव कदम........

म्हणजे पाणी दूषित होते. म्हणून गावागावात सेंटेक्सच्या टाक्या लावाव्यात असे सांगितले आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी देखील माननीय सहकार मंत्र्यांना सांगितले की, सगळ्या साखर कारखान्यांना सांगून आपापल्या भागामध्ये त्यांच्या निधीतून सेंटेक्सच्या टाक्या बसवून घ्याव्यात. जेथे शक्य होणार नाही तेथे डीपीडीसी किंवा ग्रामपंचायतीच्या माध्यमातून हे काम केले जावे. जेणेकरुन पाणी दूषित न होता स्वच्छ राहील. अशा पध्दतीचे ठोस धोरणात्मक निर्णय पूर्ण झालेले आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी आणेवारीचा मुद्दा उपस्थित केला आहे. या संदर्भात यापूर्वी श्री.भगवंतराव गायकवाड समिती नेमली होती, श्री.नारायण राणे यांची समिती नेमली होती. समित्या नेमल्या, परंतु त्यांनी काहीही सुचविलेले नाही. पुन्हा एखादी समिती नेमू. त्या समितीमध्ये आमदारांना सुध्दा घेऊ. ज्यांचा प्रत्यक्ष अनुभव आहे, अशा लोकांना या समितीमध्ये घेऊन हे बरोबर आहे की नाही याची पुन्हा एकदा तपासणी करावी. दुष्काळी भागाबद्दल आपण सगळ्यांनी चांगल्या भावना व्यक्त केल्या आहेत. राज्यात कायम दुष्काळी तालुके आहेत. त्यांच्या संदर्भात यापूर्वी पारदासानी समिती, सुकथनकर समिती, वि.म.दांडेकर समिती नेमली होती. दुष्काळी भागासाठी वेगळा निधी प्राधान्याने देऊ शकलो नाही. दुष्काळी महामंडळाचा विषय हवेतच आहे. ते महामंडळ जमिनीवर कधी उतरलेच नाही. म्हणून वेगळया पध्दतीने विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, श्री.शिवाजीराव निलंगेकर या राज्याचे मुख्यमंत्री असताना तेलगू देशम पक्षाच्या निमित्ताने सभागृहामध्ये ठराव संमत झाला होता. संपूर्ण बजेटची रक्कम खर्च करुन कृष्णा खोऱ्याचे आपल्या वाट्याला आलेले पाणी अडविण्यात यावे असा तो ठराव होता. पुढे काय झाले? आंध्रप्रदेश राज्यात निवडून आलेला नट मुख्यमंत्री झाला आणि त्यांनी धडाक्यात धरणे बांधून टाकली. आपण मात्र काही करु शकलो नाही. सांगलीतून चार कि.मी.अंतरावरुन कर्नाटकात पाणी जाते. म्हणून ताकारी, टेंभू, म्हैसाळ योजना पूर्ण करावयाचा निर्णय झाला. यासाठी धरणे बांधावी लागणार नाहीत. फक्त पाणी उचलायचे आहे. त्या कामाला सुध्दा अनुशेषातून पुरेसा निधी मिळू शकला नाही. योजना रखडत आहेत. पाण्यासाठी ताकारी, टेंभू आणि म्हैसाळ योजनेचे टंचाईच्या काळातील वीज बिल त्यामुळे शासनाने भरण्याचा निर्णय घेतला.

..2..



डॉ.पतंगराव कदम........

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती महोदय, पाणी टंचाईच्या संदर्भात माननीय मुख्यमंत्र्यांनी अनेक बैठका घेतल्या. या ठिकाणी असा प्रश्न उपस्थित केला की, बैठकीला आम्हाला का बोलावले नाही? त्यांना का बोलावले नाही? एक दिवस सातारा जिल्हयात दौरा झाला. एक दिवस सांगली जिल्हयात दौरा झाला. अधिवेशन समाप्तीनंतर शक्य होईल त्या जिल्हयांमध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना मी सोबत घेऊन जाईन. माननीय मुख्यमंत्र्यांना शक्य झाले नाही तर मी स्वत: जाईन. माननीय सदस्यांनी या ठिकाणी भावना व्यक्त केल्या की, शासनाचे फक्त सातारा आणि सांगली जिल्हयाकडेच लक्ष आहे. माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांना मी सांगू इच्छितो की, चंद्रपूर जिल्हयामध्ये सुध्दा मी बैठक घेईन. मी अनेकदा त्या जिल्हयात येतो. त्यांचे प्रश्न ऐकून घेण्यामध्ये कोणतीही अडचण नाही. विदर्भावर आमचे विशेष प्रेम आहे. विदर्भामुळेच आम्ही या सभागृहात बसलो आहोत हे मी सभागृहाच्या पटलावर बोललेलो आहे. विदर्भ, मराठवाडा आणि राज्यातील इतर ज्या भागातील टंचाईग्रस्त माणूस आहे त्याला पाणी, चारा देण्याचे सरकारचे कर्तव्य आहे. या भूमिकेतूनच आम्ही निर्णय घेतले आहेत. माननीय केंद्रीय मंत्री श्री.शरद पवार यांनी पाहणी दौरा केला म्हणून राज्याचे मंत्रीमंडळ तेथे गेले असे म्हणू नका. अशा प्रकारची राजकीय चर्चा बंद करण्यात यावी. सगळ्या विषयाबाबत आम्ही निर्णय घेतले आहेत. सोयाबीनच्या संदर्भात विषय उपस्थित करण्यात आला आहे. आतापर्यंत विभागाने 1300 कोटी रुपये शेतकऱ्यांपर्यंत वाटले आहेत. निकष होते त्याप्रमाणे काम केलेले आहे. सोयाबीनच्या संदर्भात निर्णय घेता येणार नाही. माननीय मुख्यमंत्र्यांशी चर्चा करावी लागेल, कॅबिनेटपुढे बाब ठेवावी लागेल असा तो विषय आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी उत्तम चर्चा या ठिकाणी केली. चांगल्या भावना या ठिकाणी मांडल्या आहेत. पालक सचिवांबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी सूचना दिलेल्या आहेत. पालकमंत्र्यांना सूचना दिल्या तशाच सूचना पालक सचिवांना दिल्या आहेत. पालक सचिवांना सुध्दा माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले..........

.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

PFK/ D/ MMP/ पूर्वी श्री. भोगले...... 11:55

डॉ. पतंगराव कदम .......

हे सर्व लोक अधिवेशन असल्यामुळे आपल्या कामात मग्न आहेत. पण अधिवेशन संपल्यानंतर पालक मंत्री आणि पालक सचिव सुध्दा दुष्काळी जिल्ह्यात जाऊन त्या त्या भागातील जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांनी कोणती कामे करावयाची अशी चर्चा करतील व यातून मार्ग काढण्यात येईल असा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्यामुळे राज्यात कोणीही पाण्यावाचून राहणार नाही, कोणावरही स्थलांतरित होण्याची वेळ येणार नाही, कारण शासन त्यासाठी तत्पर आहे, कटिबध्द आहे, चिंता करण्याचे कारण नाही. एवढे सांगून माझे भाषण पूर्ण करतो.

श्री. विनोद तावडे : महोदय, मी राईट टू रिप्लाय म्हणून बोलत नाही तर मंत्री महोदयांनी आपल्या उत्तरात कोणत्याही प्रकारचे ठोस आश्वासन किंवा उपाययोजना सांगितलेली नाही. मंत्री महोदय हे स्वभावाने जसे मोकळे-ढाकळे आहेत तसे त्यांचे उत्तरही मोकळे-ढाकळेच असते. त्यात स्पेसिफिक असे काहीच नसते. सन्माननीय सदस्यांनी सभागृहात दुष्काळाच्या अनुषंगाने जे जे मुद्दे उपस्थित केले त्यांची उत्तरे मिळाली नाहीत. सदस्यांनी आणेवारी कशी मोजायची, जेथे आणेवारी चुकीची लावण्यात आली, शेतात न जाताच आणेवारी लावण्यात आली त्याची चौकशी करणार काय, असे अनेक प्रश्न उपस्थित केले पण त्यांची उत्तरे मंत्री महोदयांसारख्या दमदार मंत्र्यांना शोभतील अशी दिली गेली नाहीत. यासंदर्भात वास्तविक त्यांनी सभागृहातच घोषणा करायला पाहिजे होती. त्याचबरोबर रोजगार हमी योजनेच्या बाबतीत सांगली जिल्ह्यातील जी परिस्थिती माननीय गृह मंत्री श्री. आर.आर.पाटील यांनी उघड केली, त्यानंतर टी.व्ही. चॅनेल्सवरुन सुध्दा दाखविण्यात आली त्यासंदर्भात काहीच भाष्य केले नाही. मी सुध्दा सांगितले की, राज्यात दुष्काळी माफियांची वाढ होत असून त्याला पायबंद घालण्याची कारवाई शासन करणार काय, याला आपण उत्तर दिले नाही. तसेच दुष्काळासंबंधी उपाययोजना करण्याबाबत किती प्रस्ताव शासनाकडे आले व किती मंजूर झाले याचेही स्पेसिफिक उत्तर दिलेले नाही.

मंत्री महोदयांनी दर मंगळवारला संध्याकाळी मंत्रालयाच्या केबिनमध्ये जे निर्णय घेतले ते केवळ कागदावरच राहिले. त्यात आपण सांगितले की, चाऱ्याचा पुरवठा करण्यासाठी राज्यात चारा डेपो निर्माण करण्याचा निर्णय घेतला, छावण्या उघडण्याबाबत ठरविण्यात आले. तसेच 3 फेब्रुवारी, 2012 चा जो जी.आर. आहे त्याची अंमल बजावणी मात्र झालीच नाही, यासंदर्भात कोणती कारवाई करणे आवश्यक आहे याचेही उत्तर

....2



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

मिळाले नाही. मी मंत्री महोदयांना विनंती करु इच्छितो की, राज्यातील सामान्य माणसाला अपेक्षा आहे की, मंत्री महोदयांच्या उत्तरातून दुष्काळाच्या संदर्भात काही तरी ठोस आश्वासन किंवा निर्णय होईल, पण तसे काहीच घडले नाही. म्हणून ज्यांनी शासनाच्या जी.आर. ची अंमल बजावणी केली नाही त्यांच्यावर कारवाई करुन दुष्काळाच्या निमित्ताने ठराविक पॅकेज घोषित करण्याचा निर्णय शासन घेणार आहे काय ?

डॉ. पतंगराव कदम : महोदय, पैशाचा प्रश्न नाही असे मी सुरुवातीलाच सांगितले आहे. दुष्काळावर मात करण्यासाठी जितका पैसा लागेल तेवढा खर्च करण्याची शासनाची तयारी आहे असे मी सांगू इच्छितो. त्यानंतर सांगली जिल्ह्यातील शेडवळ या गावाबाबत जो मुद्दा उपस्थित करण्यात आला त्याबाबत मी सभागृहाला माहिती देऊ इच्छितो की, या गावात रस्त्याच्या कडेला खूप काम झालेले आहे. तरी देखील याबाबतची वस्तुस्थिती काय आहे याची चौकशी करण्याचे आदेश आम्ही दिलेले आहेत व असे का घडले हे यातून बाहेर येईलच. त्यानंतर टँकर व दुष्काळ माफियाच्या संदर्भात मी एवढेच म्हणेन की, "People's calamity should not become somebody's opportunity." असे होता कामा नये व ते आम्ही होऊ देणार नाही. आणेवारी चुकीची काढली तर त्याचीही चौकशी करण्यात येईल. तसेच आजपर्यंत भगवंतराव गायकवाड समिती, माननीय राणे समिती आणि आता पुन्हा एक समिती नेमून शासनाच्या वतीने प्रयत्न करण्यात येतील, एवढेच मी सांगू इच्छितो.

**तालिका सभापती (श्री. मोहन जोशी)** : अल्पकालीन चर्चा संपली आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन दुपारी 12.15 वाजता पुन: भरेल.

( सभागृहाची बैठक 11.59 ते दुपारी 12.15 वाजेपर्यंत स्थगित झाली )

------

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगितीनंतर)

( सभापतीस्थानी माननीय सभापती )

**पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे**

**मुंबईतील मिठी नदी मलनि:सारण वाहिनी बदलण्याचे काम काळया यादीतील कंत्राटदाराला दिल्याबाबत**

**(१) * २५४३६ श्री.किरण पावसकर , श्रीमती उषाताई दराडे , श्री.प्रकाश बिनसाळे , श्री.हेमंत टकले , श्री.जयवंतराव जाधव , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.राजन तेली :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील मिठी नदी मलनि:सारण वाहिनी बदलणे तसेच इतर विकासकामात अनियमितता केल्यामुळे काळ्या यादीत टाकलेल्या आर.पी.शहा या कंत्राटदाराला १५ पादचारी पुलाचे कंत्राट दिल्याचे माहे जानेवारी, २०१२ च्या पहिल्या सप्ताहात उघडकीस आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (१), (२) व (३)

मे.आर.पी.एस.इन्फ्रोप्रोजेक्टस् ही कंपनी सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणीकृत नाही. सदर कंपनी शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडे नोंदणीकृत आहे. त्या आधारे मे.आर.पी.एस.इन्फ्रोजोक्टस् यांना महानगरपालिकेच्या वतीने "बांधा, वापरा व हस्तांतरीत करा" अशा तत्वावर बांधण्यात येत असलेल्या पादचारी पुलांचे कंत्राट, त्यांनी सर्वाधिक आर्थिक देकार सादर केल्यामुळे व बृहन्मुंबई महानगरपालिकेला सदर देकार आर्थिकदृष्ट्या फायदेशीर असल्याने, देण्यात आले आहे.

सदर कंत्राटदाराने मिठी नदीच्या मलनि:सारण वाहिनीच्या कामामध्ये गैरव्यवहार केल्याचे आढळून आलेले नाही. तसेच सदर कंत्राटदारास महानगरपालिकेने काळ्या यादीत टाकलेले नाही. मात्र संजय नगर शाळेच्या (शिवाजी नगर, गोवंडी) इमारतीचे पुनर्बांधकामाच्या कामात दिरंगाई केल्यामुळे सदर कंत्राटदारास "अअ" वर्गातून 'अ' वर्गात पदावनती देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, मुंबईतील मिठी नदी मलनि:सारण वाहिनी बदलणे तसेच इतर विकासकामांतर्गत काळया यादीत टाकलेल्या आर.पी.शहा या कंत्राटदाराला तसेच यासंदर्भात आपण दिलेल्या माहितीच्या आधारे मे.आर.पी.एस.इन्फ्रोप्रोजेक्टस् या कंत्राटदाराला सन २०१२ मध्ये मुंबईतील १५ पादचारी पुलाचे काम दिलेले आहे हे खरे आहे का? असा प्रश्न विचारला असून त्यासंदर्भात उत्तरामध्ये असे सांगण्यात आले आहे की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर .....

**ता.प्र.क्र. : २५४३६** ......

मे.आर.पी.एस.इन्फ्रो प्रोजेक्टस् ही कंपनी सद्य:स्थितीत बृहन्मुंबई महानगरपालिकेमध्ये नोंदणीकृत नाही. तसेच पुढे असे म्हटले आहे की, संजय नगर शाळेच्या (शिवाजी नगर, गोवंडी) इमारतीचे पुनर्बांधकामाच्या कामात दिरंगाई केल्यामुळे सदर कंत्राटदारास "अअ" वर्गातून "अ" वर्गात पदावनती देण्यात आली आहे. जर या कंत्राटदाराची नोंदणी महानगर पालिकेत नसतांना त्यांना मुंबई महानगर गपालिकेच्या वतीने उपनगरात १५ पादचारी पूल बांधण्याचे काम दिलेले आहे. १५ पुलासाठी २५ कोटी रुपये खर्च आला असून तो जाहिरातीमधून घेण्यात यावा अशा पध्दतीने सदर कंत्राट झाले आहे हे खरे आहे काय ? उत्तरात पुढे असे म्हटले आहे की, सदर कंत्राटदाराला पदनवती दिली आहे. त्यामुळे सदर कंत्राटदाराला काळया यादीत टाकले आहे हे खरे आहे काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सदर ठेकेदाराला काळया यादीत टाकलेले नाही असे लेखी उत्तरात स्पष्ट म्हटलेले आहे. सदर कंत्राटदार महानगरपालिकेचे रजिस्टर कंत्राटदार नसतील तर त्यांना काम का देण्यात आले असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून त्यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, आपल्याकडे राज्य शासनाचा रजिस्टर कंत्राटदार व दुसरा महानगरपालिकेचा रजिस्टर कंत्राटदाराला काम दिले जाते. सदर कंत्राटदार हा सार्वजनिक बांधकाम विभागाचा रजिस्टर कंत्राटदार असल्यामुळे हा कंत्राटदार टेंडर घेण्यासाठी पात्र ठरु शकतो. "अअ" ग्रेडवरुन "अ" ग्रेड वर सदर कंत्राटदार का आलेला आहे असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला आहे. मी आपल्याला सांगू इच्छितो की, अनलिमिट टेंडर घेण्यासाठी रजिस्ट्रेशन केले जात असते परंतु त्या वर्षात त्यांना तेवढी कामे मिळू शकली नाही तर ज्यावेळेला लायसन्स रिन्युअल केले जाते त्यावेळेला ग्रेड अप-डाऊन होऊ शकते.

सदर पुलाच्या कामाचा ठेका २५ कोटी रुपयाना देण्यात आलेला आहे काय असा प्रश्न सन्माननीय सदस्यांनी विचारला असून मी यासंदर्भात सांगू इच्छितो की,



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : २५४३६** ......

श्री. भास्कर जाधव ....

हे सर्व १५ पूल कंत्राटदाराने बांधावयाचे असून कंत्राटदाराकडून महानगरपालिकेला ३८.४० कोटी रुपये मिळणार आहेत. पुलाच्या अगेन्स्ट हा कंत्राटदार पुलावर जाहिराती लावून सदर पैसे वसूल करणार आहे. यामध्ये महानगरपालिका स्वत:हून एक पैसा देखील खर्च करणार नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, मंत्रीमहोदयांनी आताच सांगितले आहे की, कंत्राटदाराने विशिष्ट वर्षात कंत्राट पूर्ण केले नाही तर अशा कंत्राटदारांना डाऊन ग्रेड केले जाते. उत्तरात म्हटले आहे की, संजय नगर शाळेच्या (शिवाजी नगर, गोवंडी) इमारतीचे पुनर्बांधकामाच्या कामात दिरंगाई केल्यामुळे सदर कंत्राटदारास "अअ" वर्गातून "अ" वर्गात पदावनती देण्यात आली आहे त्यामुळे खरी वस्तुस्थिती काय आह याबाबत माननीय मंत्री महोदयांनी माहिती द्यावी. सदर ठेकेदाराने सार्वजनिक बांधकाम विभागात जी कामे केलेली आहेत त्यासंदर्भात चौकशी करण्यात आलेली आहे काय ? कंत्राटदारांची अशा प्रकारची टेंडन्सी इतर कामात सुध्दा दिसून येत असते. त्यामुळे सदर कंत्राटदाराची सखोल चौकशी करुन तातडीने कारवाई केली जाणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25436...

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या मध्ये दोन गोष्टी आहेत. हे ओपन टेंडर होते. मे.आर.पी.एस.इन्फ्राप्रोजेक्टस प्रा.लि.कंपनीने रूपये 38 कोटी 40 लाख देण्याचे मान्य केले आहे. दुसरी कंपनी मे.राजदीप सुप्रा यांनी केवळ रूपये 11 कोटी 66 लाख देण्याचे काम केले आहे. या कंत्राटदाराने पीडब्ल्यूडी मध्ये काम केले आहे. तेथे काही चूक केली आहे काय, असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. या शाळेमध्ये काम करताना या कंत्राटदाराने दिरंगाई केली आहे. याचा अर्थ त्याने कामामध्ये विलंब केला आहे. त्याने किती दिरंगाई केली याची माहिती आता माझ्याकडे नाही. ती पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, मल निस्सारणाच्या वाहिन्या बदलण्यासाठी काम होते. या कंत्राटदाराने 96 कोटी रूपयांची खोटी बिले दाखवून 24 कोटी रूपये महानगर पालिकेकडून मिळविले आहेत. 550 कोटी रूपयांची रस्त्यांची कंत्राटे देण्यात आली त्यासंबंधी आपण या सदनामध्ये वारंवार बोलत आहोत. ज्यांची नावे काळ्या यादीमध्ये होती त्यांनाच ती कामे देण्यात आली आहेत. यावर देखील सभागृहात चर्चा झाली आहे. तरी देखील अशा कंत्राटदाराला वाचविण्याचे कारण काय आहे ? 96 कोटी रूपयांची खोटी बिले दाखवून या कंपनीने महानगर पालिकेकडून 24 कोटी रूपये मिळविले आहेत, हे सिद्ध झाले आहे. शाळेच्या कामामध्ये दिरंगाई झाली, हे देखील सिद्ध झाले आहे. एवढ्या गोष्टी वांरवार दाखविल्या नंतर महानगरपालिका कंत्राटदाराच्या मागे उभी रहात असेल तर त्यावर शासन कारवाई करणार आहे किंवा नाही ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, एक महत्त्वाचा प्रश्न येथे उपस्थित करण्यात आला आहे. या कंपनीला काळ्या यादीमध्ये टाकलेले नाही ही बाब माननीय राज्य मंत्र्यांनी अगदी स्पष्टपणे सांगितली आहे. या कंपनीने संजय नगर येथील शाळेच्या कामामध्ये दिरंगाई केल्यामुळे त्यांची "अअ" वर्गातून "अ" वर्गात पदावनती करण्यात आली आहे. "अअ" वर्गाचे त्यांचे रजिस्ट्रेशन असते तर त्यांना कितीही किंमतीची कामे घेता आली असती. परंतु, "अ" वर्गामध्ये त्यांची पदावनती केल्या मुळे कामे घेण्याच्या किंमतीवर मर्यादा आली आहे. अशाने त्यांच्यावर कुठे तरी बंधन टाकले आहे. त्या पद्धतीमध्ये आम्हाला दोष आढळून आला. कंत्राटदार शासनाकडे, महानगर पालिकेकडे किंवा स्वायत्त संस्थांकडे रजिस्टर्ड असेल तर त्याला टेंडर भरता येते. महानगरपालिकेमध्ये त्याचे रजिस्ट्रेशन आवश्यक आहे अशी अट नाही.

...2

ता.प्र.क्र.25436...

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

यामध्ये आपल्याला थोडी विसंगती वाटते. त्याची पदावनती झाली आहे. त्याने महानगरपालिकेकडे नोंदणी केली नव्हती. शासनाकडे रजिस्ट्रेशन केले असल्यामुळे त्याने निविदा भरल्या. तसा आपला नियम आहे. निविदा भरल्यानंतर त्याने सर्वात जास्त देकार दिला आहे हे सकृत दर्शनी दिसून येते. त्या संबंधातील माहिती मिळालेली आहे. यात निश्चितच थोडी विसंगती दिसते आहे. महानगरपालिकेमध्ये जाणूनबुजून नोंदणी केली नाही काय ? कारण पदावनती झाली आहे. पदावनतीमुळे कंत्राट घेण्यावर मर्यादा आलेली आहे. त्याला एवढे मोठे काम घेता आले नसते, हे स्पष्ट आहे. "अ"वर्गाची नोंदणी असेल तर 3-4 कोटी रूपयांपर्यंत काम घेण्याची मर्यादा आहे. एवढे मोठे काम घेता आले नसते. म्हणजे कुठे तरी लूप-होल आहे. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेला त्यांच्या कंत्राटदार नोंदणीच्या नियमामध्ये सुधारणा करण्याकरिता शासना कडून सूचना देण्यात येतील. जेणे करून महानगरपालिकेने पदावनती केलेल्या कंत्राटदारांना शासना कडील किंवा अन्य निम शासकीय संस्थांकडून नोंदणीचा आधार घेऊन निविदा पद्धतीत सहभागी होता येणार नाही. त्यांना महानगरपालिके मध्येच नोंदणी करावी लागेल, अशा प्रकारची दुरुस्ती करण्यासंबंधीचे आम्ही आदेश देऊ.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी अगदी सुस्पष्ट उत्तर दिलेले आहे. कंत्राटदाराची पदावनती केली असल्याचे आपण मान्य केले आहे. त्यामुळे त्याचा हेतू चांगला नाही हे दिसून येते. हा कंत्राटदार या बाबतीत अनेक वेळा पकडला गेला आहे.

यानंतर श्री. सरफरे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25436....

श्री.भाई जगताप....

या एकाच पळवाटेमुळे तो कॉट्रॅक्टर त्यामधून सुटणार आहे किंवा त्याला त्यामध्ये मुभा दिली जात आहे. त्यामुळे एमएमआरडीएच्या बाबतीत आपण या सभागृहात दिलेल्या उत्तराचा आधार घेऊन माननीय मुख्यमंत्र्यांनी त्याला क्लिन चीट दिली असे सांगून विरोधी पक्षाच्या माननीय सदस्यांनी त्याचा बोभाटा केला. या सभागृहात प्रामाणिकपणे सर्व गोष्टी मांडल्या जात असतांना त्याचा गैरवापर त्या ठिकाणाहून होत आह तो होऊ नये . त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेमध्ये नागरिकांच्या पैशाचा ज्या पध्दतीने भ्रष्टाचार सुरु आहे तो थांबला पाहिजे हाच आमचा उद्देश आहे. शासनाच्या लक्षात आले आहे की, या व्यक्तीने जाणीवपूर्वक पळवाटांचा फायदा घेऊन हे काम केले आहे. त्यामुळे त्याचा आधार घेऊन हे कंत्राट रद्द करण्यात येईल काय, किंवा त्या कंत्राटदाराला काळया यादीमध्ये टाकण्यात येईल काय?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, कंत्राटदाराला काळया यादीमध्ये टाकण्याबाबत स्पष्ट नियम आहेत. त्यामुळे तशा प्रकारचा आदेश या ठिकाणाहून देणे योग्य होणार नाही. या बाबतच्या पध्दतीमध्ये जर दोष असतील तर ते दूर केले जातील व त्याबाबत स्पष्टपणे आदेश दिले जातील. या निविदा प्रक्रियेमध्ये चुकीच्या पध्दतीने काही गोष्टी झाल्याबाबतची तक्रार आलेली आहे काय हे आपल्याला पहाता येईल. या बाबत महानगरपालिकेकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार त्यांनी जास्त देकार दिल्यामुळे त्यांना कंत्राट देण्यात आले आहे. या कामामध्ये दोष असल्याबाबत कुणाची तक्रार आलेली नाही. परंतु ही पध्दत सुधारणे महत्वाचे आहे. महानगरपालिकेकडून यामध्ये कुणाला तरी प्रोटेक्शन देण्याचा प्रयत्न झाला असेल तर तो यापुढे होऊ नये याकरिता निश्चितपणे काळजी घेता येईल. या निविदेमध्ये आणखी काही गोष्टींचा समावेश असेल तर त्याची तपासणी करण्यात येईल.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, नोंदणी करणे आणि पात्रता ठरविण्याच्या कार्यपध्दतीमध्ये असलेल्या विसंगतीबाबत माननीय मुख्यमंत्र्यांनी खुलासा केला आहे. जे काम करावयास घेतले होते त्याची बेसलाईन किंमत किती ठरविण्यात आली होती? या पादचारी पूलावर जाहिरातीचे फलक लावून उत्पन्न मिळणार आहे त्याची देकारामध्ये एकूण किंमत 31 कोटी दर्शविण्यात आली होती. त्यानंतरच्या दुसऱ्या देकारामध्ये 13 कोटी किंमत दाखविण्यात आली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25436....

श्री. हेमंत टकले....

होती. म्हणजे तो देकार खूपच कमी किंमतीचा होता. ही निविदा स्वीकारण्यात आली त्यावेळी या कामाची मूळ किंमत किती होती, त्या ठिकाणी जाहिराती लावण्यासाठी त्या कंत्राटदाराला किती जागा मिळणार आहे, सद्याचे जाहिरातीचे प्रचलित असलेले दर लक्षात घेता अपेक्षित महसूली निर्मिती किती होणार आहे? तशाप्रकारचा अभ्यास करुन अशी कामे दिली जात आहेत की अन्य मार्गाने या एजन्सीला आतमध्ये आणून महानगरपालिकेचे पैसे देऊन टाकण्याचे व्यवहार केले जात आहेत, या बाबत मंत्री महोदय खुलासा करतील काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या अनुषंगाने सांगू इच्छितो की, या जाहिरातीच्या माध्यमातून 16 वर्षाच्या कालावधीकरिता 38 कोटी 40 लाख रुपये मिळणार आहेत. या करिता हा स्कायवॉक तयार करण्याचे काम त्या कंपनीला देण्यात आले आहे, व त्या कामाच्या अगेन्स्ट त्यांनी ती रक्कम शासनाला द्यावयाची आहे. दुसरी निविदा त्याच अटी व शर्तीनुसार 11 कोटी 66 लाख रुपयांची आलेली होती. खुल्या निविदा काढीत असतांना त्यामध्ये असलेल्या अटी व शर्ती सर्व एजन्सींना लागू असतात. यामध्ये माननीय सदस्यांनी भीती व्यक्त केली की, एका बाजूला तशाप्रकारे पैसे न देता महानगरपालिकेकडून त्यांना पैसे दिले जातील की काय? यामध्ये कोणत्याही प्रकारे महानगरपालिकेने त्यांना मदत न करता त्यांच्याकडून सुध्दा ठरविण्यात आलेल्या अटी व शर्तीनुसार पैसे वसूल करण्यात यावेत या दृष्टीने खबरदारी घेण्यात येईल.

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, या मे.आर.पी.एस.इन्फ्रोप्रोजेक्टस या कंपनीचे डायरेक्टर कोण आहेत? या कंपनीमार्फत नरीमन पॉईंट, बांद्रा किंवा बोरीवली या ठिकाणी पूल बांधण्यात येणार आहेत काय? त्या पूलावर लावण्यात येणाऱ्या जाहिरातीची साईज किती आहे, जाहिरातीचे दर हे त्या त्या एरियाप्रमाणे ठरविलेले असतात. त्या कंपनीला 16 वर्षाकरिता जाहिरातीचे कंत्राट दिले जाणार आहे. हा कालावधी भरपूर देण्यात आलेला आहे. आज बांद्र्याला जाहिरात लावावयाची असेल तर त्यामधून 75 हजार रुपये शासनाला मिळतात. त्यामुळे 15 वर्षाचे 75 हजार रुपयेप्रमाणे व्हॅल्युएशन करीत असतांना त्या ठिकाणी महानगरपालिकेने अपेक्षित उत्पन्न किती गृहीत धरले होते?

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25436 . . . .

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण हे समजून घेतले पाहिजे की, जे पादचारी पूल आहेत ते महानगरपालिका स्वत:च्या खर्चातून बांधणार नाही. ते बांधण्याचे काम आणि त्याचा खर्च सुध्दा त्याच ठेकेदाराने करावयाचा आहे. याच्या उलट त्यांनी आपल्याला 38 कोटी 40 लाख रुपये द्यावयाचे आहेत.

श्री.भाई जगताप (खाली बसून) : 16 वर्षामध्ये द्यावयाचे आहेत.

काही सन्माननीय सदस्य (खाली बसून) : तोपर्यंत त्याचे 1600 कोटी रुपये होतील.

श्री.भास्कर जाधव : तसे नाही. तिसरी गोष्ट म्हणजे याचे डिझाईन तयार करणे आणि त्या संदर्भातील त्याचे जे स्ट्रक्चर आहे ते सगळे पहाण्याचे काम महानगरपालिकेने पूर्णपणे करावयाचे आहे. कारण 16 वर्षे तो पूल टिकला पाहिजे. 16 वर्षामध्ये त्याठिकाणी कोणताही अपघात होता कामा नये याची काळजी घेतलेली आहे. तसेच 1600 कोटी रुपये मिळतील असे जे सांगितले जात आहे, तो भाग नंतरचा आहे. कारण त्या कंपनीचे रेप्युटेशन बाकीच्या कंपन्यांबरोबर कसे असेल त्यावरच ते सगळे अवलंबून रहाणार आहे. परंतु आपल्याला ठेकेदार स्वत:च्या खर्चातून पूल बांधून देणार आहे.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, संबंधित ठेकेदाराचे नाव काय आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याठिकाणी पहिल्या प्रश्नामध्येच ठेकेदाराच्या नावाचा उल्लेख करण्यात आला असून त्यांचे नाव श्री.आर.पी.शहा असे आहे.

------

. . . .2ए-2

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**शहर बसेसमधून ज्येष्ठ नागरिकांना 50 टक्के सवलत मिळण्याबाबत**

**(2) *25466 श्री.जयवंतराव जाधव, श्री.हेमंत टकले, श्री.रमेश शेंडगे, श्री.अनिल भोसले, श्री.संदिप बाजोरिय , श्री.किरण पावसकर , ॲड.उषाताई दराडे** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ग्रामीण भागातील एसटी महामंडळाच्या बसेसमधून ज्येष्ठ नागरिकांना ज्याप्रमाणे प्रवासाकरिता 50 टक्के सवलत मिळते त्याप्रमाणे शहर बसेसमधूनही प्रवासासाठी 50 टक्के सवलत मिळावी अशी मागणी माहे जानेवारी, 2012 च्या पहिल्या सप्ताहात वा त्यासुमारास ज्येष्ठ नागरिकांच्या संघटना व नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केली हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शहर बसेसमधून ज्येष्ठ नागरीकांना प्रवास भाड्यामध्ये 50 टक्के सवलत मिळणेसाठी शासनामार्फत कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (1) होय.

(2) राज्य शासनाकडून विविध सामाजिक घटकांना देय सवलतीचा आर्थिक भार प्रवासी करापेक्षा जादा होत असल्याने शहर बसेसमधून जेष्ठ नागरिकांना सवलत देण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.

(3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, मी यानिमित्ताने माननीय मुख्यमंत्री महोदयांना एक प्रश्न विचारु इच्छितो की, राज्य शासनाकडून कोणकोणत्या सामाजिक घटकांना आर्थिक सवलती देण्यात आलेल्या आहेत, त्यामुळे प्रवासी करापेक्षा देखील हा भार जास्त होत आहे. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये ज्येष्ठ नागरिकांना जी काही सवलत मिळत आहे, ती शहरातील बस सेवेमध्ये दिली तर त्यासाठी शासनावर एकंदर किती आर्थिक भार पडणार आहे? हा पहिला प्रश्न आहे. तसेच दुसरा प्रश्न असा आहे की, याबाबतीत शासन एखादी कमिटी नेमून ज्येष्ठ नागरिकांना दिलासा देण्यासाठी काही प्रयत्न करणार आहे काय ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये सामाजिक बांधिलकीच्या नात्याने एकूण 24 विशेष सामाजिक घटकांना प्रवास भाड्यामध्ये सवलत देण्यात येते आणि त्या सर्व घटकांची यादी मी वाचून दाखवितो. त्यातील काही ठराविक सांगावयाचे तर अहिल्याबाई होळकर योजनेप्रमाणे इयत्ता पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थीनी आहेत.तसेच विद्यार्थी मासिक पास सवलत आहे,शैक्षणिक सहलीसाठी सवलत आहे, विद्यार्थ्यांना नैमित्तिक करारावर देण्यात येण्यात येणारी सवलत आहे इ.22 प्रकारच्या सवलती असून मी यासंबंधातील यादी सदनाच्या पटलावर ठेवतो.परंतु मुख्य प्रश्न 65 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या नागरिकांच्या बाबत आहे.या नागरिकांना प्रवास भाड्यामध्ये 50 टक्क्यापेक्षा जास्त सवलत





असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

देण्याचा निर्णय हा 2004 आणि 2008 च्या जी.आर.प्रमाणे घेण्यात आला आणि ही सवलत फारच लोकप्रिय आहे.

सभापती महोदय, मी याबाबतीत काही आकडेवारी मागविली. राज्यामध्ये 65 वर्षापेक्षा जास्त असलेल्यांची किती लोकसंख्या आहे? याबाबतीत मला 2011 मधील आकडेवारी मिळू शकली नाही. परंतु माझ्याकडे 2001 मधील आकडेवारी असून सरासरी 5.88 टक्के लोकसंख्या ही 65 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या लोकांची आहे आणि मला वाटते की, 2011 मध्ये देखील साधारणपणे हीच टक्केवारी असेल. परंतु लोकसंख्या वृध्दीचा दर हा 1.7 किंवा 2 टक्क्यापर्यंत असतो.जरी आयुर्मान वाढत असले तरी 65 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या वयोगटाच्या बाबतीत लोकसंख्येमध्ये किती वृध्दीमान आहे हे जर काढावयाचे असेल तर ते साधारणपणे 2 टक्क्यापर्यंत धरावयास काही हरकत नाही. परंतु आपण जर गेल्या पाच वर्षातील आकडे पाहिले तर ज्या फेऱ्यामध्ये 65 वर्षापेक्षा जास्त वय असलेल्या नागरिकांना सवलत दिली जाते. त्यामध्ये दरवर्षी 20 टक्के वाढ होत आहे आणि गेल्या वर्षीचे आकडे पाहिले तर एकंदर 29 कोटी फेऱ्या या 50 टक्के सवलतीअंतर्गत देण्यात आल्या. त्यामुळे एकूण 313 कोटी रुपयांची सवलत द्यावी लागली आणि हे पाच वर्षाचे आकडे आहेत. 2006 मध्ये 13 कोटीवरुन वाढत-वाढत 20 टक्क्यापर्यंत वाढ झालेली आहे आणि ही 20 टक्के वाढ थोडीशी संशयास्पद आहे असे वाटते. त्यामुळे यामध्ये काही गैरप्रकार होत आहे काय किंवा चुकीचे पास दिले जात आहेत काय हा वेगळा विषय आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

AJIT/ पूर्वी श्रीमती रणदिवे.. 12:35

ता.प्र.क्र. 25466..

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

सभापती महोदय, एकूण 22 सवलतींपैकी एका सवलतीवर किमान 313 कोटी रुपये खर्च होत आहे. शासनाकडून जी सवलत दिली जाते त्याची प्रतिपूर्ती होत नाही. आतापर्यंत एकूण 1263 कोटी रुपयांची प्रतिपूर्ती व्हावयाची आहे. तेव्हा यापेक्षा अधिक सवलत देणे उचित होणार नाही. कारण आपण प्रवाशांकडून जास्त भाडे देखील घेत नाही. सन 2011-2012 मध्ये काही पैशांची प्रतिपूर्ती झालेली आहे,परंतु अजून 1263 कोटी रुपयांची प्रतिपूर्ती झालेली नाही. .

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांचे आयुष्यमान वाढलेले आहे. शासन ज्येष्ठ नागरिकांना प्रवासाकरिता 50 टक्के सवलत देते. परंतु ही सवलत काही प्रमाणात शासनाला कमी करता येईल काय, म्हणजे 50 टक्के ऐवजी 20 टक्के, 30 टक्के इतकी सवलत देण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न आहे की, ज्येष्ठ नागरिकांसाठी एक धोरण प्रस्तावित आहे. हे धोरण केव्हा मांडण्यात येणार आहे ?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण हा वेगळ्या मंत्रालयाचा विषय आहे. आपण ज्येष्ठ नागरिकांना प्रवासामध्ये 50 टक्के सवलत देतो ती कमी करणे सोपी गोष्ट नाही. या गोष्टीला खूप विरोध होईल. सवलतीच्या दरात किती फेऱ्या झाल्या त्याची आकडेवारी मी येथे सांगितलेली आहे. आतापर्यंत 29 कोटी फेऱ्या झालेल्या आहेत. सरासरी 5.88 टक्के लोकसंख्या ही 65 वर्षावरील लोकांची आहे. सर्वच ज्येष्ठ नागरिक प्रवास करतात की नाही हे मला माहीत नाही. परंतु सर्व ज्येष्ठ नागरिकांनी प्रवास केल्यास वर्षाला जवळपास 65 कोटी फेऱ्या आणि 32 ते 33 कोटी परतीच्या फेऱ्या होतात. यामध्ये काही तरी विसंगती आहे का हे पाहणे गरजेचे आहे. इतक्या मोठ्या प्रमाणावर सवलतीचा वापर होतो की नाही हे माहीत नाही. या पेक्षा आणखी सवलती देऊन महामंडळाकडे प्रतिपूर्ती होईल असे वाटत नाही. तेव्हा या गोष्टीचा विचार करता येणार नाही.

श्री.जयप्रकाश छाजेड : सभापती महोदय, वयाची 60 वर्षे पूर्ण झालेल्या व्यक्तींना रेल्वेने प्रवासामध्ये सवलत दिलेली आहे. त्याच धर्तीवर एस.टी.महामंडळाकडून सवलत देण्यात येईल काय ?

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25466..

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीचा विचार आजच्या परिस्थितीमध्ये करता येणार नाही.

-------

..3..

अप्रसुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ठाणे जिल्ह्यातील गोदामात जवळपास दीड लाख क्विंटल तांदूळ दोन वर्षांपासून सडत असल्याबाबत**

**(3) * 25267 श्रीमती विद्या चव्हाण** : सन्माननीय **अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) ठाणे जिल्ह्यातील 52 सरकारी गोदामात जवळपास दीड लाख क्विंटल तांदूळ दोन वर्षांपासून सडत असल्याचे माहे डिसेंबर,2011 मध्ये वा त्यादरम्यान उघडकीस आले हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्याबाबत जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.रणजित कांबळे, श्री.अनिल देशमुख यांच्याकरिता** : (1) हे खरे नाही.

(2), (3) व (4) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा.सुरेश नवले : सभापती महोदय, एका गोदामाची साठवणूक क्षमता किती आहे तसेच एकूण 52 गोदामांची साठवणूक क्षमता किती आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाची माहिती आता माझ्याजवळ नाही. ती माहिती मी पटलावर ठेवतो.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला याचा अर्थ त्या गोदामामध्ये धान्य सडत आहे. ठाणे जिल्ह्यातील किती गोदामांमध्ये धान्य ठेवलले आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, माल हाताळण्यामध्ये, वाहतुकीमध्ये किंवा स्टोरेजमध्ये किती टक्के माल वेस्टेजमध्ये धरण्याची परवानगी असते ? म्हणजे ट्रान्झीट लॉससाठी किती टक्क्यापर्यंत परवानगी असते ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, तशी काही तरतूद नाही. ठाणे जिल्ह्यामध्ये 86 गोदामे आहेत. ठाणे जिल्ह्यात दोन वर्षात 2 लाख 300 टन इतके धान्य वितरित होते. त्यामध्ये 2 लाख 13 हजार 800 टन इतका तांदूळ आलेला आहे त्यापैकी 1 लाख 91 हजार 612 टन इतकी पीडीएस सिस्टीसाठी उचल झालेली आहे. जवळपास 12 हजार टन धान्य शिल्लक आहे. ही रेग्युलर प्रोसेस आहे.

---- यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठी करावयाची कार्यवाही**

**(४) * २५८०० श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.संजय केळकर , श्री.रामनाथ मोते , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.राजन तेली , श्री.जयप्रकाश छाजेड , डॉ.सुधीर तांबे , श्री.माणिकराव ठाकरे , प्रा.सुरेश नवले , श्री.रामदास कदम , डॉ.दीपक सावंत , डॉ.नीलम गोऱ्हे :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न सोडविण्यासाठी मा.मुख्यमंत्र्यांनी ६ महिन्याच्या आत सर्व कापड गिरण्यांच्या जागा ताब्यात घेण्याविषयाी घोषणा केली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही घोषणा करून ९ महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही अद्यापपर्यंत गिरणी मालकांनी शासनाला गिरण्यांच्या जागा ताब्यात दिल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गिरणी कामगारांना घरे मिळण्यास्तव तसेच गिरण्यांच्या जागा ताब्यात घेण्यास्तव शासनाने कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पृथ्वीराज चव्हाण** : (१) दिनांक २४/८/२०१० च्या शासन अधिसूचनेद्वारे गिरणी मालकाने गिरणी बंद झाल्यापासून ६ महिन्यांचे आत अथवा शासन अधिसूचनेपासून ६ महिने (दोघांपैकी नंतर येईल ते) त्याप्रमाणे म्हाडा व महापालिकेस द्यावयाची जागा आराखडयात दाखवून सदर आराखडा मंजूर करून महापालिकेला व म्हाडाला जागा हस्तांतरीत करणे बंधनकारक केले आहे.

(२) शासनाच्या दिनांक २४/८/२०१० च्या आदेशानंतर म्हाडास सुमारे २.२७ हेक्टर जागा हस्तांतरीत झालेली आहे.

(३) मुंबईतील ज्या बंद कापड गिरण्याच्या जागेचे प्रस्ताव बृहन्मुंबई महानगरपालिकेने मंजूर केलेले आहेत, अशा प्रस्तावामधून म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिका यांना प्राप्त होणाऱ्या जमिनी प्राप्त झाल्या नसल्यास त्या प्राप्त होण्याच्या दृष्टीने तातडीने कार्यवाही करण्यास व ज्या बंद गिरण्याच्या जागांचे अभिन्यास प्रस्ताव मंजुरीसाठी प्रलंबित असतील, अशा प्रस्तावांना ३ महिन्याच्या आत मंजुरी देण्याबाबत बृहन्मुंबई महानगरपालिकेस शासनाने सूचना दिलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या उत्तरामध्ये माननीय मुख्यमंत्र्यांना काही दुरुस्ती करावयाची आहे का ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, नाही.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, या प्रश्नामध्ये मी स्पेसिफिक विचारले आहे की, 9 महिन्यांचा कालावधी उलटून गेल्यानंतरही अद्यापपर्यंत गिरणी मालकांनी गिरण्यांच्या जागा शासनाच्या ताब्यात दिल्या नाहीत, हे खरे आहे का ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25800 ... श्री. विनोद तावडे ...

या संदर्भात असे उत्तर दिले आहे की, म्हाडास सुमारे 2.27 हेक्टर जागा हस्तांतरित झालेली आहे. गेल्या आठवड्यात माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहात जे निवेदन केले त्यामध्ये असे म्हटले आहे की, प्रत्यक्षात 9.12 हेक्टर जमिनीचा ताबा म्हाडाकडे आलेला आहे. पण या ठिकाणी उत्तरामध्ये 2.27 हेक्टर जमीन ताब्यात आली असे म्हटले आहे. गेल्या आठवड्यात आपण जे निवेदन केले त्यामध्ये 9.12 हेक्टर जमीन असे म्हटले आहे. यामध्ये नक्की किती जमीन ताब्यात मिळालेली आहे ? आपण नंतर निवेदन केल्यामुळे तेच बरोबर असावे असे मला वाटते.

माझा स्पेसिफिक प्रश्न एवढाच आहे की, ज्या जमिनी म्हाडाच्या ताब्यात आलेल्या नाहीत त्याची कारणे काय दिलेली आहेत आणि ती कारणे सरकारला पटलेली आहेत का ? सरकारने या जमिनी आपल्या ताब्यात मिळण्यासाठी काय पावले उचलली आहेत ? माननीय मुख्यमंत्र्यांनी सभागृहामध्ये गिरणी कामगारांना जी घरे देणार त्या घरांच्या किमतीची घोषणा 7 दिवसात करु असे सांगितले होते. त्यानंतर मी दोन वेळा औचित्याचा मुद्दा उपस्थित केला. त्याला जवळजवळ 16 दिवस झाले. सभागृहाच्या कामकाजात दिलेला शब्द पाळला जात नाही. त्यामुळे काल गिरणी कामगार उपोषणाला बसले होते. माननीय मंत्री महोदय श्री. सचिन अहिर यांनी जाऊन त्यांना तोंडी सांगितले पण गिरणी कामगारांनी सांगितले की, आम्हाला तोंडी नको तर लेखी द्यावे. त्यांनी लेखी दिल्यानंतर गिरणी कामगारांनी काल उपोषण मागे घेतले. हा प्रश्न वारंवार येतो आणि आपण यावर चर्चाही केलेली आहे. यामध्ये आपण दोन गोष्टी आग्रहाने सांगितल्या होत्या की, 7 दिवसात किमती घोषित करीन आणि ज्या ॲडिशनल जमिनी आल्या पाहिजेत त्या बाबतची समिती घोषित करीन. ते आपण या प्रश्नाच्या निमित्ताने घोषित करणार का ? त्या जागा ताब्यात कशा येतील ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी तीन प्रश्न विचारलेले आहेत. त्या तीनही प्रश्नांची स्पष्ट उत्तरे मी या ठिकाणी देऊ इच्छितो. आतापर्यंत एनटीसीच्या 10 आणि 25 खाजगी गिरण्यांकडून ताब्यात मिळालेली जमीन ही 9.67 हेक्टर आहे अशा प्रकारचे उत्तर मी मागे दिले होते. अद्याप ताबा मिळावयाच्या ज्या जमिनी शिल्लक होत्या ती जमीन 5.97 हेक्टर होती. त्यापैकी उत्तरात म्हटल्याप्रमाणे 2.27 हेक्टर जमीन मिळालेली आहे

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25800 ... श्री. पृथ्वीराज चव्हाण ...

आणि 3.70 हेक्टर जमीन अजून मिळालेली नाही. जी 3.70 हेक्टर जमीन मिळालेली नाही ती तीन गिरण्यांची आहे. त्याबाबतीत पुढे आम्ही काय करणार आहोत हे मी नंतर सांगतो.

सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी जो दुसरा प्रश्न विचारला त्याबाबत सांगू इच्छितो की, गिरणी कामगारांना घरे देण्याबाबत मागे बैठक झाली होती त्यामध्ये दोन समित्या नेमण्याचा निर्णय झाला होता. घरे किती किमतीला द्यावीत याची घोषणा मी मागेच केली होती. चार मजली इमारतीमधील घरांकरिता 4 लाख 81 हजार रुपये आणि उंच इमारतींमधील घरांकरिता 8 लाख 34 हजार रुपये अशी रक्कम ठरविली होती. परंतु त्या संघटनेबरोबर झालेल्या बैठकीमध्ये, विरोधी पक्षाबरोबर झालेल्या बैठकीमध्ये दोन समित्या नेमण्याचे ठरले होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण....

एका समितीला या घरांची किंमत जर कमी करता येईल काय आणि करता येत असेल तर ती किती करावी याबाबत 7 दिवसात अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्या समितीने बैठका घेतल्या आहेत. त्या बैठकांच्या वेळी तीन संघटनांचे प्रतिनिधी होते, शासनाचे प्रतिनिधी होते. त्या समितीने 7 दिवसामध्ये सूचना व प्रस्ताव शासनाकडे दिलेला आहे. त्या अहवालाची माहिती मी शासनासमोर ठेवलेली नाही. त्याचे कारण असे आहे की, त्यामध्ये घरांची किंमत थोडी कमी करण्याचा प्रस्ताव आहे. घरांची किंमत कोणत्या मार्गाने कमी करावयाची याबाबत विचार चालू आहे. त्याबाबत मी लवकरच घोषणा करीन. 6900 घरे बांधण्यासाठी म्हाडाने 700 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. ते पैसे परत आले पाहिजेत. म्हणून ना नफा ना तोटा तत्वावर आणि व्याज दर कमी करुन ही किंमत ठरविलेली आहे. ही किंमत कमी करण्यासाठी समिती नेमली होती त्या समितीचा अहवाल 7 दिवसांमध्ये आलेला आहे. तो माझ्याकडे आहे. त्यावर विचार करुन तो संपूर्ण अहवाल स्वीकारावयाचा की कशा प्रकारे स्वीकारावयाचा असल्यास कशी तरतूद करावयाची याबाबत चर्चा चालू आहे. त्याबाबत मी सभागृहात लवकरच सांगेन.

दुसऱ्या समितीला अहवाल सादर करण्यास अधिक वेळ लागणार होता. त्याबाबतची अधिसूचना कदाचित आज निर्गमित झाली असावी. त्याबाबतच्या फाईलमध्ये मी स्पष्टपणे नमूद केलेले होते. या समितीची व्याप्ती विस्तृत आहे. मुंबईत आणखी घरे उपलब्ध होणार नाहीत. मिलची 3.70 हेक्टर जमीन घ्यावयाची आहे तो वेगळा विषय आहे. पण त्यापेक्षा मोठ्या प्रमाणावर जमिनीची आवश्यकता आहे. म्हणून जिल्हा पातळीवर जमीन मिळेल काय, एमएमआरडीए रिजनमध्ये मिळेल काय याबाबतची माहिती मागविली होती. 1.50 लाख गिरणी कामगारांची संख्या आहे ते कोणकोणत्या जिल्ह्यातील आहेत याबाबत म्हाडाकडेही विचारणा केली होती. त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील, रत्नागिरी जिल्ह्यातील किती कामगार आहेत याबाबतची माहिती समोर आल्यावर अंदाजे टक्केवारी काढता येईल. कदाचित या सर्व जिल्ह्यातील जागेची आवश्यकता भासणार नाही. त्याबाबतची विस्तृत टिप्पणी माझ्याकडे एक दिवसामध्ये येईल. जी अतिरिक्त जमीन उपलब्ध आहे......

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

श्री.पृथ्वीराज चव्हाण...

ती या कामासाठी उपयोगात आणावयाची असल्यामुळे त्याबाबतची माहिती जिल्हाधिकारी व आयुक्तांमार्फत मागविलेली आहे. हे काम त्या समितीचे आहे. त्या समितीला याबाबतची लवकरात लवकर माहिती मागवून अंदाज घेण्याच्या सूचना मी दिलेल्या आहेत. मी सुरुवातीपासून सांगत आलो आहे की, या सर्व कामगारांची सोय होईल असे मला वाटत नाही. परंतु जास्तीत जास्त लोकांची सोय करण्याचा शासनाचा प्रयत्न चालू आहे. मुंबईमध्ये जी जमीन उपलब्ध होईल त्यासाठी शासनाने पर्याय ठेवलेला आहे. म्हाडानेच घरे बांधावीत असे नाही तर गृहनिर्माण सोसायट्या करण्यासाठी त्या त्या मिलचे कामगार पुढे आले व त्यांनीच स्वत: घरे बांधली तर त्यालाही प्राधान्य देता येईल. हा पर्याय खुला ठेवलेला आहे.

ज्या तीन गिरण्यांनी 3.70 हेक्टर जमीन दिलेली नाही त्यांची नावे ब्रॅडबेरी मिल, रघुवंशी मिल आणि न्यू ग्रेट इस्टर्न मिल अशी आहेत. त्या मिल्सनी शासनाला जमीन दिलेली नसल्यामुळे जर त्यांनी जमीन दिली नाही तर कारवाई करण्यात येईल असे सांगितलेले आहे. या मिल्सनी अजूनही विकासाचा प्रस्ताव सादर केलेला नाही. त्यांच्याकडे किती जागा आहे, त्यापैकी मुंबई महानगरपालिकेला किती द्यावयाची, घरांसाठी किती ठेवावयाची आणि त्यांनी विकासासाठी किती जागा ठेवावयाची याबाबतचा सीमांकन प्रस्ताव सादर झालेला नाही. त्यामुळे हा प्रस्ताव त्यांनी ताबडतोब सादर केला पाहिजे. जोपर्यंत ते प्रस्ताव सादर करीत नाहीत तोपर्यंत त्यांना कोणतीही परवानगी मिळणार नाही. त्या जागेचा विकास करण्याची इच्छा आहे की नाही ते सुध्दा शासनाला कळले पाहिजे. बाहेरच्या हिश्श्याची कोणती जमीन मिळणार आहे, नकाशावर कोणती जमीन आहे ते कळल्यावर त्या जागेवर शासनाला काम सुरु करता येईल. त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी सक्तीची नोटीस बजावली जाईल. ती जागा ताब्यात घेण्यासाठी कायदेशीर कारवाई करावयाची असेल ती देखील करण्यात येईल असे मी सभागृहाला सांगू इच्छितो.

श्री.भाई जगताप : या गिरणी कामगारांना घरे मिळण्यासाठी शासन आणि माननीय मुख्यमंत्री प्रांजळपणे प्रयत्न करीत आहेत. त्याबद्दल माझ्या मनामध्ये शंका नाही. परंतु तरी देखील हा प्रश्न अनुत्तरित राहतो. मुंबईमध्ये जवळपास 4 हेक्टर जागा उपलब्ध होईल असे गृहित धरले तरी सिडको, म्हाडा किंवा महामंडळे आहेत त्यांच्या ताब्यात जे प्लॉटस् आहेत त्या जागांसंबंधी माननीय मुख्यमंत्र्यांनी त्या समितीच्या बैठकीत मार्गदर्शन केले होते.

यानंतर श्री.शिगम....

अप्रकाशित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

जसे जिल्हयामध्ये जागा मिळते का हे त्या समितीला पहायला सांगितलेले आहे त्याप्रमाणे मुंबईमध्येही काही जागा मिळू शकेल का हे देखील त्या समितीला पहाण्यास सांगितले आहे. जिल्ह्यामध्ये जागा उपलब्ध झाली तर त्या ठिकाणी सर्व कामगार राहाण्यासाठी जातील असे गृहीत धरता येणार नाही. आपण प्रकल्पांना काही सुविधा देतो. धारावीच्या प्रोजेक्टचे मी उदाहरण देतो. अशा प्रोजेक्टला काही विशिष्ट क्रायटेरिया लावून तो प्रोजेक्ट फिझिबल व्हावा म्हणून एफएसआय वाढवून दिलेला आहे. अशा प्रकारचे प्रावधान गिरणी कामगारांना मुंबईमध्ये घरे मिळण्याच्या संदर्भात केले जाईल काय ? आपण डीसी रुल्समध्ये बदल केलेले आहेत. तसे बदल गिरणी कामगारांना मुंबईमध्ये जास्तीत जास्त घरे मिळण्याच्या संदर्भात केले जातील काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : दुसरी जी समिती नेमलेली आहे तिची हीच कार्यकक्षा आहे. नागरी जमीन कमाल धारणा कायद्यानुसार काही जमीन मिळेल का, इतर जिल्ह्यामध्ये जमीन मिळेल का या बाबतीत नवीन समिती काम करील. आता मुंबईमध्ये फक्त 3.70 हेक्टर इतकीच अतिरिक्त जमीन मिळू शकते. गिरणी कामगारांच्या घरांसाठी अधिकची जमीन कोठून मिळेल हे पाहण्याचे काम ही समिती करील.

श्री. जयंत प्र. पाटील : सर्व गिरणी कामगारांना घरे देण्यासाठी मुंबईमध्ये किती जागा लागेल ? मी अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेताना एक मागणी करुन तिचा विचार करण्याची विनंती माननीय मुख्यमंत्र्यांना केली होती. एमएमआरडीएची जी रेण्टल हौसिंग स्किम आहे त्यामध्ये या गिरणी कामगारांच्या घरांसाठी जागा उपलब्ध करुन देण्यात येईल काय ? एमएमआरडीएच्या रेण्टल हौसिंग स्किम अंतर्गत 1 लाख 80 हजार घरे उपलब्ध होणार आहेत हे खरे आहे काय ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : गिरणी कामगारांच्या घरांसाठी अतिरिक्त जमीन मिळण्याबाबत सर्व पर्यायांचा विचार केलेला आहे. एमएमआरडीएची रेण्टल स्किम असेल, एसआरए स्कीम असेल किंवा जिल्हास्तरावरील स्किम असतील त्या ठिकाणी जमीन मिळण्याच्या दृष्टीने शासन प्रयत्नशील आहे. मुंबईमध्ये सर्व गिरणी कामगारांच्या घरासाठी किती जमीन लागेल असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. मला वाटते कल्पनेच्या बाहेर जमीन लागेल. जमिनीची वाटणी कशा प्रकारे





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करावी यासंबंधीचा निर्णय झालेला आहे. त्याबाबतीत सर्वोच्च न्यायालयाने अंतिम आदेश दिलेले आहेत. आताच्या परिस्थितीमध्ये मुंबईमध्ये किती जमीन उपलब्ध आहे हे पाहून बाहेरची जमीन मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री. प्रकाश बिनसाळे : तीन गिरण्यांनी जमिनी दिलेल्या नाहीत असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले. फिनिक्स मिलमध्ये जुनी इमारत तशीच ठेवून चेंज ऑफ युजर करुन नव्याने डेव्हलपमेण्ट केलेली आहे. रघुवंशी मिलमध्येही अशा प्रकारे बांधकाम झालेले असून तेथे विविध प्रकारचे उद्योग सुरु आहेत. या गिरण्यांनी चेंज ऑफ युजर करुन शासनाला जमिनी दिलेल्या नाहीत. तेव्हा या गिरण्यांना चेंज ऑफ युजरची परवानगी कशी काय देण्यात आलेली आहे ? अशा किती गिरण्यांनी चेंज ऑफ युजर करुन जमिनी देण्याचे टाळले आहे ?

श्री. पृथ्वीराज चव्हाण : विकास आराखडा प्रस्तुत करताना काही निकषांचा अवलंब करावा लागतो. त्यामध्ये पहिल्यांदा बंद गिरण्यांच्या मालकांनी बीआयएफआरने मंजूर केलेल्या योजनेनुसार विकास आराखडा महानगरपालिकेकडे सादर करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर कामगार आयुक्तांचे ना हरकत प्रमाणपत्र त्यांना घ्यावे लागते.

...नंतर श्री भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पृथ्वीराज चव्हाण.......... ता.प्र.क्र.25800....

त्यानंतर नगरविकास विभागाचे ना हरकत प्रमाणपत्र घ्यावे लागते. या सगळ्या बाबी पूर्ण झाल्यानंतर जागेवर जाऊन बांधकामाचे मोजमाप घेतले जाते. त्यानंतर विकास आराखडा मंजूर केला जातो. मुंबई महानगरपालिकेने पुनर्विकास करावयाच्या गिरणीचा विकास आराखडा मंजूर केला तो नियमाप्रमाणे केलेला आहे. त्यामध्ये काही विसंगती आहे हे स्पेसिफिकली निदर्शनास आणले आणि त्या गिरणीकडून जर कायद्याचे उल्लंघन झाले असेल तर नक्की चौकशी केली जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, गिरणी कामगारांनी संयुक्त महाराष्ट्राचा लढा दिला. त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी शासकीय जमिनी बिल्डरांना देऊन जी चूक केली ती चूक सुधारली जाणार आहे काय? तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी शिवालिक बिल्डरला 130 एकर, आकृती बिल्डरला 150 एकर, कांदिवलीमध्ये नियम 3 के च्या माध्यमातून हिमानी बिल्डरला 100 एकर, ठाण्यामध्ये हिरानंदानी बिल्डरला 105 एकर शासकीय जमीन दिली. या जमिनीचा विकास म्हाडामार्फत केला तर सर्व गिरणी कामगारांच्या घराचा प्रश्न निकाली निघू शकतो. म्हणून तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी जी चूक केली ती सुधारुन गिरणी कामगारांना न्याय देण्याचा प्रयत्न माननीय मुख्यमंत्री करतील काय?

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी या क्षणाला एवढेच सांगू इच्छितो की, या संदर्भात समितीकडे विस्तृत कार्यकक्षा दिलेली आहे. बरेचसे नियम 3 के संदर्भातील निर्णय रद्द केले आहेत, कारण ते निर्णय नियमबाह्य होते. प्रत्येक जमीन वाटपाच्या संदर्भात निर्णय होत असताना त्यामध्ये अनियमितता झाली असेल तर निश्चितपणे चौकशी करण्याचे मी आदेश दिले आहेत. विधानसभेतील माननीय विरोधी पक्षनेत्यांकडून 33 प्रकरणे नियम 3 के च्या संदर्भातील दिली गेली. त्या प्रकरणांची माहिती घेतली गेली असता त्यामध्ये अनियमितता दिसून आली. तेव्हा चौकशी करुन दिलेली जमीन रद्द करण्याचा देखील निर्णय घेण्यात आला आहे. हा प्रश्न विशाल स्वरुपाचा आहे. त्यासाठी सर्वांनी एकत्र बसून मार्ग काढावा लागेल. चुकीच्या पध्दतीने निर्णय झालेला असेल तर त्याची निश्चितपणे पाहणी होईल.

--------

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**कल्याण डोंबिवली (जि.ठाणे) महानगरपालिकेच्या स्कायवॉक प्रकल्पांतर्गत पेव्हर ब्लॉक बसविण्याचे अपूर्ण असलेले काम**

**(५) * २५०८७ श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील कल्याण महानगरपालिका हद्दीत सुमारे ८२ कोटी रक्कमेच्या स्कायवॉक प्रकल्पाचे काम सुरु करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्कायवॉक प्रकल्पा अंतर्गत रस्त्याला बसविण्यात आलेले पेव्हर ब्लॉकचे काम अपूर्ण असताना संबंधित ठेकेदारास रुपये ३७ लाखांचे वेतन अदा करण्यात आले आहे हे खरे आहे काय,

(३) तसेच महानगरपालिकेच्या कार्यालयातून मोजमाप नोंदवही गहाळ झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मोजमाप नोंदवही गहाळ करणाऱ्या व्यक्तींविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (१) होय.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अर्थसहाय्याने कल्याण स्टेशन परिसरात स्कायवॉक बांधण्याचा प्रकल्प राबविण्यात येत असून त्यावरील एकूण अपेक्षित खर्च रू.८३.६९ कोटी आहे.

(२) नाही.

सदर स्कायवॉक प्रकल्पांतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचा समावेश नाही.

(३) होय.

(४) मोजमाप नोंदवही गहाळ झाल्याप्रकरणी प्राथमिक चौकशी करण्यात आली असून प्राकलन नस्ती व मोजमाप पुस्तिका गहाळ झाल्याबाबत बाजारपेठ पोलीस स्टेशन येथे एफ.आय.आर. दाखल करण्यात आला असून पोलीसांमार्फत चौकशी सुरू आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, कल्याण महानगरपालिकेमध्ये डॉ.दीपक गुटखा यांच्याकडून महापालिकेचे कार्यकारी अभियंता श्री.सुनील जोशी यांनी ५ लाख रुपये लाच घेतली होती. त्यांना सस्पेंड करण्यात आले होते. श्री.सुनील जोशी यांची बेनामी संपत्ती मोजण्यास पोलिसांना ३ दिवस लागले होते. डॉ.दीपक गुटखा यांनी काम न करता पैसे घेतले होते. संबंधित कामाचे मोजमाप नोंदवही सुध्दा गहाळ झाली आहे ही गोष्ट खरी आहे काय? ज्या अधिकाऱ्यांनी मोजमाप नोंदवही गहाळ केली त्यांच्यावर कोणती कारवाई केली? मोजमाप नोंदवही गहाळ करण्यामध्ये जे जे अधिकारी सामील आहेत ते सध्या कामावर आहेत की त्यांना सस्पेंड केले गेले आहे?

..३..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.२५०८७.....

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, कल्याण पूर्व आणि कल्याण पश्चिम असे स्कायवॉकचे दोन भाग होते. तिसरे काम ओव्हरहेड केबल अंडरग्राऊंड टाकणे हे होते. पहिल्या स्कायवॉकचे ९० टक्के व दुसऱ्या स्कायवॉकचे ३० टक्के काम पूर्ण झाले. स्कायवॉकच्या कामाबद्दल कोणताही आक्षेप नाही. याच विषयावरील तारांकित प्रश्न विधानसभेत देखील उपस्थित झाला होता. ज्यावेळी स्कायवॉक बांधायचा होता त्याच वेळेला रस्त्याचे काम घेतले. हे काम १.३० कोटी रुपयांचे होते. त्या रस्त्यावर पेव्हर ब्लॉक टाकण्यात आल्यामुळे त्यांना १.२६ कोटी रुपयांचे पेमेंट केले गेले. आणखी २१ लाख रुपयांचे पेमेंट करण्याची वेळ आली त्यावेळी एम.बी.गहाळ झ ाल्याची माहिती समोर आली.

नंतर श्री.खर्चे..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म्हणून खालच्या सभागृहात मी या प्रश्नाला जे उत्तर दिले ते येथे सांगतो आणि हा प्रश्न संपवितो.

**सभापती** : मंत्री महोदयांनी प्रथम हे लक्षात घ्यावे की, हे सभागृह सार्वभौम असून या सभागृहाचे स्वतंत्र अस्तित्व आहे. त्यामुळे आपण त्या सभागृहात उत्तर दिले तेच येथे देऊन प्रश्न संपवितो असे बोलणे योग्य नाही.

श्री. भास्कर जाधव : महोदय, ही एम.बी. गहाळ होणे तसेच पेव्हर ब्लॉक परवानगी नसताना दुसऱ्या ठिकाणी लावणे तसेच एकाच कामाचे पेमेंट दोन दोन ठिकाणी काढणे या प्रकारात जे गुंतलेले आहेत आणि एम.बी. गहाळ करण्याचे जाणीवपूर्वक काम केले आहे काय ही वस्तुस्थिती समजण्यासाठी या प्रकरणाची चौकशी विभागीय आयुक्तांमार्फत करण्याचे ठरविले आहे व त्यांचा अहवाल आल्यानंतरर योग्य ती कारवाई केली जाईल.

**सभापती** : दुर्दैवाने एखाद्या कामाची एम.बी. गहाळ झाली असली तरी ते काम प्रत्यक्षात असतेच. म्हणून पुन्हा रेकॉर्ड करु शकतो यादृष्टीने सुध्दा सूचना देण्याची गरज आहे.

श्री. भाई जगताप : महोदय, उत्तरात एम.बी. गहाळ झाली म्हणून गुन्हा दाखल झाला असे स्पष्ट म्हटले आहे. मग पुन्हा विभागीय आयुक्तांकडून चौकशी करणे हा काय प्रकार आहे हेच मला समजत नाही. माझा प्रश्न असा आहे की, जो गुन्हा दाखल झालेला आहे त्याचाच आधार घेऊन शासन संबंधित अधिकाऱ्यांना निलंबित करणार आहे काय ? कारण निलंबित केल्यानंतर चौकशी करण्यात येते व त्या चौकशीमध्ये बराच कालावधी जातो. तसेच श्री. सुनील जोशी हे प्रकरण राज्यच नव्हे तर संपूर्ण देशाला माहीत झाले असावे. तरी देखील त्याला कामावर घेण्याचा प्रयत्न महापालिका करते हे कितपत योग्य आहे, तसेच ज्या अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल झालेले आहेत त्यांना प्राथमिक अहवालाच्या आधारे निलंबित करणार काय ?

श्री. भास्कर जाधव : महोदय, यातील काही अधिकाऱ्यांना अगोदरच निलंबित केलेले आहे. तसेच ज्या सुनील जोशींचा सन्माननीय सदस्यांनी उल्लेख केला त्याला मध्यंतरी कामावर घेण्याचा प्रस्ताव तेथील सत्ताधाऱ्यांनी दिला होता पण त्याला मान्यता दिली गेली नाही व हजरही करुन घेतले नाही. आजच्या घडीला त्यांना निलंबित करण्यात आले आहे. पण या प्रकरणात केवळ निलंबित करुन चालणार नाही तर अशा प्रवृत्ती महापालिकेच्या सेवेत सुध्दा चालणार नाही म्हणून प्रसंगी त्यांना बडतर्फ सुध्दा केले पाहिजे असे शासनाचे मत आहे.

.....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25087.....

**सभापती** : अशा प्रवृत्ती सेवेत राहणार नाही हा एक भाग झाला. परंतु अशा प्रवृत्ती इतकी बेकायदेशीर कामे करतात त्यांना शिक्षा होईल यादृष्टीनेही शासनाने प्रयत्न करावा, असे मी निदेश देत आहे.

श्री. विनोद तावडे : महोदय, सुनील जोशींच्या संदर्भात ज्यांनी कामावर घेण्याचा प्रस्ताव महासभेत आणला त्यात केवळ सत्ताधारीच नव्हते तर कॉग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची भूमिका काय होती ती सुध्दा मंत्री महोदयांनी सांगावी, जेणेकरुन वास्तव काय आहे ते सभागृहासमोर येईल. कारण जे चूक आहे ते चूकच आहे, मग ते कोणीही करु दे ते चूकच आहे.

श्री. भास्कर जाधव : महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांना मी सांगू इच्छितो की, शिवसेना भारतीय जनता पक्षाचा उल्लेख केला नाही पण साधारणपणे आपल्याकडे जी कार्य पध्दती आहे त्यानुसार असे प्रस्ताव सत्ताधारी पक्षच आणतात हे मी सांगू इच्छितो.

श्री. विनोद तावडे : महोदय, हा प्रस्ताव स्पेसिफिकली कोणी आणला हे मी नावाने सांगणार आहे. कल्याण महापालिकेत असा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाने जरी आणला असला तरी त्याला अनुमोदन मात्र राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका नगरसेवक व गटनेत्याने दिले होते. तसेच मी या सभेचे इतिवृत्त सुध्दा पाहिले. त्यासंदर्भात आम्ही आमच्या पक्षातील लोकांची कान उघाडणी केली पण आपल्या पक्षातील नेत्यांची मात्र अशी कान उघाडणी केली नव्हती हे मी ऑन रेकॉर्ड सांगतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 25087** ......

श्री. कपिल पाटील : एमएमआरडीचे स्कॉयवॉक हे भ्रष्टाचाराचे कुरण बनले आहे त्यामुळे सर्व स्कायवॉक बद्दल फेरतपासणी करण्यात येणार आहे काय ? ज्या ठिकाणी स्कायवॉकची गरज नाही, स्काय वॉकवरुन लोक जातही नाहीत अशा ठिकाणी केवळ पैसे खाण्यासाठी सर्वपक्षीय युती होते व स्काय वॉकची गरज नसतांनाही स्काय वॉक बांधले जातात त्यामुळे सर्व स्काय वॉकची फेर तपासणी केली जाईल काय, जेथे स्काय वॉकची गरज नाही असे स्काय वॉक थांबविले जातील काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, स्काय वॉकच्या संदर्भात यापूर्वीच सर्व्हे करण्यात आला होता परंतु नंतरचा आलेला अनुभव लक्षात घेता ज्या ठिकाणी स्कायवॉकची गरज असेल अशाच ठिकाणी स्काय वॉक करण्यात यावे व जेथे गरज नसेल अशा ठिकाणी स्काय वॉक बांधण्यात येऊ नये अशा प्रकारचा निर्णय झालेला आहे.

----

**तारांकित प्रश्न क्रमांक 25,411पुढे ढकलण्याबाबत**

**सभापती** :तारांकित प्रश्न क्रमांक 25411 बाबत सन्माननीय मंत्रीमहोदयांनी सदर प्रश्न पुढे ढकलण्याची मला विनंती केली असल्यामुळे सदर प्रश्न पुढे ढकलण्यात येत आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे महानगरपालिकेचे अधिकारी संबंध नसताना स्विडन दौऱ्यावर जाणे**

**(७) * २५७६९ श्री.अनिल भोसले , ॲड. उषाताई दराडे , श्री.सतीश चव्हाण , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.जयवंतराव जाधव , श्री.किरण पावसकर :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे महानगरपालिकेचे पाच अधिकारी कोणताही संबंध नसताना सांडपाण्यापासून गॅस तयार करण्याचे तंत्रज्ञान पाहण्यासाठी एका बहुराष्ट्रीय खाजगी कंपनीच्या खर्चाने पुणे महानगरपलिकेला न कळवता परस्पर स्विडन दौऱ्यावर गेल्याचा धक्कादायक प्रकार माहे सप्टेंबर,२०११ च्या दुसऱ्या आठवडयात उघडकीस आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. भास्कर जाधव,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (१) होय.

(२) व (३) संबंधित अधिकाऱ्यांकडून रजा कालावधीत झालेल्या परदेश दौऱ्यांविषयी विविध मुद्दांवर माहिती सादर करणेबाबत त्यांना पत्र देण्यात आले होते. मात्र उक्त पत्रानुषंगाने संबंधितांकडून माहिती प्राप्त न झाल्याने संबंधित अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासे मागविण्यात आले होते. त्यानुसार संबंधित अधिकाऱ्यांकडून खुलासे प्राप्त झाले असून प्राप्त खुलाशाच्या अनुषंगाने संबंधितांविरुध्द नियमानुसार पुढील कारवाई प्रस्तावित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. अनिल भोसले : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात चौकशी करण्यात येत आहे आहे असे उत्तर देण्यात आले आहे. सदर चौकशीचे काम लवकरात लवकर पूर्ण करुन त्याचा अहवाल सभागृहाच्या पटलावर येऊ शकतो काय, तसेच ही चौकशी लवकरात लवकर पूर्ण होण्यासाठी महानगरपालिकेच्या आयुक्तांना तशा प्रकारचे आदेश दिले जातील काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रकरणाच्या संदर्भात महानगरपालिकेच्या आयुक्तांनी चौकशी सुरु केली आहे. शासकीय कर्मचा-याच्या संदर्भात महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील मधील नियमानुसार जी काही कायदेशीर कारवाई केली जात असते ती कायदेशीर कारवाई या ठिकाणीही केली जाईल एवढे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, ज्या खाजगी कंपनीच्या खर्चाने पुणे महानगरपालिकेतील पाच अधिकारी स्विडन दौऱ्यावर गेले त्या कंपनीचे आर्थिक हितसंबंध पुणे महानगरपालिकेशी आहेत काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : 25769 ......**

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, त्या कंपनीचे आर्थिक हितसंबंध आता नाहीत.

**सभापती** : सन्माननीय राज्यमंत्र्यांना मी सांगू इच्छितो की, सदर कंपनीचे हितसंबंध आता तरी नाहीत असे आपण जरी उत्तर दिले असले तरी आपण यासंदर्भात आयुक्तांमार्फत जी काही चौकशी करणार आहात त्यामध्ये, काल मोजमाप केले आणि आज ते गेले असे होता कामा नये हा मुद्दा देखील चौकशीमध्ये घेतला जावा.

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, आपण सांगितल्या प्रमाणे चौकशी केली जाईल. स्विडीश इंटरनॅशनल डेव्हलपमेंट कार्पोरेशन एजन्सीच्या माध्यमातून सदर अधिकारी स्विडनला गेले होते. त्यांनी नियमांचे उल्लंघन केलेले असल्यामुळे त्यांच्या संदर्भात चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

-----

..4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## राज्यात रिक्त असलेली धर्मादाय आयुक्तांची पदे भरण्याबाबत

**(८) * २५२९० श्री.गोपीकिसन बाजोरिया :** सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील सर्व सार्वजनिक न्यास नोंदणी विभागाकडे धर्मादाय आयुक्तांची पदे रिक्त आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्याची कारणे काय आहेत,
(३) तसेच ही पदे राज्यातील न्याय विभाग अथवा महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात व त्यामुळे ही पदे भरण्यास विलंब होतो हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास,त्याबाबत शासनातर्फे कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. भास्कर जाधव ,श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्या करिता** : (१) व (२) सद्यस्थितीत धर्मादाय उप आयुक्त संवर्गाची २ पदे व सहायक धर्मादाये आयुक्त संवर्गाची २ पदे रिक्त आहेत. त्यापैकी १ पद सक्तीने सेवानिवृत्तीमुळे व ३ पदे प्रतिनियुक्तीने कार्यरत न्यायिक सेवेतील अधिकाऱ्यांच्या न्यायिक प्रत्यावर्तनामुळे रिक्त आहेत. सदर रिक्त पदांवर मा.उच्च न्यायालयाच्या शिफारशीनुसार प्रतिनियुक्तीने नियुक्तीबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे.
(३) व (४) गट अ संवर्गाच्या नामनिर्देशनाच्या कोट्यातील पदे लोकसेवा आयोगामार्फत भरण्यात येतात. यापूर्वी आयोगाने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार अनुसूचित जमाती व अपंग प्रवर्गासाठी उमेदवार प्राप्त झालेले नाहीत. मात्र, सद्यस्थितीत नामनिर्देशनाच्या रिक्त पदांबाबत आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे.
५) प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

उप आयुक्त संवर्गाची २+२ अशी ४ पदे दिनांक ४ एप्रिल, २०१२ रोजी भरण्यात आलेली आहेत असे वाचावे बाकी छापल्या प्रमाणे.

डॉ.दीपक सावंत : सार्वजनिक न्यास नोंदणीच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. शासनातर्फे कोणती कारवाई करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे अशा प्रकारचा चौथा प्रश्न असून त्यासंदर्भात उत्तरात असे म्हटले आहे की, "लोकसेवा आयोगामार्फत पदे भरण्यात येतात. आयोगाने प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार अनुसूचित जमाती,अपंग प्रवर्गासाठी उमेदवार प्राप्त झालेले नाहीत. मात्र सद्यस्थितीत नामनिर्देशनाच्या रिक्त पदाबाबत आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्याची कार्यवाही सुरु आहे".



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**ता.प्र.क्र. : २५२९०** ......

डॉ. दीपक सावंत....

सभापती महोदय, पदे भरण्याच्या संदर्भात अनेकदा लोकसेवा आयोगाकडे विनंती केली जात असते परंतु तरी सुध्दा पदे भरली जात नाहीत. लोकसेवा आयोगाच्या परीक्षाही वेळेवर घेतल्या जात नाहीत. त्यामुळे यासंदर्भात आपल्याला धोरणात्मक निर्णय घ्यावे लागणार आहेत. अनेक खात्यामध्ये पदे रिक्त असल्यामुळे जनतेचे नुकसान होत असते. त्यामुळे राज्यशासन या प्रश्नाच्या बाबतीत काही प्रिसीडन्ट बाजूला ठेवून धोरणात्मक निर्णय घेणार काय ? यासंदर्भातील निर्णय मागील काळात वैद्यकीय शिक्षण खात्याने घेतला होता व त्यामुळे बरीच सुधारणा झाली होती. त्यामुळे इतर खात्यामध्ये सुध्दा प्रिसीडन्ट बाजूला ठेवून पदे भरण्याचा निर्णय घेतला जाणार आहे काय ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25290....

डॉ.दीपक सावंत...

अनुसूचित जमाती आणि अपंग प्रवर्गासाठी उमेदवार प्राप्त झाले नाहीत असे आपण नमूद केले आहे. सदर प्रवर्गाचे उमेदवार प्राप्त न झाल्यास आपण कोणती कार्यवाही करणार आहात ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यामध्ये ए, बी, सी, डी अशा चार कॅटेगरी आहेत. या विभागामध्ये 1085 पदे आहेत. ए व बी ग्रेड मधील 100 टक्के पदे भरली आहेत. सी आणि डी मधील 60 पदे भरण्याची कार्यवाही सुरू होती. ती पूर्ण करण्यात आली आहे. न्याय विभागातील वाढत्या कामाचा व्याप लक्षात घेता शासनाने नवीन 773 पदे निर्माण केली आहेत. सदर पदे जाहिरातीद्वारे भरण्याची कार्यवाही सुरू केली असून नजिकच्या काळात ती पदे पूर्णपणे भरली जातील.

....

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पुणे महानगरपालिकेच्या शाळांतील स्वच्छतेबाबत**

**(9) * 26778 श्री.मोहन जोशी , श्रीमती दिप्ती चवधरी , श्री.उल्हास पवार , श्री.जयप्रकाश छाजेड , श्री.एम.एम.शेख , श्री.अनिल भोसले** : सन्माननीय **मुख्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पुणे महानगरपालिका (जि.पुणे) प्रशासनाने स्वाईन फ्ल्यूच्या थैमानानंतर शाळांमधील स्वच्छतागृहांच्या दुरुस्ती करीता दोन कोटी रुपयांची तरतूद केली होती, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, स्वच्छतागृहांच्या दुरुस्ती आणि पाण्याच्या व्यवस्थेसाठी दोन कोटी रुपयांऐवजी केवळ 21 लाख रुपयांचे व तेही केवळ कामगारांच्या वेतनासाठी खर्च केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(3) तसेच शिक्षणमंडळाच्या 247 शाळांमध्ये 40 मुलांमागे एक स्वच्छतागृह असावे या नियमांची अंमलबजावणी न करता निधीची तरतूद करुनही यापैकी फक्त 91 शाळांमध्ये स्वच्छतागृहांची दुरुस्ती व सफाई केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(4) असल्यास, उर्वरित शाळांतील स्वच्छतागृहांची दुरुस्ती व साफसफाई करण्यासाठी तसेच सदर कामात दिरंगाई करणाऱ्या संबंधितांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली आहे, वा करण्यात येत आहे,

(5) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भास्कर जाधव, श्री.पृथ्वीराज चव्हाण यांच्याकरिता** : (1), (2), (3) व (4) पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या एकूण 247 शाळा एकूण 141 इमारतींमध्ये भरतात. सदर 141 शाळा इमारतीपैकी 139 इमारती मध्ये पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. उर्वरित दोन शाळांच्या इमारतींमध्ये जागेअभावी व पाण्याचे नळ जोडणी नसल्याने पाणी साठवून पिण्याच्या पाण्याच्या व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमधील सुमारे 82000 मुलांसाठी सदर 141 शाळा इमारतीमध्ये 1069 स्वच्छतागृहे उपलब्ध असून सद्य:स्थितीत सदर स्वच्छतागृहे पुरेशी आहे. या सर्व स्वच्छता गृहांची स्वच्छता महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्यात येते.

शिक्षण मंडळाच्या शाळांमधील स्वच्छता गृहांची स्वच्छता करण्यासाठी निविदा मागविण्यात आली असता आलेल्या दरपत्रकानुसार सदरचे दर जास्त वाटत असल्याने वर्षभराची स्वच्छता उपलब्ध तरतुदी मधून करणे शक्य नसल्यामुळे पुर्वीप्रमाणेच महानगरपालिकेच्या शाळांच्या स्वच्छता गृहांची स्वच्छता महानगरपालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत करण्याचा ठराव दि.18.7.2011 रोजी शिक्षण मंडळाने केला.

शिक्षण मंडळाच्या शाळामधील स्वच्छता गृहांची स्वच्छता करण्यासाठी सन 2011-12 मध्ये रु.77 लक्ष इतकी तरतूद मान्य करण्यात आली होती. त्यापैकी रु.23 लक्ष इतकी खर्च झालेली आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26778...

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, 40 मुलांमागे एक स्वच्छतागृह हा नियम आहे. उत्तरामध्ये असे सांगितले आहे की, 1069 स्वच्छतागृहे आहेत. पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये 82 हजार मुले आहेत व ती शिक्षण घेत आहेत असे आपल्या उत्तरात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाला 2100 पेक्षा जास्त स्वच्छतागृहांची आवश्यकता आहे. त्यामुळे 1000 वाढीव स्वच्छतागृहे कधी बांधण्यात येणार आहे, असा माझा स्पेसिफिक प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, 1069 स्वच्छतागृहासाठी 23 लाख रूपये खर्च केला आहे म्हणजे एका स्वच्छतागृहाला दर महिन्याला फक्त 180 रूपये खर्च झाला आहे. तो खर्च कसा करण्यात आला, सफाई कर्मचाऱ्यांच्या वेतनावरच खर्च झाला काय, दुरूस्ती देखभालीवर किती खर्च झाला आहे ? माझ्याकडे माहितीच्या अधिकारातील माहिती आहे. निधीची तरतूद करूनही या शाळांमध्ये स्वच्छतागृहांची दुरूस्ती वा सफाई केलेली नाही याची चौकशी शासन करणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पुणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये सुमारे 82000 मुले असून एकूण 141 शाळा आहेत. 141 इमारतींमध्ये स्वच्छतागृहांची सोय आहे. साधारणत: नियम असा आहे की, 121 मुलांमागे एक स्वच्छतागृह असायला हवे. अधिकची स्वच्छतागृहे बांधण्यासाठी महानगरपालिकेने तशा प्रकारची तरतूद देखील केली आहे. बऱ्याच ठिकाणी जागा उपलब्ध होत नाही त्यामुळे थोडीशी अडचण निर्माण होते. तसेच, पाण्याच्या प्रश्नासंबंधी देखील बहुसंख्य ठिकाणी व्यवस्था झाली आहे. 1-2 ठिकाणी पाण्याची व्यवस्था जागे अभावी होत नाही. त्यामुळे तेथे टाक्या ठेवून पाण्याची व्यवस्था केली आहे. सन 2011-12 मध्ये रूपये 77 लाख इतकी तरतूद मान्य केली होती. परंतु ती पूर्णपणे खर्च होऊ शकली नाही, ही गोष्ट खरी आहे. 1069 स्वच्छतागृहांकरिता अंदाजे रूपये 2 कोटी 93 लाख एवढया रकमेची तरतूद केली होती. ज्या ज्या ठिकाणी निधी खर्च करणे आवश्यक आहे तेथे तो खर्च केला जाईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, हा प्रश्न शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. आता जी आकडेवारी आली आहे त्यावरून स्वच्छतागृहांची स्वच्छता करावी हा त्यातील एक महत्त्वाचा भाग आहे. मोठी तरतूद असून देखील स्वच्छतागृहांवर कमी खर्च झाला आहे. याचा अर्थ त्या स्वच्छतागृहांची स्वच्छता नीट होत नाही असा आहे. तेथे आरोग्यदायी वातावरण नसेल तर वेगवेगळे आजार उद्‌भवण्याची शक्यता आहे.

यानंतर श्री.सरफरे......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26778....

श्री. हेमंत टकले....

या ठिकाणी स्वच्छतेच्या सोयीसाठी जो निधी ठेवण्यात आलेला आहे त्यामध्ये महानगरपालिकेकडून स्वच्छतेसाठी आवश्यक असलेल्या घटकांचा समावेश करुन ती स्वच्छता केली जात आहे काय? त्याचप्रमाणे स्वच्छतागृहांची स्वच्छता करण्यात आली आहे की नाही यावर देखरेख करणारी यंत्रणा त्यांच्याकडे आहे काय, अपुऱ्या असलेल्या स्वच्छतागृहांची संख्या वाढविण्यासाठी शासन अधिक निधी उपलब्ध करुन देणार आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, महानगरपालिकेला या सर्व गोष्टी करण्यासाठी शासन निश्चितपणे् भाग पाडील. मघाशी सांगितल्याप्रमाणे 306 शाळांकरिता 141 इमारतींमध्ये स्वच्छतागृहे बांधण्यात आली आहेत. ज्या ठिकाणी स्वच्छतागृहांची कमतरता असेल त्या ठिकाणी नवीन स्वच्छतागृहे बांधण्याकरिता त्यांनी आपल्या अंदाजपत्रकामध्ये तरतूद केली आहे. प्रश्न असा आहे की, या ठिकाणी मोठया प्रमाणात निधीची उपलब्धता असतांना फक्त 23 लाख रुपये कां खर्च करण्यात आले? मुळामध्ये या कामाचे कंत्राट देत असतांना थोडी अधिकची तरतूद केली जात असते. आपल्याला माहीत आहे की, ब-याच वेळेस शाळेतील मुले तोडफोड करीत असतात. तेव्हा महानगरपालिकेकडूनच या स्वच्छतागृहांची स्वच्छता होत असल्यामुळे आणि कर्मचाऱ्यांच्या पगारावरील खर्च परस्पर अन्य प्रकारे होत असल्यामुळे या ठिकाणी होत असलेला खर्च कमी दिसत आहे.

डॉ. नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, शिक्षणाच्या नावावर महानगरपालिका एवढा खर्च करीत असते. दोन दिवसानंतर शिक्षण मंडळाच्या सदस्यांच्या नियुक्त्या आणि निवडणुका होणार आहेत. आजकालचे वातावरण पाहिल्यास शिक्षण मंडळांची जागा ही सेवांपेक्षा कशासाठी प्रसिध्द आहे हे आपणा सर्वांना माहीत आहे. माननीय सदस्य श्री. मोहन जोशी यांनी विचारलेल्या प्रश्नामध्ये स्वच्छतागृहांसाठी 2 कोटींची तरतूद करण्यात आली होती त्यापैकी कामगारांच्या वेतनावर 21 लाख रुपये खर्च करण्यात आले या संदर्भात आपण स्पष्टीकरण दिले नाही. माझा प्रश्न असा आहे की, केवळ स्वच्छतागृहांसाठी ठेवण्यात आलेल्या निधीमधून एवढाच खर्च कां करण्यात आला? उरलेल्या निधीचे काय झाले या बाबत शिक्षण मंडळाची राज्य स्तरावर आर्थिक चौकशी करण्याबाबत आपण निर्णय घेणार काय? दुसरा प्रश्न असा की, यामध्ये अखर्चित राहिलेला निधी कशासाठी वापरण्यात आला आहे, त्याबाबत आयत्यावेळी काही निर्णय घेण्यात आले आहेत काय?

ता.प्र.क्र. 26778....

डॉ. नीलम गोऱ्हे....

या संदर्भात आपण चौकशी करणार काय? त्याचप्रमाणे 2 हजार स्वच्छतागृहांची गरज असल्यामुळे ही स्वच्छतागृहे बांधण्याबाबत शिक्षण मंडळाने निश्चित कालमर्यादा ठरवून दिली आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी मागणी केल्यानुसार शिक्षण मंडळांची शासन स्तरावर चौकशी करण्याची आवश्यकता वाटत नाही. दुसरे असे की, या स्वच्छतागृहांसाठी आतापर्यन्त 23 लाख रुपये खर्च झाले आहेत. तिसरा प्रश्न उरलेल्या पैशाचा विनियोग कशाप्रकारे करण्यात आला असा विचारण्यात आला आहे. उरलेल्या पैशाचे आपण समायोजन करीत असतो. परंतु तरीसुध्दा या पैशाचा विनियोग कुठे करण्यात आला या बाबतची माहिती प्राप्त करुन घेऊन ती माननीय सदस्यांना अवगत केली जाईल.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, या प्रश्नाच्या निमित्ताने माननीय सदस्य श्री. हेमंत टकले यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. महानगरपालिकेच्या शाळांमध्ये प्रामुख्याने झोपडपट्टीतील गरीब मुले-मुली शिक्षण घेत असतात. त्यामुळे इतरांपेक्षा या ठिकाणी शासनाने थोडी जास्त काळजी घेण्याची आवश्यकता आहे. मी आपणास सांगू इच्छितो की, पुणे महानगरपालिकेने अतिशय उत्तम शाळेच्या इमारती बांधल्या आहेत. परंतु त्या ठिकाणी स्वच्छतागृहांसाठी जागा उपलब्ध झालेली नाही असे मंत्री महोदयांनी उत्तर दिल्यामुळे माझ्या मनामध्ये संभ्रम निर्माण झालेला आहे. महानगरपालिकेने उत्तम इमारती बांधल्या असतांना जागा उपलब्ध झाली नाही म्हणजे काय हे मला समजू शकले नाही? दुसरा मुद्दा असा की, स्वाईन फ्लूसारखे संसर्गजन्य रोग अधूनमधून उद्भवत आहेत. त्या दृष्टीने या गरीब मुलांची महानगरपालिकेच्या शाळेमध्ये काळजी घेण्याच्या दृष्टीने या शौचालयांची उत्तम प्रकारे डागडुजी केली जाईल, त्यांची देखभाल केली जाईल या दृष्टीने योग्य ती कारवाई करण्यासाठी शासन कोणते प्रयत्न करणार आहे?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, माननीय सदस्यांनी या ठिकाणी दोन मूलभूत प्रश्न उपस्थित केले आहेत. महानगरपालिकेने इमारत बांधली असतांना त्या ठिकाणी स्वच्छतागृहे बांधण्यासाठी जागा कां उपलब्ध होऊ शकली नाही असे त्यांनी विचारले आहे? सभापती महोदय, या ठिकाणी असलेल्या शाळा पूर्वीच्या असून त्या काळात तो कन्सेप्ट नव्हता अशा प्रकारची तांत्रिक अडचण निर्माण झाली. तरीसुध्दा आपण म्हणता त्या प्रमाणे या संपूर्ण गोष्टींची निश्चितपणे माहिती

अप्रकाशित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. भास्कर जाधव.....

ता.प्र.क्र. 26778....

घेतली जाईल. जर तशाप्रकारची आवश्यकता वाटली तर शिक्षण मंडळाचे अधिकारी, महानगरपालिकेचे अधिकारी यांच्यासमवेत आपली एक बैठक आयोजित करण्यास माझी हरकत असणार नाही.

**सभापती** : प्रश्नोत्तरांचा तास संपलेला आहे.

----

(यानंतर सौ. रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी**. : औचित्याचे मुद्दे

**सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्याशी संबंधित असलेल्या सर्व वस्तू व दस्तऐवज ही राष्ट्राची संपत्ती आहे. मग त्यांचा चष्मा असो किंवा चरखा असो, पण त्यांच्या इतर काही वस्तू लंडनपर्यंत पोहोचल्या आहेत. मात्र हा आपला राष्ट्रीय ठेवा असूनही आपण त्याबाबत काही करु शकत नाही. मात्र दोन दिवसांनी म्हणजे 17 तारखेला त्यांच्या वस्तूंचा लिलाव लंडन मध्ये होणार आहे. त्यामुळे माझी आपल्यामार्फत माननीय मुख्यमंत्री साहेबांना विनंती आहे की, या बाबतीत केंद्र शासनाबरोबर चर्चा करुन राष्ट्रपिता महात्मा गांधींच्या वस्तूंचे, या राष्ट्रीय संपत्तीचे जतन करण्यासाठी भारत सरकारने लिलावामध्ये या वस्तू विकत घ्याव्यात. जेणेकरुन भारतातील संग्रहालयामध्ये त्यांच्या वस्तू कायम स्वरुपामध्ये राहू शकतील यादृष्टीने केंद्र शासनाला विनंती करण्यात यावी अशी मी आपल्या मार्फत माननीय मुख्यमंत्र्यांना विनंती करतो.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे हा विषय केंद्र शासनाच्या अखत्यारितील आहे.याबाबतीत माननीय केंद्रीय सांस्कृतिक कार्यमंत्री यांना सभागृहाच्या भावना निश्चितपणे लिहून कळविण्यात येतील आणि याबाबत सन्माननीय सदस्यांनी सुचविल्याप्रमाणे कार्यवाही करावी आणि हा आपला जो सांस्कृतिक ठेवा आहे तो कोणत्याही परिस्थितीमध्ये परत मिळविण्याचा प्रयत्न करावा अशी त्यांना विनंती करण्यात येईल.

------

. . . .2 के-2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, आपण मला औचित्याचा मुद्दा मांडण्यासाठी परवानगी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.मी दोन दिवसापूर्वी वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली की, पंढरपूर या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी पर्यटन खात्यामार्फत भक्त निवास म्हणजे हॉटेलवजा असे एक निवासस्थान तयार करण्यात आले होते. 1981-1982 च्या दरम्यान लिलाव केल्यावर कोणीतरी ती इमारत घेणार आणि पर्यटनाच्या नियमाप्रमाणे सगळे नियम लागू करुन तेथे हॉटेल सुरु करणार आणि मग त्या हॉटेलमध्ये पर्यटनाच्या नियमाप्रमाणे व्यवस्था करणार अशा प्रकारची 1982 मध्ये बातमी आली होती. त्यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष माननीय श्री.बाळासाहेब भारदे होते आणि मी काल पुन्हा तशा प्रकारची बातमी वाचली की, त्याचे पुनरुज्जीवन होणार आहे. तेथे पर्यटन विभागामार्फत थ्री-स्टार पध्दतीचे हॉटेल होणार आहे. मी आठवण करुन देऊ इच्छितो की, त्यावेळी वर्तमान पत्राच्या जाहिरातीच्या माध्यमातून लिलाव जाहीर करण्यात आला होता आणि त्यावेळचे सन्माननीय उप मुख्यमंत्री कै.रामराव आदिक यांना माननीय श्री.बाळासाहेब भारदे आणि आम्ही सर्वजण भेटलो होतो आणि मग लिलावासाठी जी तारीख जाहीर झाली होती, ती रद्द करण्यात आली आणि पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी समितीला सदरहू भक्त निवास देऊन दरवर्षाला आठ लाख रुपये याप्रमाणे 65 लाख रुपये वसूल करावयाचे आणि ती पूर्ण इमारत मंदिर समितीच्या ताब्यात द्यावयाची असे त्यावेळी ठरविण्यात आले होते. मी सन्माननीय उप मुख्यमंत्री कै.रामराव आदिक यांचे स्मरण करतो, कारण त्यांनी तेव्हा तो लिलाव रद्द केला आणि आता पुन्हा पर्यटन विभागाच्या माध्यमातून तेथे थ्री-स्टार हॉटेल होणार आहे म्हणजे याबाबतीत नेमके काय सुरु आहे?

सभापती महोदय, त्यावेळी आम्ही, माननीय श्री.शेलारमामा असतील किंवा माननीय कै.श्री. बाळासाहेब भारदे असतील किंवा सर्व वारकरी संप्रदाय असेल त्यांनी या संपूर्ण पंढरपूरच्या परिसरामध्ये बार किंवा बिअर बार, दारु वगैरे गोष्टी येता कामा नयेत यादृष्टीने प्रयत्न केले होते. परंतु जर त्याठिकाणी थ्री-स्टार पध्दतीचे हॉटेल बांधावयाचे असा ठेका घेऊन कोणी उभे रहाणार असतील तर ते तीर्थक्षेत्राच्या दृष्टीने आणि पंढरपूर सारख्या ऐतिहासिक जागतिक किर्तीच्या क्षेत्राच्या दृष्टीने योग्य होणार नाही.मी दोन दिवसापूर्वी वर्तमानपत्रामध्ये अशा प्रकारची बातमी वाचल्यामुळे मला ती गंभीर वाटली. त्यामुळे याची दखल घेण्यात यावी असे मला सांगावयाचे आहे. तसेच जर असे होणार असेल तर याठिकाणी सन्माननीय मुख्यमंत्री महोदय उपस्थित आहेत. मी त्यांच्याकडून अपेक्षा करतो की, तेथे असा प्रकार होऊ नये अशा प्रकारची सर्व वारकऱ्यांची भावना

असल्याचे मी त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

श्री.पृथ्वीराज चव्हाण : सभापती महोदय, मी याबाबतीत माहिती घेऊन सभागृहामध्ये सांगेन.

**सभापती** : ठीक आहे.

------

. . . .2 के-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांच्या दृष्टीने बैलगाड्यांच्या शर्यती ही एक हौसेची गोष्ट आहे. परंतु बैलगाड्यांच्या शर्यतीसाठी हाय कोर्टाने बंदी घातलेली आहे. या राज्यामध्ये रेस कोर्सवर घोड्यांवर जुगार खेळण्याचे काम राजरोसपणे सुरु आहे.बैलगाड्यांची शर्यत ही शेतकऱ्यांच्या दृष्टीने हौसेची असते आणि ही गेल्या 500 वर्षापासून परंपरा सुरु आहे. परंतु मुंबईतून कोणीतरी एखादा एन.जी.ओ. तेथे येऊन सांगतो की, अशा प्रकारच्या शर्यतीमुळे बैलांना त्रास होतो. मग कदाचित उद्या तेथे एखादा एन.जी.ओ.जाईल आणि असे सांगेल की, बैलगाडीतून सामानसुध्दा नेऊ नका, त्यावर सुध्दा बंदी घालावी, मग यासाठी हाय कोर्टाचे आदेश आणले जातील. त्यामुळे या संदर्भात राज्य शासनाने सुप्रीम कोर्टामध्ये जाऊन बैल गाड्यांच्या शर्यतीवरील बंदी उठविली पाहिजे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.जयंत प्र.पाटील.....

या संदर्भात कायदा करण्याची गरज आहे असे माझे मत आहे. माननीय उच्च न्यायालयाने कायद्याप्रमाणे न्याय द्यायचा आहे. बैलांना पराठी लावू नये, चाबकाने मारु नये अशा प्रकारची बंदी असावी. शेतकरी वर्षभर काबाडकष्ट करीत असतो. बैलगाड्यांची शर्यत एवढीच त्याची हौस असते. तेव्हा बैलगाड्यांच्या शर्यती वरील बंदी कशी उठेल हे शासनाने पहावे. या संदर्भात शासनाला कायदा करावा लागला तर तो करावी अशी विनंती आहे. दुसरे म्हणजे गृह विभागाने देखील या बाबीकडे थोडे दुर्लक्ष करावे अशी विनंती आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, ही गोष्ट खरी आहे की, राज्यातील काही भागांत बैलगाड्यांच्या शर्यती होतात. या मध्ये दोन बाजू आहेत. एक म्हणजे जनावरांवर क्रुएल्टी करु नये म्हणून काही एनजीओ सतर्क आहेत. काही ठिकाणी बैलांना अमानुषपणे मारले जाते ही देखील वस्तुस्थिती आहे. तर काही ठिकाणी बैलांना मारहाण न करता शर्यती होतात ही देखील वस्तुस्थिती आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेला मुद्दा खरा आहे की, राज्यामध्ये घोड्यांच्या शर्यतीला परवानगी आहे, परंतु बैलगाड्यांच्या शर्यतीला परवानगी नाही.

मी या निमित्ताने एक बाब निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, वन विभागाने परिपत्रक काढलेले आहे त्यानुसार उमेदवाराला 25 कि.मी.धावावे लागेल. पोलीस भरतीमध्ये सुध्दा उमदेवारांना 5 कि.मी.धावायला सांगितले जाते. म्हणजे या ठिकाणी सुध्दा अमानुषपणा दिसतो. परंतु उमेदवारांमध्ये काही स्कील निर्माण व्हावे, काटकपणा यावा म्हणून काही गोष्टी केल्या जातात. बैलगाड्यांच्या शर्यती बाबत एनजीओ फारच सर्तक आहेत, त्यांच्या बापजाद्यांनी कधीच बैल पाळले नव्हते. या संदर्भात केंद्राचा कायदा आहे. त्या कायद्याला अनुसरुन न्यायालय निर्णय देत असते. ज्या ठिकाणी क्रुएल्टी केली जात नाही, बैलांना मारहाण केली जात नाही, कुठेही अमानुषपणा होत नाही. दारु किंवा गुंगी येणारी औषधे दिली जात नाहीत अशा अटींवर बैलगाड्यांची शर्यत घेण्याची परवानगी द्यावी अशा सन्माननीय सदस्यांनी केलेल्या मागणीवर शासन गांभीर्याने विचार करेल. सन्माननीय सदस्यांनी दुसरी मागणी केली की, अशा शर्यतींकडे पोलिसांनी दुर्लक्ष करावे. इतकी उघडपणे मागणी केल्यावर त्याकडे कोण दुर्लक्ष करेल ? पोलिसांनी दुर्लक्ष करावे अशी त्यांची अपेक्षा असते त्यावेळी त्यांनी मला एकट्याला येऊन भेटावे त्यासाठी सदनाचा वापर करु नये.

----

..2.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

आमदारांना रेल्वेने प्रवास करण्यासाठी हिरव्या आणि पिवळ्या रंगाची रेल्वे कुपन्स दिलेली आहेत. पिवळ्या रंगाच्या रेल्वे कुपन्सचा वापर कुटुंबासाठी आणि पी.ए.ची तिकिटे काढण्यासाठी करतो. परंतु नागपूरच्या रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की,आम्ही पिवळ्या रंगाच्या रेल्वे कुपन्सवर पी.ए.ची तिकिटे देणार नाही. आपण हिरव्या रंगाच्या रेल्वे कुपन्सवर तिकिटे काढावीत. पिवळ्या रंगाच्या रेल्वे कुपन्सवर "राज्या बाहेरील" असे लिहिलेले असल्यामुळे राज्यांतर्गत प्रवासासाठी तिकिटे काढू देणार नाही. त्यामुळे आमच्याकडील हिरव्या रंगाची रेल्वे कुपन्स संपत आली आहेत आणि रेल्वेचे अधिकारी पिवळ्या रंगाच्या रेल्वे कुपन्सवर पी.ए.ची तिकिटे देत नाहीत. तेव्हा आपले या संदर्भातील जे काही नियम असतील ते रेल्वेला कळवावेत जेणेकरुन आम्हाला त्रास होणार नाही.

**सभापती** : मी स्वत: याची नोंद घेतो.

---------

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शिरोडा येथे दिनांक 6 एप्रिल 1930 रोजी "मिठाचा सत्याग्रह" झाला होता. महात्मा गांधीनी ही चळवळ सुरु केली होती. देशभरातून जवळपास 80 हजार लोक या चळवळीमध्ये सामील होऊन त्यांनी ब्रिटीशांना सळो की पळो करुन सोडले होते. नव्या पिढीला याची माहिती व्हावी, त्यांनी यातून काही तरी बोध घ्यावा यासाठी शिरोडा येथे महात्मा गांधींचे स्मारक व्हावे अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे करीत आहे. मिठाचा सत्याग्रह करण्याचे कारण म्हणजे ब्रिटीशांचे मीठ या ठिकाणी खपावे यासाठी त्यांनी स्थानिक मिठावर दोन हजार पट टॅक्स लावला होता. या चळवळीमध्ये महात्मा गांधी यांचे समवेत कै.अप्पा पटवर्धन होते. ती जागा केंद्र सरकारच्या अखत्यारितील असली तरी राज्य शासनाने केंद्राला विनंती करुन ती जागा आपल्या ताब्यात घेऊन तेथे महात्मा गांधीचें स्मारक उभारावे अशी मी मागणी करीत आहे.

**सभापती** : सन्माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी याची नोंद घ्यावी व राज्य शासनाकडून महात्मा गांधीचे स्मारक कसे उभारता येईल या बाबतीत स्वत: लक्ष घालावे.

-------

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

काल विधान भवनामध्ये मी आलो असताना विधानसभेतील काही महिला आमदार भगिनी आणि विधान परिषदेतील महिला आमदार भगिनी मला भेटल्या आणि त्यांनी माझ्याकडे एक निवेदन दिले. पूर्वी या विधान भवनामध्ये सर्वपक्षीय महिला सदस्यांसाठी एक स्पेशल रुमची व्यवस्था होती. त्या ठिकाणी टॉयलेटपासून सर्व व्यवस्था असावयाची. आता ती व्यवस्था नाही. त्यांनी निवेदनात असे म्हटले आहे की, सर्वपक्षीय आमदार महिलांसाठी विधान भवनामध्ये एखादी रुम असली पाहिजे यादृष्टीने आपण आमचे म्हणणे सभागृहात मांडावे. त्या दृष्टीने मी हा औचित्याचा मुद्दा या ठिकाणी मांडत आहे. दोन्ही सभागृहातील महिला आमदार भगिनींसाठी विधान भवनामध्ये एक स्पेशल रुम त्यांना बसण्यासाठी असली पाहिजे. फावल्या वेळा त्या भगिनी त्या ठिकाणी जाऊन बसू शकतील, त्याचे विधी उरकू शकतील या दृष्टीने अशा पध्दतीने महिलांसाठी एका रुमची व्यवस्था असली पाहिजे. याची दखल आपल्या विभागाने घ्यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याव्दारे विनंती करतो.

**सभापती** : 15 दिवसांपूर्वी काही महिला भगिनी माझ्याकडे आल्या होत्या. माझी त्यांच्याबरोबर चर्चा झाली. त्यानंतर आमच्या प्रधान सचिवांबरोबर मी बोललो. कोणत्याही परिस्थितीमध्ये या महिला भगिनींच्या अनुषंगाने अत्यंत अद्ययावत अशा पध्दतीची स्वतंत्र व्यवस्था प्राधान्याने करण्याचे आमचे ठरले आहे. त्यादृष्टीने आपण जी सूचना केली ती योग्य आहे. त्याचा पाठपुरावा आम्ही करीत आहोत.

---



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**पृ.शी.** : तारांकित प्रश्नावरील चर्चेत दिलेल्या आश्वासनाच्या संदर्भात निवेदन

**मु.शी.** : तारांकित प्रश्न क्रमांक 21572 वरील चर्चेत दिलेल्या आश्वासनाच्या संदर्भात माननीय आदिवासी विकास मंत्री यांचे निवेदन

श्री. बबनराव पाचपुते ( आदिवासी विकास मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने विधान परिषदेत तारांकित प्रश्न क्रमांक 21572 वरील चर्चेत दिलेल्या आश्वासनाच्या संदर्भात पुढील निवेदन करीत आहे.

सभापती महोदय, श्री. वरवंटकर, अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्या बाबत जनरेटर खरेदीमधील गैरव्यवहाराच्या तक्रारीच्या अनुषंगाने आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचा चौकशी अहवाल दि. 1.12.2011 रोजी शासनास प्राप्त झाला. सदर अहवालाची सखोल तपासणी केल्याशिवाय श्री. वरवंटकर, अपर आयुक्त यांच्यावर कारवाईबाबतचा निर्णय घेता येत नव्हता. त्यामुळे याबाबतचे निवेदन मी सभागृहात करु शकलो नाही. याबद्दल मी दिलगिरी व्यक्त करीत आहे.

आता सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने श्री. वरवंटकर यांना दि. 24.2.2012 अन्वये कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे. त्यांना दि. 6.3.2012 रोजी नोटीस बजावण्यात आली होती. या नोटिशीवरील त्यांचा खुलासा दि. 29.3.2012 रोजी प्राप्त झाला असून याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

---

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

...3...

RDB/

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहामध्ये इतक्या वेळा चर्चा झाली आणि त्यांना फक्त कारणे दाखवा नोटीस दिलेली आहे.

श्री. भाई जगताप : मागच्या वेळी आपण ज्या चौकशीसाठी थांबला होता....

( अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बोलण्याचा प्रयत्न करतात )

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, श्री. वरवंटकर हे फॉरेस्टचे अधिकारी आहेत. ते आय.एफ.एस. अधिकारी आहेत. त्यामुळे त्या खात्याला विचारावे लागणार आहे. त्यांच्याकडे ते प्रकरण दिले होते. त्यांच्याकडून उत्तर आल्याबरोबर कारवाई होईल. डायरेक्ट कारवाई करता येत नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आय.एस.एस. अधिकारी असो, आय.पी.एस. अधिकारी असो किंवा आय.एफ.एस. अधिकारी असो, त्या अधिकाऱ्यांच्या सर्व्हिस कंडीशनमध्ये ज्या तरतुदी आहेत त्या तरतुदींच्या अंतर्गत राज्य शासनाला अधिकार आहे. ज्या चौकशीसाठी थांबला होता ती चौकशी पूर्ण झाल्यानंतर कारवाई करण्यात येईल असे उत्तर दिले होते. आता कारवाई करण्यामध्ये दिरंगाई का होत आहे ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, यामध्ये दिरंगाई नाही. ते आय.एफ.एस. अधिकारी असल्यामुळे या बाबतीत त्यांच्या खात्याला कळविले आहे. त्यांचे उत्तर आल्यानंतर पुढे कार्यवाही सुरु होईल. आपण त्यांना कळविले आहे की कारवाई करावयाची आहे. त्यांच्याकडून उत्तर आल्यानंतर त्या संदर्भात पुढे कार्यवाही होईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय, आय.एफ.एस. अधिकाऱ्यापुढे हतबल आहेत का ? सभागृहामध्ये आश्वासन दिलेले आहे.

**सभापती** : माननीय मंत्री महोदयांनी निवेदन केल्यानंतर त्यावर मी जरुर एक दोन प्रश्न विचारावयास दिले. मी माननीय मंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, ज्यावेळी सभागृहामध्ये सातत्याने सन्माननीय सदस्यांच्या भावना या बाबतीत तीव्र होतात आणि ज्यावेळी पाठपुरावा होतो त्यावेळी जर प्रसंग आला तर कठोर कारवाई करण्याच्या दृष्टीने सुध्दा आपण बघणे गरजेचे आहे, याची काळजी माननीय मंत्री महोदयांनी घ्यावी.

---

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ पूर्वी श्री.बरवड 13:35

**पृ.शी./मु.शी.**: औचित्याचे मुद्दे

( पुढे सुरु.....

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, यंदा 10 वी व 12 वी च्या परीक्षेच्या दरम्यान राज्यात कॉपीमुक्त अभियान राबविण्यात आले होते. एस.एस.सी.बोर्डाच्या नियमावलीमध्ये परीक्षेच्या काळात गैरप्रकारास जे दोषी असतील त्यांच्याविरुध्द कारवाई करण्याचे अधिकार मंडळाला आहेत. परीक्षेच्या काळात जिल्हाधिकारी व मामलेदारांनी परीक्षा केंद्रांना भेटी दिल्या होत्या. त्यावेळी 5 कॉपीची प्रकरणे आढळून आली होती. त्यामुळे संबंधित शिक्षकांविरुध्द एफ.आय.आर.नोंदविण्यात आले असून राज्यभरात 50 केसेस दाखल झालेल्या आहेत. त्यामुळे शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मी माननीय गृह मंत्री श्री.आर.आर.पाटील यांना विनंती करतो की, जे एफ.आय.आर.दाखल केलेले आहेत ते मागे घेण्यात यावेत. यापुढे शिक्षक चांगल्या प्रकारे काम करतील. शिक्षकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झालेले आहे. शिक्षकांवर मोठा अन्याय होत आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, हे एफ.आय.आर.शिक्षण विभागाने दाखल केले असतील तर ते कोणत्या परिस्थितीमध्ये दाखल केले आहेत ते पाहणे आवश्यक आहे. पोलिसांनी दाखल केले असतील तर...

श्री.भगवान साळुंखे : शिक्षण खात्यातील अधिकाऱ्यांनी भेटी देऊन एफ.आय.आर.दाखल केले आहेत.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सरसकट एफ.आय.आर.मागे घ्यावेत असे म्हणणे बरोबर नाही. केस टू केस मेरिटवर बघून जेथे शिक्षकाचा संबंध असेल तेथे एफ.आय.आर.ची नोंद करुन चौकशी सुरु राहिली पाहिजे. जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. जेथे शिक्षकांचा संबंध नसेल तर त्याबाबत चौकशी करुन ते एफ.आय.आर.रद्द केले पाहिजेत. सभापती महोदय, कॉपीच्या संदर्भात राज्यात अलीकडच्या काळात खूप चांगल्या भूमिका घेतल्या आहेत. जेथे बोनाफाईड मिस्टेक असेल, दुर्लक्ष झाले असेल तर त्याबाबत त्या विभागाने वेगळ्या पध्दतीची कारवाई केली पाहिजे. त्याबाबत लगेच एफ.आय.आर.नोंदवून कोणाला अटक करण्याची आवश्यकता नाही.

----------

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, 26 जानेवारी, 15 ऑगस्ट आणि सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित पवार यांनी सांगितल्या प्रमाणे 1 मे या तीन दिवशी शाळांमध्ये ध्वजवंदन केले जावे असा मुद्दा मी सातत्याने सभागृहात मांडलेला होता. परंतु बऱ्याचशा शाळांमध्ये 26 जानेवारी रोजी ध्वजवंदन झालेले नव्हते. मी माहितीच्या अधिकाराखाली मी माहिती मागविली असता, ही माहिती उपलब्ध नाही अशा प्रकारचे मला उत्तर पाठविण्यात आले आहे. वास्तविक यासंबंधी शासनाने एक परिपत्रक काढलेले आहे. या विषयाचा वस्तुस्थितीदर्शक अहवाल गेल्या वर्षभरामध्ये सादर झालेला नाही. महानगरपालिकांच्या सर्व शाळांमध्ये, आयसीएसईच्या शाळांमध्ये, आयबी शाळांमध्ये, सीबीएसईच्या शाळांमध्ये 26 जानेवारी, 15 ऑगस्ट व 1 मे या दिवशी ध्वजवंदन झाले आहे किंवा नाही याचा अहवाल सभागृहाला ताबडतोब मिळावा असा माझा औचित्याचा मुद्दा आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, शिक्षण विभागाला यासंबंधी निवेदन करण्यास सांगितले जाईल.

------

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यात चोऱ्यांची प्रकरणे वाढलेली आहेत. खास करुन दिवेआगार येथील गणपतीच्या मूर्तीची चोरी होऊन बरेच दिवस झाल्यामुळे स्थानिकांनी मोर्चा काढला होता. याबाबत पुणे येथील सीआयडी तपास करीत आहे असे माझ्या वाचनामध्ये आले आहे.

सभापती महोदय, काल पुण्यामध्ये अतिशय गंभीर प्रकार घडलेला आहे. महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पु.ल.देशपांडे यांचे घर डेक्कन जिमखाना भागामधील भांडारकर रस्त्यावरील मालती माधव या सोसायटीमध्ये आहे. तेथे मध्यरात्री चोरट्यांनी धुमाकूळ घालून चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांना तेथे मौल्यवान वस्तू सापडल्या नाहीत. परंतु त्यांनी घरातील पुस्तकांची नासधूस केली आहे. राज्यात एका बाजूला देव सुरक्षित नाहीत. परंतु या सदनिकेच्या परिसरामध्ये सुरक्षा व्यवस्था वाढविण्यासाठी मी औचित्याद्वारे शासनाचे लक्ष वेधत आहे. योगायोगाने त्या भागातील पोलीस निरीक्षक श्री.मनोहर जोशी यांनी तक्रार दाखल करुन घेतली आहे. पु.ल.देशपांडे यांच्या घरासाठी सुरक्षा व्यवस्था उपलब्ध करुन देण्यात यावी अशी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सर्वच ठिकाणी शासनाला सुरक्षा व्यवस्था तैनात करता येईल असे नाही. पण आवश्यक सुरक्षा मेजर्स म्हणून चांगले कम्पाऊंड उभे करणे, यादृष्टीने पु.ल.देशपांडे यांच्या घराच्या बाबतीत निश्चितपणे विचार करता येईल.

दिवेआगर येथील चोरी व इतर चोऱ्यांबाबत उल्लेख करण्यात आला आहे. एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, राज्यातील पोलीस बळ पूर्वी होते तेवढेच आहे. आजही मी पोलीस दलातील कर्मचाऱ्यांकडून 14 तास डयूटी करुन घेत आहे. त्यांच्याकडून ओव्हर ड्यूटी आजही केली जात आहे. पोलिसांचे संख्याबळ वाढविण्यासाठी प्रयत्न केलेले आहेत. मागील 5 वर्षात प्रत्येक वर्षी 11 हजार याप्रमाणे 55 हजार अतिरिक्त पोलिसांची पदे भरलेली आहेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री.शिगम....

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 13:40

श्री. आर.आर.पाटील...

अजूनही विभागाची मागणी आहे. पोलिसींग करण्यासाठी आणखी 66 हजार पोलिसांची आवश्यकता आहे. एका बाजूला पोलिसांची संख्या कमी आहे आणि दुस-या बाजूला कुठे काही घडले तर ताबडतोब पोलीस काय करतात अशी विचारणा होते. सर्वच ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवता येणार नाही. परंतु काही ठिकाणी गुन्हे घडू नयेत म्हणून पोलीस बंदोबस्त असणे आवश्यक आहे. गुन्हे घडू नयेत म्हणून ताबडतोबीने गुन्हेगरांचा शोध घेऊन त्याला शिक्षा करणे हा त्यावरचा उपाय आहे. ही गोष्ट खरी आहे की राज्यामध्ये न्यायालयांची आणि पोलिसांची संख्या कमी आहे. सर्व ठिकाणी पोलीस बंदोबस्त ठेवणे शक्य होत नाही. काही ठिकाणी आस्थापनांनी देखील त्यांच्या सुरक्षेची जबाबदारी घेतली पाहिजे.

सभापती महोदय, राज्यामध्ये विशेषत: शहरामध्ये पुतळयांची संख्या फार मोठ्या प्रमाणावर वाढत आहे. काही ठिकाणी समाजकंटक जाणीवपूर्वक पुतळयांची विटंबणा करतात आणि कायदा व सुव्यवस्थेचे प्रश्न निर्माण होतात. कोणत्याही पुतळयाच्या ठिकाणी 24 तास बंदोबस्त ठेवणे शक्य नाही. म्हणून पुतळा उभा करीत असताना, मंदिरे बांधत असताना 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून घेण्यात येते की, जो पुतळा उभा करण्यात येईल, जी मूर्ती बसविण्यात येईल त्याच्या सुरक्षेची जबाबदारी आमची राहील, काही कमी जास्त झाले तर त्याची जबाबदारी आमची राहील, असे लिहून घेण्याबाबत परिपत्रक काढलेले आहे.

सभापती महोदय, दिवेआगर येथील मूर्ती नारळीच्या शेतामध्ये सापडली. ती मूर्ती पुरातत्व विभागाने ताब्यात घेतली होती. राज्य सरकारने त्याबाबतीत मध्यस्थी केली. तसेच त्या गावातील मध्यस्थांनी पुरातत्व विभागाला 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून दिले होते की, मूर्तीच्या सुरक्षेची खबरदारी आम्ही घेऊ. पण त्या मूर्तीची चोरी झाली. त्यामुळे राज्यातील लोकांच्या भावना दुखावलेल्या आहेत. मूर्तीची केवळ सोन्याच्या स्वरुपात किंमत किती होती हे महत्वाचे नाही. लोकांच्या भावना किती महत्वाच्या आहेत या दृष्टीने त्याकडे पाहिले पाहिजे. रायगड जिल्ह्यातील एस.पी. आणि मध्यस्थांबरोबर तीन मिटींग घेतल्या. सुरक्षेच्या बाबातीत कोणकोणती काळजी घेतली पाहिजे, कोठे कोठे सीसीटीव्ही कॅमेरे बसविले पाहिजे. सिक्युरिटी गार्ड कसे ठेवले पाहिजेत, त्यांच्याकडे कशा प्रकारची हत्यारे असली पाहिजे यासंबंधी मिटींग झाल्या आणि त्याचे प्रोसिडिंग्ज

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील...

देखील आहे. मंदिराच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविलेले आहेत. पण नेमका त्याच दिवशी स्पॉटवरचा कॅमेरा बंद होता. जे वॉचमन नेमलेले होते त्यातील एकाचे वय 72 आणि दुस-याचे वर 69 आहे. म्हणजे घरात काही काम नाही म्हणून देवळात जाऊन झोपायचे अशा स्वरुपाचे वॉचमन नेमलेले होते. त्या वॉचमनकडे ना हत्यारे होती ना तेथे सीसीटीव्ही कॅमेरे सुरु होते. त्यांनी 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर मूर्तीच्या सुरक्षेची जबाबदारी आम्ही घेऊ असे पुरातत्व विभागाला लिहून दिले होते. या संदर्भात एस.पी. समवेत तीन मिटिंग झाल्या होत्या.

चोरी झाल्यानंतर आरोपींना पकडण्याची जबाबदारी पोलिसांची आहे आणि आम्ही ती कधीही टाळत नाही. मुंबई, पुण्यातील एक्स्पर्ट लोकांची टीम्स तयार केलेल्या आहेत. आमच्याकडे जे फुटेज प्राप्त झालेले आहे त्यावरुन राज्याबाहेर देखील कसून शोध घेण्यात येत आहे. हे चोर ज्या एका राज्यामध्ये असतील असा पोलिसांचा संशय आहे त्या राज्याच्या मुख्यमंत्र्यांना देखील आपल्या राज्याच्या पोलिसांना मदत करण्याची विनंती मी केलेली आहे. माझी माहिती अशी आहे की, त्या राज्याने देखील आपल्या राज्याच्या पोलिसांना मदत करण्यासाठी 4 टीम्स तयार केलेल्या आहेत. पोलीस देखील आरोपींचा शोध घेण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहेत. आरोपींचे स्पष्टपणे फोटो मिळालेले आहेत. आरोपी फार काळ पळू शकणार नाहीत. ते कोठेही गेले तरी आपले पोलीस त्यांना शंभर टक्के शोधून काढतील असा मला पोलिसांच्या आतापर्यन्तच्या कामगिरीवरुन विश्वास वाटत आहे. त्या ठिकाणी आंदोलन करण्याच्या धमक्या येत आहेत. आम्ही उपोषण करु, अमुक करु, तमुक करु असे सांगितले जात आहे. अशी जेव्हा चोरी होते त्यावेळी सर्वांनी संयम राखून पोलीस आपले काम नीटपणे करतील या दृष्टीने त्यांना मदत करण्याची आवश्यकता आहे. गावामध्ये जाऊन आंदोलन करण्याचे ठरले तर पोलिसांनी चोरीचा तपास करायचा की आंदोलनामुळे निर्माण होणारी कायदा व सुव्यवस्था ठेवायची हा प्रश्न असतो. पोलिसांच्या कामाध्ये अडथळे आणण्याची भूमिका कुणी घेता कामा नये असे माझे आवाहन आहे. लोकांनी दाखविलेली भावना, नाराज जनमत याची मला कल्पना आहे.

...नंतर श्री. भोगले...

अमुद्रित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ पूर्वी श्री.शिगम... 13:45

श्री.आर.आर.पाटील........

या कामामध्ये पुण्यामधील काही तज्ज्ञ लोक आम्ही कामाला लावले आहेत. मुंबईतील लोक काम करीत आहेत. चोरी शोधण्याच्या बाबतीत राज्यामध्ये जे जे तज्ज्ञ आहेत त्या सगळ्यांची मदत रायगड पोलिसांना करण्याच्या सूचना आम्ही दिलेल्या आहेत. ही एक वेगळी बाब आहे. म्हणून अतिशय गांभीर्याने ही गोष्ट सरकारने मनावर घेतली आहे.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय गृहमंत्री श्री.आर.आर.पाटील यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्या भावनांशी आम्ही सहमत असलो तरी कधी कधी मंत्री महोदय पोलिसांवर ताण आहे असे बोलतात त्यावेळी आमचे मन गलबलून येते. त्या ट्रस्टीने वयोवृध्द वॉचमन नेमले होते ते चोरीच्या आदल्या दिवशी नेमले नव्हते. मी स्वत: त्यांच्या घरी जाऊन चौकशी केली आहे. ते तीन वर्षे त्या मंदिरात काम करीत होते. ते वयोवृध्द आहेत हे तीन वर्षात पोलिसांना कळले नाही का? ट्रस्टीने सुरक्षेची जबाबदारी नक्की घेतली होती. परंतु वॉचमन वयोवृध्द आहेत, त्यांना बदलण्यात यावे हे पोलिसांनी का सांगितले नाही. बॉम्बस्फोट झाल्यानंतर व्ही.आय.पी.मंडळींची त्या भागात मूव्हमेंट होऊ नये अशा भावना व्यक्त केल्या जातात. चोरीच्या निषेधार्थ लोकांकडून निदर्शने आणि आंदोलने होत असतात, ते होऊ नये असे आम्हालाही वाटते. परंतु आदांलने होत असताना पोलीस बंदोबस्तासाठी अपुरे बळ असल्यामुळे दुसऱ्या राज्यातून पोलीस मागविले असल्यामुळे स्थानिक पोलिसांवर काही ताण पडत नाही. तेथे निदर्शने करणाऱ्या लोकांना असे वाटते की, दुसऱ्या राज्यात तपास सुरु आहे. त्यामुळे रायगड जिल्हयातील पोलिसांवर ताण आहे हे खरे नाही. माननीय गृहमंत्र्यांनी ज्या भावना व्यक्त केल्या त्याच्याशी मी सहमत आहे. ती सहमती असताना फूल कव्हरेज पोलीस डिपार्टमेंटला देत आहात असे होता कामा नये. आवश्यक ते नक्की दिले पाहिजे. कुचराई झाली असेल तर तपास पूर्ण झाल्यानंतर त्या विषयात कारवाई करावी लागेल.

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना सांगू इच्छितो की, पोलिसांनी याबाबत केलेल्या सर्व उपाययोजना, यापूर्वी घेतलेल्या बैठका, त्यांचे प्रोसिडिंग आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांची एक बैठक आपल्यासमवेत घेऊ. मी या घटनेची माहिती घेतली. रायगड जिल्हयातील मूर्तीच्या, मंदिरांच्या सुरक्षिततेसाठी शासनाने जे परिपत्रक काढले त्याप्रमाणे सगळ्यांनी कारवाई केली आहे.

..2..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील....

त्याचे प्रोसिडिंग आहे. उठसूठ पोलिसांना जबाबदार धरले जाते. चोरी झाल्यानंतर त्याचा तपास करण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. ज्या ट्रस्टीने 100 रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर लिहून देऊन मूर्ती ताब्यात घेतली त्यांची काही जबाबदारी नाही? अपुरे मनुष्यबळ असल्यामुळे पोलीस बंदोबस्त पुरेसा देऊ शकत नाही. पोलिसांना पूर्णपणे जबाबदार धरणे हे योग्य होणार नाही. एवढे लक्षात घेऊन रायगड जिल्हयाच्या पोलीस अधीक्षकांना घेऊन आम्ही केलेल्या सगळ्या उपाययोजना, जनमताचा कौल विरोधी पक्षनेत्यांकडून घेतला जातो असे गृहित धरुन आपल्याबरोबर मी एक बैठक आयोजित करतो. त्या नंतर आपले जे मत बनेल त्याची खाजगीत चर्चा करु. त्याची वाच्यता सभागृहात सुध्दा करायला नको.

---

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्राथमिक शाळेत असताना सातारा शहरात रहात असलेल्या घराला राष्ट्रीय स्मारक म्हणून शासनाने घोषित करणे, शासनाने त्या घराच्या संपादनाची कार्यवाही सुरु करणे, संपादनाच्या कामासाठी लागणारा निधी राज्य शासनाने जिल्हाधिकारी, सातारा यांना एक वर्षापूर्वी देणे, ही रक्कम जमा होऊनही विशेष भूसंपादन अधिकारी यांनी ॲवॉर्ड जाहीर न करणे, त्यामुळे संपादनाची कारवाई लॅप्स होण्याची निर्माण झालेली शक्यता याबाबत शासनाने करावयाची तातडीची उपाययोजना या संदर्भात मी औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाचे लक्ष वेधू इच्छिते.

**सभापती** : माननीय सामाजिक न्यायमंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांनी या मुद्याची नोंद घ्यावी.

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, निश्चित कार्यवाही करु.

---------

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: नियम 93 अन्वयेच्या सूचना

**सभापती** : आज प्रथम काल दि. 10 एप्रिल, 2012 रोजी आलेल्या नियम 93 अन्वयेच्या सूचना विचारात घेतल्या जातील. त्यानंतर आज दि. 11 एप्रिल, 2012 रोजीच्या सूचना विचारात घेतल्या जातील.

सन्माननीय सदस्य सर्वश्री जयंत प्र.पाटील, कपिल पाटील यांनी "खांब (ता. रोहा, जि. रायगड) येथे सुमारे 20 वर्षांपासून श्री. हिराचंद उमेदेमल जैन व श्री. भरत उमेदेमल जैन या दोन व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांकडून भात खरेदी करुन शेतकऱ्यांचे पैसे न देता फसवणूक करुन फरारी झ ााल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार यांनी "राज्यात गेल्या दोन वर्षांपासून बालकांना हक्काचे शिक्षण कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली आहे, खाजगी शाळांसाठी अद्यापही वाढीव पदांना मान्यता न दिल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून शिक्षण हक्क विधेयकाची अंमलबजावणी होत नसल्याबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री धनंजय मुंडे यांनी "विद्यार्थ्यांना डी.एड. नंतर सीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे बंधनकारक असून सन 2010 मध्ये दर दोन वर्षांनी सीईटी घेण्यात येईल असे घोषित केल्यानुसार आता मे 2012 मध्ये डी.एड. सीईटी घेणे अपेक्षित असताना अद्याप सीईटीबाबत कोणतीही सूचना आली नसल्याने डी.एड. धारक उमेदवारांमध्ये संभ्रमाची अवस्था " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी " मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र करण्यासाठी मोठी चळवळ उभारुन 106 हुतात्म्यांनी हौतात्म्य दिले हा इतिहास आजच्या पिढीतील मुलांना माहिती व्हावा याकरिता याचा समावेश इयत्ता 4 थी ते 10 वी च्या पाठ्य पुस्तकामध्ये करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

....2



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती** ......

सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी " गंगाखेड शहरामध्ये दोन गटात हाणामारी झाल्यावर या घटनेची माहिती संबंधित पोलीस अधीक्षक यांना दिल्यानंतर गंगाखेड पोलीस ठाण्याचे निरीक्षक श्री. राजकुमार डोंगरे व इतर 7-8 पोलीस कर्मचाऱ्यांनी गंगाखेड नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक श्री. रामप्रभू मुंडे यांना दिनांक 8.2.2012 रोजी केलेली मारहाण " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "जळगांव जिल्ह्यातील पाथरी येथील मनिषा युवराज धनगर हिचा प्रेम प्रकरणाच्या कारणावरुन तिच्या वडिलांनी गळा दाबून मृतदेह दहेगावजवळ रेल्वे रुळावर टाकणे, बेवारस अवस्थेत मृतदेह सापडल्यानंतर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करुन तिचा दफनविधीही करण्यात येणे, या आधी औंध (जि. सातारा, ता. खटाव) येथे आशा शिंदे या युवतीची तिच्या वडिलांनी केलेली हत्या, अशा घटनातील आरोपींना कठोर शिक्षा करण्याबरोबर समाजामध्ये आंतरजातीय विवाहासंदर्भात प्रबोधन करण्याचीही नितांत आवश्कता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री कपिल पाटील, यांनी " राज्यातील मुंबईसह अनेक विभागातील हजारो एमसीव्हीसी शिक्षक आणि कर्मचारी यांचे पगार नेहमीच अनियमित होत असल्यामुळे माध्यमिक शिक्षकांप्रमाणे एमसीव्हीसी चे पगार मुंबईप्रमाणे युनियन बँकेतून करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर, यांनी " मुंबई महानगर पालिकेच्या काही अधिकाऱ्यांनी 8 ठेकेदारांशी संगनमत करुन 50 कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा घोटाळा केल्याची एप्रिल, 2012 मध्ये उघडकीस आलेली घटना, गटाराचे पाणी वाहून नेणाऱ्या पाईपलाईनचे काम केल्याचे कागदोपत्री दाखवून सुमारे 50 कोटी रुपयांची बोगस देयके मुंबई महापालिकेकडे सादर करणे, याप्रकरणी लाचलुचपत विभागाकडून चौकशी करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम

....3





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**सभापती**........

93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री धनंजय मुंडे यांनी " बीड जिल्ह्यात वाहतूक भाडेवाढीसाठी ट्रक मालकाने केलेल्या संपानंतर निर्माण झालेल्या गॅस सिलेंडरच्या टंचाईमुळे वाढलेला रॉकेलचा काळा बाजार याबाबत चौकशी करुन काळा बाजार करणाऱ्यांवर करावयाची कारवाई " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री रामदास कदम यांनी " मुंबई उपनगरातील गोरेगांव येथील रॉयल पाम्स या संकुलात व्यावसायिक बांधकामास परवानगी नसलेल्या जागेत 14 बेकायदा आयटी संकुले आणि 50 अनधिकृत बंगले बांधून गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, याबाबत चौकशी करुन संबंधित विकासकांवर कारवाई करण्याची आवश्यकता " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री पांडुरंग फुंडकर यांनी " खामगांव नगरपरिषदेच्या हद्दीतील शहीद भगतसिंग चौकाच्या सौंदर्यीकरणाचे कोणतेही काम अद्यापपर्यंत झाले नसतांनाही या कामाचे पैसे ठेकेदारास अदा करण्याची एप्रिल, 2012 मध्ये उघडकीस आलेली घटना, प्रशासकीय मंजुरीनंतर काम पूर्ण देयकांचे पैसे अदा करण्याबाबतचे आदेश असताना काम पूर्ण झाले नसताना पैसे अदा केल्यामुळे ठेकेदार व अधिकारी यांनी केलेला अपहार " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री. जुन्नरे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सन्माननीय सदस्य डॉ. नीलम गोऱ्हे यांनी " महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व दिवंगत पु. ल. देशपांडे यांच्या पुण्यातील भांडारकर रस्त्यावरील "मालती माधव" इमारतीमधील सदनिकेमध्ये दि. 10.4.2012 च्या सुमारास चोरट्यांनी दरोडा टाकल्याची घडलेली घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकात पाटील, विनोद तावडे, भगवानराव साळुंखे यांनी " शिवाजी विद्यापीठाच्या शासन प्रतिनिधीशिवाय मुलाखत प्रक्रिया घेण्याचा आदेश महाराष्ट्र शासनाने बेकायदेशीर ठरवला असल्यामुळे या काळात ज्या प्राध्यापकांच्या निवडी झाल्या त्या रद्दबातल होण्याची निर्माण झालेली भीती " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

सन्माननीय सदस्य श्री परशुराम उपरकर यांनी " दि. 9.4.2012 रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मालवण तालुक्यातील एका शाळेत इयत्ता 9 वी चा पेपर फुटल्याची तक्रार शिक्षणाधिकारी यांच्याकडे करुनही याबाबतीत कोणतीच कारवाई न करणे, तसेच कणकवली येथील एका शाळेत शिक्षकाने विद्यार्थीनीचा विनयभंग केल्याची घटना " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

-------

......2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## नियम 93 च्या सूचनेस अनुलक्षून निवेदन

**पृ. शी./मु.शी** : शेगांव येथे विकास आराखड्यानुसार काम न होणे याबाबत श्री पांडुरंग फुंडकर, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. राजेंद्र मुळक ( वित्त व नियोजन राज्य मंत्री ) : सभापती महोदय, श्री. पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांनी "शेगांव येथे विकास आराखड्यानुसार काम न होणे." या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

---------

....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, सदरहू नियम 93 ची सूचना बुलढाणा जिल्हयातील संत गजानन महाराजांच्या संजीवन समाधी सोहळयाच्या संदर्भातील आहे. या संजीवनी समाधीच्या सोहळयाला 100 वर्ष पूर्ण झाली त्यावेळेस महाराष्ट्र शासनाने जवळपास 360 कोटी रुपयांचा आराखडा मंजूर केला होता व त्यापैकी 250 कोटी रुपयांमध्ये महाराष्ट्र शासनाचा सहभाग होता. मी ज्यावेळेस यासंदर्भात विशेष उल्लेख उपस्थित केला होता त्यावेळी माननीय मंत्रीमहोदयांनी सन 2009-2010, 2010-2011, 2011-2012 पर्यंत 210 कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे असे उत्तर दिले होते. सभापती महोदय, 210 कोटी रुपयांपैकी केवळ 41 कोटी रुपये खर्च झालेला आहे म्हणजे जवळपास 30 टक्के खर्चच दोन वर्षात झालेला आहे. गावातील रस्ते, रेल्वे उड्डाणपूल, नाला बळकटीकरण अशा कामांना गेल्या दोन वर्षापासून प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही. आराखडे मंजूर आहे, पैसे उपलब्ध करुन दिले गेले परंतु केवळ 30 टक्केच निधी खर्च झालेला आहे. प्रशासकीय मान्यता देऊन कामे त्वरीत मार्गी लावण्याच्या दृष्टीने शासन काही पाऊल उचलणार आहे काय ?

मंदिराच्या बाजूला मातंग पुरा व त्याच्या बाजूच्या जागेवर लोकांनी अतिक्रमण केले आहे. या ठिकाणी भक्तांची प्रचंड वर्दळ वाढली असून या मंदिराच्या बाजूस बरीच शासकीय जमिनी असून या शासकीय जमिनीवर अतिक्रमण झालेले आहे. काही खाजगी प्लॉट सुध्दा तेथे आहेत. ही जागा मोकळी करुन त्या लोकांना पर्यायी जागा देण्याचे ठरवले आहे. पुनर्वसनाच्या कामाला सुरुवात झ ालेली नाही. केवळ कमिशनरांच्या लेव्हलवर दर महिन्याला बैठका होत आहेत. 360 कोटी रुपयांच्या कामाला सभागृहाने मान्यता दिल्यामुळे 360 कोटी रुपये मंजूर झाले होते. परंतु गेल्या दोन वर्षापासून सर्व कामे ठप्प असून या कामांना प्रशासकीय मान्यता मिळत नाही व त्या ठिकाणी कोणतेच काम मार्गी लागलेले नाही. खामगाव-नांदूरा रोडचे काम झाले असून या कामाची गुणनियंत्रण मंडळाने चौकशी केली आहे. परंतु ही चौकशी केवळ एका स्पेसिफिक भागाची झालेली आहे. शेगाव शहरात रेल्वेस्टेशन-शिवाजी चौकापासून मंदिरापर्यंतचा जो रस्ता आहे त्यावरील घरे पाडून त्या ठिकाणचे काम सुरु आहे. या कामामध्ये प्रचंड भ्रष्टाचार झाला असून हे काम अत्यंत निकृष्ट होत आहे. हे सर्व काम कमिशनरांच्या अधिपत्याखाली चालले आहे. शासनाच्या पैशाचा या

...4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर....

ठिकाणी अपव्यय होतो आहे. कामाला गती मिळत नाही. pसंजीवन शताब्दी सोहळा होऊन 2 वर्षे उलटून गेलेली आहेत त्यामुळे या ठिकाणच्या कामांना प्रशासकीय मान्यता किती दिवसात दिली जाणार आहे ? विशिष्ट कालावधीत हे काम पूर्ण होण्यासाठी शासन कोणती भूमिका घेणार आहे ? छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयापासून ते मंदिरापर्यंत गटार व सिमेंट रस्त्याचे जे काम सुरु आहे त्यामध्ये सिमेंट व लोखंड अत्यंत निकृष्ट दर्जाचे वापरले जात आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

यानंतर श्री. भारवि ......

अप्रकाशित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर..

या सर्व कामांची उच्चस्तरिय चौकशी करून ज्या अधिकाऱ्यांनी अनियमितता केली असेल त्या अधिकाऱ्यांवर ताबडतोब कारवाई करण्यात येणार आहे काय ? हे काम गतीने होण्यासाठी शासन टाईम बाऊंड प्रोग्रॅम आखणार आहे काय ?

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, श्री गजानन महाराज समाधी शताब्दी महोत्सावा निमित्त 360 कोटी रूपयांच्या किंमतीचा विकास आराखडा तयार करण्यात आला आहे. राज्य शासनाकडून 250 कोटी, केंद्र शासनाकडून 31 कोटी, शेगाव नगर परिषदेकडून 13.90 कोटी आणि शेगाव देवस्थान संस्थानातर्फे 65.50 कोटी रूपये असा मिळून 360 कोटी रूपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. आता पर्यंत रूपये 49.24 कोटींचा प्रत्यक्ष खर्च झालेला आहे. सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी ज्या बाबींचा उल्लेख केला त्या संबंधी मी सांगू इच्छितो की, ज्या कामांना प्रशासकीय मान्यता द्यायची आहे ती अंतिम टप्प्यामध्ये आहेत. तातडीने प्रशासकीय मान्यता देण्यासंबंधी कार्यवाही केली जाईल. मागे झालेल्या बैठकी नुसार ही सर्व कामे पूर्ण करण्यासाठी टाईम बाऊंड प्रोग्रॅम तयार केला आहे. त्यानुसार विश्रामगृहाचे काम एप्रिल 2012 मध्ये पूर्ण करण्याचे नियोजित केले आहे. पाणी पुरवठ्याची योजना मे 2012 मध्ये पूर्ण करावयाची आहे. बसस्थानक जून 2012 पर्यंत, आरोग्य विभागातील प्रलंबित कामे जून 2012 पर्यंत पूर्ण करण्यात येतील. एप्रिल 2012 पर्यंत उरलेली रस्त्यांची कामे पूर्ण करावयाची आहेत. मंदिराच्या जवळ परिक्रमा मार्ग करीत आहोत. तो एप्रिल 2013 पर्यंत करावयाचा आहे. रस्त्यांची कामे सन 2013 पर्यंत पूर्ण करणार आहोत. उनाड नाल्याची कामे होती ती आपण जून 2013 पर्यंत पूर्ण करणार आहोत. मल निस्सारण आणि भूमिगत गटारांची काही कामे अजूनही प्रलंबित आहेत. ती आपण नोव्हेंबर 2013 पर्यंत पूर्ण करणार आहोत. पोहोच रस्त्यांची कामे फेब्रुवारी 2014 पर्यंत पूर्ण करावयाची आहेत. पुनर्वसनाचे काम फेब्रुवारी 2014 पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे आपण टाईम बाऊंड कार्यक्रम केला आहे. एका रस्त्याचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले आहे, असा उल्लेख सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी केला आहे. त्यासंबंधी गुण नियंत्रण विभागाच्या माध्यमातून चौकशी केली होती.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, खामगाव शेगाव रस्त्याची चौकशी केली. पण शिवाजी चौक ते मंदिर असे गावातील आतल्या रस्त्याचे काम सुरू आहे. त्या कामाचा मी उल्लेख केला आहे.

..2

11-04-2012 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) SS 2
BGO/ जुन्नरे.. 14:00

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजेंद्र मुळक : सभापती महोदय, या संबंधी मी माहिती घेतली. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेली वस्तुस्थिती दिसून येत आहे म्हणून मी विभागाला अशा प्रकारच्या सूचना देतो की, केंद्रीय सार्वजनिक विभाग,नागपूर यांच्याकडून झालेल्या बांधकामाचा दर्जा तपासून निश्चित स्वरूपात चौकशी केली जाईल.

......

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास रखडणे या बाबत
सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील,संजय केळकर
रामनाथ मोते, वि.प.स.यांनी दिलेली नियम 93 अन्वये
सूचना.

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासाचा हा विषय आहे. मला आपल्या मार्फत माननीय मंत्री महोदयांना सांगावयाचे आहे की, आपण काही नियम करतात. आपण 2c1, 2c2 नियम केला व पुनर्विकासाचा अधिकार दिला. नंतर मग कोण तरी अधिकारी शक्कल काढतो की, सरकारने पुनर्विकास केला तर त्यात शासनाचा फायदा आहे. म्हाडामुळे शासनाचा किती फायदा झाला हे अनेक वेळा सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम सांगतात. तो आता विषय नाही. आता आपण नवीन परिपत्रक काढून निर्बंध घातले आहेत. त्यामुळे गेले वर्षभर एकही पुनर्विकासाचा नवीन प्रकल्प कोणी दाखल करू शकले नाही. कारण ते त्या परिपत्रकामुळे फिजिबल नाही, शक्य नाही.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

जर हे प्रकल्प वर्षभर बांधण्यात आले नाहीत तर त्यामधून म्हाडाला फायदा होईल अशाप्रकारची शक्कल आपल्या अधिकाऱ्यांच्या लक्षात कशी आलेली नाही. याचा अर्थ यामध्ये काही तरी गडबड आहे, तरीसुध्दा लोकांकडून मागणी होत आहे. वर्षभर म्हाडाच्या घरामध्ये राहिल्यानंतर तो माणूस स्वत:च्या घरामध्ये रहावयास जाण्याच्या दृष्टीने शासनाने काढलेले परिपत्रक मागे घेऊन टू सी टू प्रमाणे आपण विकासकांना संधी देणार आहात काय? उदा. आपण एस.आर.ए. योजनेच्या माध्यमातून लोकांना घरे बांधून दिली आहेत. तशाप्रकारे लोकांना घरे देण्याची आपली इच्छा असेल तर या टू सी टू मध्ये आणखी तरतूद केली तरी काही बिघडणार नाही. त्यामुळे या ठिकाणी टू सी टू प्रमाणे काढलेले परिपत्रक आपण मागे घेणार काय?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, हे शासन टू सी वन आणि टू सी टू प्रमाणे कां कारवाई करीत आहे हे आपण समजून घेतले पाहिजे. आपणा सर्वांना माहीत आहे की, या पुढील काळात मुंबई शहरामध्ये जागा उपलब्ध होणार नसल्यामुळे सर्वसामान्य लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देण्यासाठी आपल्याकडे असलेल्या एकूण मालमत्तेमधून आपण ही घरे निर्माण करु शकतो काय, या बाबत दूरदृष्टीने विचार करुन टू सी टू कायद्याप्रमाणे मिळणाऱ्या दोन तृतीयांश एफ.एस.आय. मधून त्यांनी घरे बांधून ती म्हाडाकडे सुपूर्द करण्यात यावीत आणि बाकीचा एफ.एस.आय. त्यांनी वापरावा. अशाप्रकारे बाजारातील सद्याच्या किंमतीच्या मानाने परवडणाऱ्या किंमतीमध्ये लोकांना घरे उपलब्ध करुन देता येतील. या कल्पनेला एक वर्ष होऊन सुध्दा विकासकांकडून फार मोठा प्रतिसाद मिळालेला नाही ही गोष्ट आपल्याला नाकारता येणार नाही. विकासकांकडून शासनाकडे या संदर्भातील आलेल्या प्रस्तावांची आकडेवारी माझ्याकडे उपलब्ध आहे. त्यानुसार विकासकांकडून शासनाकडे 801 प्रस्ताव सादर झाले असून अपूर्ण असलेले 262 प्रस्ताव परत पाठविण्याची भूमिका शासनाने स्वीकारली आहे. त्याचप्रमाणे 2452 प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे व 84 प्रस्ताव प्रगतिपथावर आहेत. यामध्ये टू सी टू च्या प्रक्रियेप्रमाणे केवळ 7 लोकांनी सहभागी होण्याचे मान्य केले तरी देखील प्रॅक्टिकली ते लोक पुढे येत नाहीत. याचा अर्थ असा की, शासनाने दूरदृष्टी ठेवून हे धोरण स्वीकारले असले तरी त्याला प्रतिसाद देण्यासाठी सोसायटी किंवा विकासक यापैकी कुणीही पुढे येत नाही. यामध्ये काळाची गरज ओळखून 15 दिवसापूर्वी माझ्या विभागाच्या सचिवांबरोबर एक बैठक घेऊन त्यामध्ये आम्ही विचार केला आहे. माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे या प्रक्रियेमध्ये पारदर्शकरित्या समंजसपणे काहीतरी मार्ग

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. सचिन अहिर...

निघेल आणि त्यामधून विकासकाचे आणि सोसायटीचे देखील नुकसान होणार नाही. त्यामधून या प्रक्रियेला चालना या दृष्टीने एक महिन्याच्या आत राज्य शासनाच्या वतीने म्हाडाला सूचना देण्यात येतील. त्या संदर्भात त्यांनी काही तरी मार्ग काढून शासनला पुन्हा प्रस्ताव सादर करावा जेणेकरुन या पुढील काळात पुनर्विकासाचे प्रस्ताव रखडणार नाहीत.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, मी मंत्री महोदयांचे निवेदन ऐकल्यानंतर मला बरे वाटले. माझ्याकडे शासनाच्या अधिकाऱ्यांनी पाठविलेले पत्र मी आपणास वाचून दाखविते.

**सभापती** : माननीय सदस्यांनी ते पत्र वाचून न दाखविता सभागृहाच्या पटलावर ठेवावे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, त्या अधिकाऱ्यांचे असे म्हणणे आहे की, सन 2010 पूर्वीचे प्रस्ताव उशिरा आल्यामुळे आम्ही आपला प्रस्ताव मान्य करु शकत नाही. याबाबतीत शासनाने जो काही निर्णय घेतला असेल तो सभागृहाला अवगत करणार काय ?

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, माननीय सदस्यांना देण्यात आलेले पत्र कशासंदर्भात आहे हे पाहिल्याशिवाय मला सांगता येणार नाही.

**सभापती** : माननीय सदस्यांनी ते पत्र माझ्यामार्फत मंत्री महोदयांना सादर करावे.

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, ते पत्र आपणामार्फत माझ्याकडे आल्यास त्याबाबत निश्चितपणे त्याची दखल घेतली जाईल.

श्री. विनोद तावडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी नवीन पर्याय सुचविला आहे त्या बाबत आपण विचार करु. आपण टू सी टू चा पर्याय पूर्णपणे विचार करुन दिला होता . टू सी वन किंवा टू सी टू या पैकी एक ऑप्शन स्वीकारावे असे आपण सांगितले. ते ऑप्शन स्वीकारल्यानंतर त्यामधून म्हाडाला काहीही तोटा होणार नाही या बाबत आपण विचार केला आहे. ते ऑप्शन दिल्यानंतर आपण हे परिपत्रक काढल्यामुळे प्रॉब्लेम निर्माण झाला आहे. त्याचप्रमाणे हे प्रपोजल वर्कआऊट करुन द्यावयाचे म्हटल्यास त्यामध्ये सहा महिने ते एक वर्षाचा कालावधी जाईल. त्याऐवजी आपण टू सी टू चा सुचविलेला प्रस्ताव मान्य करावा. त्यामुळे आपल्याला लांबलचक कार्यपध्दती करावी लागणार नाही. त्यामुळे आपण ही गोष्ट मान्य केली तर हा विषय या ठिकाणीच संपुष्टात येईल, तसे आपण करणार काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

DGS/

श्री. सचिन अहिर : सभापती महोदय, मुळात टू सी वन आणि टू सी टू म्हणजे काय हे समजावून सांगणे गरजेचे आहे. यापूर्वी म्हाडाला जमिनीची आवश्यकता नव्हती म्हणून प्रिमियमच्या माध्यमातून आपण एफ.एस.आय. देत होतो. आपल्याला कल्पना आहे की, दहा-वीस वर्षापूर्वी मुंबई शहरामध्ये जमिनीचा विषय फार महत्वाचा नव्हता.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर . . . .

परंतु आता असे लक्षात आले आहे की, केवळ प्रिमिअम घेऊन म्हाडाकडे पैसे जमा झाले आहेत. पण जमीन नसल्यामुळे म्हाडाला नवीन घर बांधणी करण्याचा कार्यक्रम हातात घेता येत नाही. आजही अशी परिस्थिती आहे की, मुंबई शहरामध्ये कदाचित एक-दोन वर्षामध्ये म्हाडाची शेवटची लॉटरी होईल की काय अशी भीती निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. म्हणूनच राज्य शासनाने अशी भूमिका घेतली की, आपल्यामुळे काही सोसायटींना फायदा होत असेल आणि प्रिमिअम म्हणून पैसे घेण्याऐवजी जर त्यांच्याकडून आपल्याला सदनिका घेता आल्या आणि सर्वसामान्य लोकांना परवडणारी घरे उपलब्ध करुन देता आली तर इतरांनाही याचा मदत होईल आणि त्यातून केवळ नफा कमविणे हा म्हाडाचा उद्देश असणार नाही. परंतु सन्माननीय सदस्यांनी व्यक्त केलेली भावना देखील नाकारता येणार नाही. म्हणून मी अशी भूमिका घेतलेली आहे की, समंजसपणे दोन्ही बाजू समजून घेऊन त्याप्रमाणे करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, काही लोकांनी या विषयाच्या बाबतीत कोर्टामध्ये याचिका दाखल केल्या आहेत. पण कोर्टाने ती याचिका फेटाळली आणि म्हाडाची जी भूमिका आहे किंवा शासनाची जी भूमिका आहे ती योग्य आहे अशी बाजू घेतली. म्हणून अशा प्रकारच्या गोष्टी मध्ये येता कामा नयेत. या दृष्टीकोनातूनच मधला मार्ग काढण्याची भूमिका घेऊ. तसेच आपण सुचविल्याप्रमाणे यामध्ये अडथळा येणार नाही. पुढच्या काळामध्ये याला चालना मिळेल या दृष्टीकोनातून देखील प्रस्ताव सादर करण्याची भूमिका घेण्याविषयी राज्य शासनाच्या माध्यमातून म्हाडाला सांगण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एक महिन्याचा कालावधी जास्त होत आहे.

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत . . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत सगळी प्रोसेस म्हणजे अगदी सचिव पातळीपर्यंत . . ..

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, एक महिन्याच्या आत शासनाच्यावतीने म्हाडाला आदेश देऊ की, त्यांनी प्रस्ताव तयार करुन सरकारकडे सादर करावा आणि सरकारकडून एक महिन्याच्या आत होय किंवा नाही याबाबत भूमिका घेऊ.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, मंदाकिरण सोसायटीच्या लोकांना त्यादिवशी काही सुचवावयाचे असेल तर त्यासंबंधात आपण एक संयुक्त बैठक घेणार आहात काय ?



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आपण एक महिन्याच्या आत जी सूचना देऊ त्यावेळी म्हाडाला असे सांगण्यात येईल की, ज्या संबंधित सोसायटी किंवा फेडरेशन असतील त्यांना जर चर्चा करावयाची असेल, . . . .

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, त्यांनी ऐकले नाहीतर . . ..

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, आम्ही त्यांना आदेश देऊ की त्यांनी त्यांचेही म्हणणे ऐकून घ्यावे आणि त्यांनी संबंधितांचे म्हणणे ऐकले नाही तर राज्य शासन निश्चितपणे चर्चा करण्यास तयार आहे.

----

**(सभापतीस्थानी - माननीय उप सभापती)**

2 यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : गृहनिर्माण विभागाच्या वास्तुरचनाकार विभागाने गोराई, जुहू, विलेपार्ले परिसरातील उच्च उत्पन्न गटातील इमारतींना दिलेला 2.5 एफ.एस.आय.याबाबत श्री.रामदास कदम,वि.प.स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सचिन अहिर (गृहनिर्माण राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

. . . .2 यु-4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिनभाऊ अहिर उत्तर देणार आहेत. या संबंधात दिनांक 27 मार्च 2010 रोजी प्रश्न क्र.20791 उपस्थित करण्यात आला होता. त्यावेळी तत्कालीन मुख्यमंत्री माननीय श्री.अशोकजी चव्हाण यांनी जे उत्तर दिलेले आहे, ते मी याठिकाणी मुद्दाम वाचून दाखवितो. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, "दिनांक 26 ऑगस्ट 2009 रोजीच्या शासन निर्णयानुसार ज्या उच्च उत्पन्न गटाच्या इमारतीच्या सदनिकांचे चटई क्षेत्र 80 चौ.मी.पर्यंत आहे अशा सदनिका मध्यम उत्पन्न गटापर्यंत येत असल्याने अशा इमारतींच्या पुनर्विकासाकरिता सुधारित विकास नियंत्रण नियमावली 33(5) अंतर्गत 2.5 चटई क्षेत्र निर्देशकांचा लाभ होईल" एवढे स्पष्ट उत्तर त्यांनी दिले होते. मग या शासन निर्णयानुसार त्याची अंमलबजावणी झाली. पण नंतर त्यांनी असे म्हटलेले आहे की,"मात्र 33 (5) अन्वये कारवाई करणे योग्य होणार नाही असे मत झाल्याने," आता एकदा शासनाचा निर्णय झाल्यानंतर असे मध्येच कोणाचे मत होऊ शकते काय? म्हणजे शासनापेक्षा, माननीय मुख्यमंत्र्यांपेक्षा हा इतका कोण मोठा महाभयानक माणूस आहे ते कळले पाहिजे. माननीय श्री.सचिनभाऊ अहिर, मला मोठे आश्चर्य वाटते आणि पुन्हा उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की,"नुकताच शासन स्तरावर स्पष्टीकरण होण्याबाबत प्रस्ताव दिनांक 07-04-2012 अन्वये सादर केला आहे."म्हणजे काय? एकदा शासनाने निर्णय घेतल्यानंतर त्यावर पुन्हा आमचे असे मत होते आणि त्यानंतर पुन्हा दि.7 एप्रिल 2012 रोजी पुन्हा प्रस्ताव सादर केला आहे. माननीय मंत्री श्री.सचिनभाऊ अहिर, हे सगळे भयानक आहे म्हणजे कायद्याने बोला असे काही यामध्ये आहे काय ? नेमके काय आहे?

डॉ.नीलम गोऱ्हे (खाली बसून) : कायद्याने बोला ?

श्री.रामदास कदम : होय, कायद्याने बोला असे . . . .

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांचे म्हणणे आहे की, याबाबतीत चांगली फोड करुन सांगा म्हणजे काय द्या आणि बोला.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, होय, कायद्याने बोला. या राज्याचे तत्कालीन माननीय मुख्यमंत्री जेव्हा सदनामध्ये घोषणा केली, शासन निर्णय झाला. मी माननीय गृहनिर्माण राज्यमंत्री श्री.सचिनभाऊ अहिर यांना काही सोसायटींची नावे देईन. त्यांच्याकडून दहा कोटी, चार कोटी असे 20 महिन्याचे पैसे अगोदर घेतलेले आहेत. मग असे असताना ज्या छोट्या सदनिका आहेत, ज्या गरीब माणसांसाठी आहेत त्यांच्या बाबतीत अशा पध्दतीने अडथळा निर्माण न करता माननीय राज्यमंत्री श्री.सचिनभाऊ अहिर आपण सहानुभूतीपूर्वक शासनाने जो निर्णय घेतला आहे



श्री.रामदास कदम . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

त्याची अंमलबजावणी तातडीने करणार आहात काय ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, एका महिन्याच्या आत ही कारवाई पूर्ण केली जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांचा आभारी आहे.

-----

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अस्सुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मृ.शी** : बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील 21 गावांसाठी असलेली प्रादेशिक पाणी पुरवठा योजना बंद असणे या बाबत श्री.पांडुरंग फुंडकर वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.रणजित कांबळे ( पाणी पुरवठा राज्यमंत्री ) : सभापती महोदय, श्री पांडुरंग फुंडकर यांनी "बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील 21 गावांसाठी असलेली प्रादेशिक पाणी पुरवठा योजना बंद असणे या विषयावर नियम 93 अन्वये जी सूचना दिली होती, तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...2 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील 21गावांसाठी ही प्रादेशिक पाणी पुरवठा योजना आहे. ही योजना पूर्ण झाल्यानंतरही काही दिवस ती योजना सुरु राहिली. निवेदनात म्हटले आहे की, जुलै 2000 पासून ही योजना सुरु करण्यात आली. जुलै 2010 ते जुलै 2011 या कालावधीत ही योजना 15 गावांपुरती सुरु करण्यात आल्याचे नमूद केलेले आहे. माझ्या माहितीनुसार ही योजना सन 2011 पासून पूर्णत: बंद आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही योजना घेण्यास तयार नाही. त्यांच्या जवळ विजेचे बिल भरण्यासाठी पैसे नाहीत त्यामुळे ही योजना बंद आहे. डीपीडीसीच्या बैठकीत हा विषय घेण्यात आला त्यावेळी सांगण्यात आले की, आमच्याजवळ पैसे नाहीत. जिल्हापरिषद ही योजना घेण्यास तयार नाही. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ही योजना चालविण्यास तयार नाही. कोणीही ही योजना चालविण्यास तयार नसल्यामुळे 22 गावांची नळ पाणी पुरवठा योजना बंद आहे. या संदर्भात बैठक घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते. परंतु बैठक घेण्यात आलेली नाही. आता एप्रिल महिना सुरु झालेला आहे. तेव्हा ही बैठक केव्हा घेण्यात येईल ? जिल्हापरिषद ही योजना ताब्यात घेण्यास तयार नसेल तर मग ही योजना कोण चालविणार ? ही योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण चालविणार, जिल्हापरिषद चालविणार की ही योजना बंद करुन 21 गावांना पाण्यापासून वंचित ठेवणार आहात ? तेव्हा ही योजना सुरु करण्यासाठी शासन तातडीने कोणती उपाय योजना करणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, 22 गावांसाठी ही पाणी पुरवठा योजना होती,परंतु यातील पिंप्री धनगर गाव वगळून ती 21 गावांची करण्यात आली. कोणतीही योजना जिल्हापरिषदकडे हस्तांतरित होणार की नाही ही बाब ध्यानात घेऊन योजनेचा आराखडा तयार केला जातो. कारण पाणी पुरवठा योजना चालविण्याची जबाबदारी जिल्हापरिषदेची असते. जिल्हापरिषदेच्या जी.बी.चा ठराव असल्या शिवाय योजना घेण्यात येत नाही. ही योजना करावी असा जिल्हापरिषदेच्या जी.बी.मध्ये ठराव झाला होता आणि तसा प्रस्ताव शासनाकडे आला होता. मार्च 2009 मध्ये या योजनेचे कमिशन केले. जून 2010 पर्यंत ही योजना चालविण्यात आली होती. 13 महिने ही योजना चालविल्यानंतर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने ही योजना बंद केली. जिल्हापरिषदेने सांगितले की, आम्ही ही योजना हस्तांतरित करुन घेणार नाही. त्या भागातील

..3..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे.....

टंचाईची परिस्थिती आणि स्थानिक लोकप्रतिनिधींनी  केलेल्या विनंतीनुसार जुलै 2010 ला ही योजना पुन्हा सुरु करुन ती जुलै 2011 पर्यंत चालू ठेवण्यात आली. या योजनेची जवळपास 15लाख 49 हजार रुपयांची थकबाकी आहे. कोणत्याही ग्रामपंचायतीने एकही पैसा दिलेला नाही. फक्त एका ग्रामपंचायतीने 1 लाख रुपयांपैकी 20 हजार रुपये दिले. मजीप्राने सांगितले की, त्यांचे विजेचे बिल आहे, दैनंदिन खर्चाची बिले आहेत, ही बिले भरता येत नसल्यामुळे त्यांनी ही योजना बंद केली. त्यानंतर दिनांक 13 सप्टेंबर रोजी जिल्हापरिषदेने ही योजना हस्तांतरित करुन घेण्याबाबत जी.बी.मध्ये ठराव केला.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारले की, शासन कोणत्या प्रकारची उपाय योजना करणार आहे. त्याबाबत सांगू इच्छितो की,  आता मजीप्रा ही योजना पुन्हा सुरु करणार आहे. यातील दोन-तीन गावांमध्ये दोन-तीन स्वतंत्र पाण्याच्या योजना आलेल्या आहेत. ती गावे वगळून ज्या गावांतून मागणी येईल त्यांच्यासाठी ही योजना सुरु करण्यात येईल. सुरुवातीला तीन महिने कमिशन करुन ठेवणार. तीन महिन्यामध्ये ग्रामसेवक, सरपंच आणि उप अभियंता यांचे संयुक्त इन्स्पेक्शन होईल. त्यानंतर कार्यकारी अभियंत्यांचे इन्स्पेक्शन होईल. अशाप्रकारे दोन्ही इन्स्पेक्शन झाल्यानंतर ज्या काही त्रुटी असतील त्या दूर केल्यानंतर ती योजना जिल्हापरिषदेकडे हस्तांतरित करण्यात येईल.

श्री.पांडुरंग फुंडकर : सभापती महोदय, हा प्रश्न उपस्थित करण्या मागचा उद्देश म्हणजे आज ही सर्व गावे 50 पैशापेक्षा कमी आणेवारीमध्ये आहेत.

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. पांडुरंग फुंडकर ....
ही तीन गावे जर सोडली तर उर्वरित गावांमध्ये सध्या पाणी टंचाई आहे. योजना तयार आहे, पाणी तयार आहे. योजना पूर्ण झालेली असताना आणि पाणी उपलब्ध असताना योजना सुरु नाही. लोक नळयोजनेकडे पाहतात अशी स्थिती आहे. म्हणून ही योजना जिल्हा परिषदेने ताबडतोब ताब्यात घ्यावी. आपल्याला माहीत आहे की, आता उन्हाळा सुरु झालेला आहे आणि विदर्भात 42 डिग्रीच्या वर तपमान गेलेले आहे. अशा अवस्थेमध्ये गावाला पिण्याचे पाणी नाही. ते लोक दोन-तीन किलोमीटरवरुन शेतातून पाणी आणत आहेत. 22 गावांची ही योजना आहे. त्यातील तीन गावे वगळून उर्वरित गावांमध्ये ताबडतोबीने पाणी जाईल यासाठी शासन काय व्यवस्था करणार ? शासन कोणता आदेश देणार आणि त्या गावांपर्यंत किती दिवसात पाणी पोहोचणार ?

श्री. रणजित कांबळे : सभापती महोदय, समजा ही गावे 50 टक्के आणेवारीच्या आत असतील आणि त्या ठिकाणी टंचाई असेल तर जिल्हाधिकारी ताबडतोब टंचाईमध्ये आदेश देऊ शकतील यासाठी तसे आदेश दिलेले आहेत. जी प्रादेशिक पाणीपुरवठा योजना बंद असेल ती टंचाईमध्ये आपण ताबडतोब चालू करु शकतो. टंचाईमध्ये ती योजना घ्यावी असे आदेश देण्यात येतील. तीन महिन्याच्या कालावधीमध्ये जेव्हा ती योजना चालू ठेवतील त्यामध्ये त्यांचे संयुक्त इस्पेक्शन झाल्यानंतर योजना जिल्हा परिषदेला हस्तांतरित करण्यात येईल.

---

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**मु. शी./ मु. शी.** : वेगवेगळ्या मार्गांनी समुद्रावर आणि खाडी किनाऱ्यावर होत असलेल्या अतिक्रमणामुळे मच्छीमारांची उपजीविका धोक्यात येणे याबाबत सर्वश्री संजय केळकर, विनोद तावडे, रामनाथ मोते वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना

**उप सभापती** : या विषयाच्या संदर्भात नियम 93 अन्वये सूचना देणारे सदस्य तसेच संबंधित माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाहीत. त्यामुळे मी निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

**उप सभापती** : आता सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी स्थगित होईल आणि दुपारी 3.00 वाजता पुन: भरेल.

( दुपारी 2.21 ते 3.00 वाजेपर्यंत मध्यंतर )

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**( स्थगितीनंतर )**

**( सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**पृ. शी.** : नागपूर शहरातील शासकीय मुद्रणालयाची इमारत जीर्ण होणे

**मु. शी.** : नागपूर शहरातील शासकीय मुद्रणालयाची इमारत जीर्ण होणे यासंबंधी सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, भगवान साळुंखे, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.नागो पुंडलिक गाणार ( नागपूर विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"नागपूर शहरातील १५० वर्षांपूर्वी बांधण्यात आलेल्या शासकीय मुद्रणालयाची इमारत जीर्ण झाल्यामुळे केव्हाही कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता, जुनाट झालेली यंत्रे, मागील अनेक वर्षांपासून रिक्त असलेली पदे, यासंबंधी कामगार संघटनेतर्फे शासनास वारंवार पत्रव्यवहार करुन दिलेल्या सूचना, शासनाने एक आराखडा तयार करुन आधुनिकीकरण करण्याच्या प्रस्तावास दिनांक २८ जानेवारी, २००२ रोजी मंजुरी देऊनही लागणाऱ्या निधीची तरतूद न करणे, परिणामी कामगार वर्गात निर्माण झालेले भीतीचे वातावरण यावर शासनाने तातडीने लक्ष घालून करावयाची उपाययोजना व यावर शासनाची प्रतिक्रिया."

श्री.सचिन अहिर ( उद्योग राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

2...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.नागो पुंडलिक गाणार : सभापती महोदय, महाराष्ट्राची उपराजधानी असलेल्या नागपूर शहरात 150 वर्षापूर्वी बांधण्यात आलेल्या शासकीय मुद्रणालयाची इमारत जीर्ण झाली असल्यामुळे ती कोसळून दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. ही इमारत पाडून त्या जागी नवीन इमारत बांधण्याचा निर्णय दिनांक 28.1.2012 रोजी शासनाने घेतला आणि 14 कोटी रुपयांचा प्रस्ताव मान्य केला होता. परंतु त्यासाठी शासनाने आर्थिक तरतूद उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर नवीन 25 कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला, परंतु त्यासाठीही निधी उपलब्ध करुन दिला नाही. बी.ओ.टी.तत्वावर या इमारतीचे बांधकाम करता येईल किंवा नाही याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अभिप्राय मागविण्यात आला होता. सार्वजनिक बांधकाम विभागाने तसे करता येणार नाही असे शासनाला कळविले आहे. या निवेदनामध्ये असे नमूद केले आहे की, प्रस्तावित इमारत बी.ओ.टी.तत्वावर बांधण्याबाबत शासनाच्या विचाराधीन आहे. माझा पहिला प्रश्न असा आहे की, हा विचार किती दिवसात पूर्ण होणार आहे ? या मुद्रणालयात अद्ययावत यंत्रसामग्री उपलब्ध करुन दिली जाणार आहे. परंतु या मुद्रणालयात 176 कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत ही पदे केव्हा भरली जाणार आहेत ?

श्री.सचिन अहिर : सभापती महोदय, नागपूरच्या शासकीय इमारतीसाठी आर्थिक तरतूद करण्यात आली होती. परंतु प्रत्यक्षात निधी उपलब्ध झाला नाही. त्यानंतर 25 कोटी रुपयांचा सुधारित प्रस्ताव तयार करण्यात आला होता. या निधीतून टप्प्याटप्प्याने या इमारतीची पुनर्बांधणी करणे गरजेचे होते. त्यामुळे पुढील पुरवणी मागण्यांमध्ये यासाठी तरतूद करुन हे काम केले जाईल. या विभागाचे मंत्री महोदय, माननीय उप मुख्यमंत्र्यांना भेटणार आहेत. पुढील अधिवेशनाच्या काळात या कामासाठी निधी मंजूर करुन घेण्याचा निश्चित प्रयत्न केला जाईल. दुसऱ्या प्रश्नाला 'होय' असे उत्तर आहे. सन्माननीय सदस्यांनी तेथील रिक्त पदांचा उल्लेख तिसऱ्या प्रश्नामध्ये केला आहे. तूर्त वर्ग 4 च्या पदांच्या भरतीला बंदी आहे. अत्याधुनिक प्रेस उभी करीत असताना कर्मचाऱ्यांची आवश्यकताही असते. त्यामुळे इमारतीची पुनर्बांधणी करीत असताना तेथे पुरेसा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन देण्याची भूमिका घेतली जाईल.

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, सन् 2002 से 2012 तक का समय आ गया है. लेकिन 10 वर्ष बीत जाने के बाद भी गवर्नमेंट प्रिंटिंग प्रेस इमारत के सुधार का काम अभी तक पूरा नहीं हुआ है. आपने यहां पर लिखा है कि प्रस्ताव आएगा तो जरुर विचार करेंगे. मेरा कहना है कि इस प्रिंटिंग प्रेस की  इमारत कभी भी गिर सकती है, जिसकी वजह से वहां पर काम करने वाले कर्मचारियों की जान हमेशा खतरे में है. इसलिए मुझे पूछना है कि इस बिल्डिंग को सरकार खुद गिराकर, वहां पर नयी बिल्डिंग बनाने के संबंध में कितने दिनों के अंदर कार्यवाही करेगी ?

श्री.सचिन अहिर : जोपर्यंत निधी मिळणार नाही तोपर्यंत कोणतीही कार्यवाही करणे शक्य होणार नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेले खरे आहे की, या इमारतीचा जीर्णोध्दार केला नाही तर ती इमारत पडण्याची शक्यता नाकारता येत नाही.  म्हणून पुढील पुरवणी मागण्यांच्या माध्यमातून निधी मान्य करण्याचा प्रयत्न केला जाईल आणि त्या कामाला त्वरित सुरुवात करण्यात येईल.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, ही इमारत 150 वर्षापूर्वीची आहे.  ही इमारत हेरिटेज कॅटेगरी बसते काय, हेरिटेजमध्ये बसत नसेल तर ही इमारत रिस्टोअर करण्यात येणार आहे आहे ?

यानंतर श्री.भोगले...

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. सचिन अहिर : ही 150 वर्षापूर्वीची शासकीय मुद्रणालयाची इमारत आहे. या इमारतीला हेरिटेज दर्जा मिळालेला आहे की नाही याची माहिती आता माझ्याकडे नाही. परंतु पूर्वपरवानगी घेऊनच या इमारतीची पुनर्बांधणी करण्याची भूमिका घेतलेली आहे.

----

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याबाबत

**मु. शी.** : गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याबाबत श्री. सुभाष चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. सुभाष चव्हाण ( नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"मुंबई शहर व मुंबई उपनगर येथे रस्त्याच्या कडेला बसून गटई करणा-या गटई कामगारांना उन्हाचा व पावसाचा सहन करावा लागणारा त्रास विचारात घेऊन या गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्याचा घेण्यात आलेला निर्णय, सदर निर्णयानुसार गटई कामगारांनी पत्र्याचे स्टॉल मिळण्यासाठी संबंधितांकडे वारंवार मागणी करण्यात येऊनही काही थोड्या फार गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्यात येणे, अद्याप मोठ्या सेख्येने गटई कामगार पत्र्याचे स्टॉल मिळण्यापासून वंचित असणे, यामुळे या गटई कामगारांत निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया "

श्री. सचिन अहिर (सामाजिक न्याय राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सुभाष चव्हाण : या लक्षवेधीमध्ये मी मर्यादीत प्रश्न विचारलेला आहे. मुंबई शहर व मुंबई उपनगरामध्ये चर्मकार समाजातील दुर्बल घटक जो गटई कामगार आहे तो उन्हा-पावसात आपल्या आ-या, कात्र्या वगैरे घेऊन लोकांची सेवा करीत असतो. या गटई कामगारांना केन्द्रस्थानी ठेवून संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळा स्थापन झाले. माझा प्रश्न असा आहे की, मुंबई शहर आणि मुंबई उपनगरामध्ये किती गटई कामगार आहेत ? त्यापैकी किती गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देण्यात आलेले आहेत ? दोन अडीच वर्षापूर्वी अशाच प्रकारच्या प्रश्नाला तत्कालीन सामाजिक न्याय विभागाचे मंत्री महोदय श्री. शिवाजीराव मोघे यांनी असे उत्तर दिले होते की, गटई कामगारांना पत्र्याच्या स्टॉलचा पुरवठा करण्यासाठी नव्याने आराखडा तयार करण्यात येत असून तो निश्चित झाल्यानंतर संचालक, समाजकल्याण संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समिती मार्फत निवड प्रक्रिया पूर्ण करुन स्टॉल दिले जातील. त्यासाठी विभागाने आर्थिक तरतूद देखील केलेली आहे. ही योजना शासनाने बंद केलेली आहे काय, असल्यास ती पुन्हा केव्हा सुरु करण्यात येईल ?

श्री. सचिन अहिर : आतापर्यन्त एकूण 9054 लाभार्थींना स्टॉलचे वाटप करण्यात आलेले आहे. ही योजना बंद केलेली नाही. ही वार्षिक योजना आहे. या योजनेसाठी या वर्षी 10 कोटी रु.ची तरतूद केलेली आहे. निविदा काढलेल्या आहेत. 6 निविदा प्राप्त झालेल्या असून त्यापैकी 3 निविदांची छाननी झालेली आहे. 6 महिन्यामध्ये निविदा प्रक्रिया पूर्ण करुन स्टॉलचे वाटप करण्यात येईल.

----

...4..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : राज्यात नवीन कारागृह बांधण्याची आवश्यकता

**मु. शी.** : राज्यात नवीन कारागृह बांधण्याची आवश्यकता यासंबंधी सर्वश्री रामदास कदम व परशुराम उपरकर,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृह मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यातील विविध गुन्ह्यांत अटक करण्यात आलेल्या गुन्हेगारांना ठेवण्यासाठी तुरुंगच अपुरे पडत असणे, सर्वच तुरुंग हे कैद्याचे कोंडवाडे असणे, क्षमतेपेक्षा तिप्पट ते चौपट कैदी त्यात कोंबण्यात येणे, उदा.मुंबईतील ऑर्थररोड कारागृह हे ब्रिटीशकालीन असून तुरुंग बांधतांना त्यांची ८०० कैद्याची क्षमता असताना या कारागृहात ३ ते साडेतीन हजार कैदी ठेवण्यात येणे, त्यात सर्वसामान्य गुन्ह्याबरोबरच गुन्हेगारी जगताशी संबंध असलेल्या विविध टोळ्यांचे गुंड, बॉम्बस्फोट खटल्यातील आरोपींचाही समावेश असणे, या कैद्यांवर देखरेख ठेवण्यासाठी केवळ १२५ पोलीस कर्मचाऱ्यांचाच ताफा असणे, तसेच पैसा आणि दहशतीच्या जोरावर या कारागृहाच्या जेलरचीही जरब या गुन्हेगारांवर नसणे, परिणामी, कारागृहात होत असलेल्या मारामाऱ्या शासनाने राज्यात नवीन कारागृह बांधण्याची तसेच गुन्हेगारांवर जरब बसवतील असे अधिकारी नेमण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. आर.आर.पाटील (गृहमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

...5..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

रामदास कदम : माझ्याकडे गृह विभागाचा सन 2012-13चा तक्ता आहे. त्यामध्ये तुरुंगाची कैदी ठेवण्याची क्षमता आणि प्रत्यक्षात असलेले कैदी याची माहिती दिलेली आहे. मुंबईमध्ये असलेल्या तुरुंगांची कैदी ठेवण्याची क्षमता 804 असून प्रत्यक्ष 1944 कैदी आहेत. ठाण्यातील तुरुंगाची कैदी ठेवण्याची क्षमता 1105 असून प्रत्यक्षात तेथे 2459 कैदी आहेत. नवीन तुरुंग बांधण्यापेक्षा मुळातच गुन्हेगारी कशी कमी होईल याकडे लक्ष दिले पाहिजे. तेव्हा नवीन तुरुंग बांधण्याची आवश्यकता राहाणार नाही यादृष्टीने सरकारने काय उपाययोजना केलेली आहे ?

माझा दुसरा प्रश्न असा आहे की, पाकिस्तानातून येऊन 26/11ला मुंबईमध्ये ज्याने 200 जणांना अंदाधुंद गोळीबार करुन मारले त्या अजमल कसाबला आर्थररोड तुरुंगात ठेवलेले असून आता पर्यन्त त्याच्या सुरक्षेवर शासनाने किती खर्च केलेला आहे ? या पाकिस्तानातील हिरव्या नागाचा फणा ठेचला पाहिजे, अजमल कसाबला फाशी दिली पाहिजे. अजमल कसाबला जिवंत पकडल्यामुळे तो पाकिस्तानचा आहे हे सिद्ध झालेले आहे, त्यासंदर्भातील चौकशी पूर्ण झालेली आहे, आता त्याला फाशी देण्यास कोणतीही अडचण नाही. तेव्हा अजफलला फाशी देण्याचा निर्णय शासन कधी घेणार आहे ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

लक्षवेधी सूचना क्र.2....

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, राज्यामध्ये 9 मध्यवर्ती, 14 जिल्हा कारागृह वर्ग.1, 17 जिल्हा कारागृह वर्ग.2 आणि 3 जिल्हा कारागृह वर्ग.3 अशी एकूण 43 कारागृहे आहेत. ही गोष्ट खरी आहे की, राज्यातील सर्व तुरुंगांमध्ये कैदी ठेवण्याची क्षमता ही साधारणत: 22 हजाराच्या आसपास आहे. आज कैद्यांची संख्या पाहिली तर 23800 कैदी राज्यातील वेगवेगळया तुरुंगात शिक्षा झालेले तर काही न्यायिक बंदी आहेत. 23800 दरम्यान एकूण कैद्यांची संख्या असली तरी 1800 कैदी क्षमतेपेक्षा अधिक आहेत. एकूण 1800 अधिक कैदी असल्यामुळे फारसा फरक पडत नाही.

सभापती महोदय, ज्या दृष्टीने माननीय सदस्यांनी सरकारचे लक्ष वेधले आहे त्या संदर्भात मी एवढेच सांगू इच्छितो की, जो काही ओव्हरलोड आहे तो मुंबई मध्यवर्ती कारागृह येथे आहे. अधिकृत बंदी क्षमता 804 असताना सध्या असलेले कैदी 1825 आहेत. म्हणजे क्षमतेपेक्षा 1021 कैदी जास्त आहेत. ठाणे मध्यवर्ती कारागृहाची क्षमता 1105 असताना प्रत्यक्षात 2327 कैदी आहेत. म्हणजे 1222 कैदी ठाणे कारागृहामध्ये अधिक आहेत. औरंगाबाद मध्यवर्ती कारागृहामध्ये क्षमता 579 असताना प्रत्यक्षात 997 कैदी आहेत, म्हणजे 418 कैदी अधिक आहेत. कल्याण कारागृहाची क्षमता 540 असताना 627 कैदी आहेत. अहमदनगर कारागृहाची क्षमता 48 असताना प्रत्यक्षात 198 म्हणजे क्षमतेपेक्षा 150 कैदी अधिक आहेत. ही पाच कारागृहे वगळता उर्वरित कारागृहांमध्ये क्षमतेपेक्षा कमी कैदी आहेत. या कारागृहांमध्ये जास्त कैदी आहेत. त्या दृष्टीने तळोजा येथे नवीन कारागृह बांधून तयार असून ते कार्यान्वित झाले आहे. तेथे काही कैद्यांना शिफ्ट करता येईल. कोणत्या कैद्यांना शिफ्ट करता येईल याचाही अभ्यास करीत आहोत. त्याचबरोबर नवी मुंबई, ठाणे आणि मुंबई या परिसरात तळोजा जेल भरुन सुध्दा आणखी एका जेलची आवश्यकता भासेल अशी आकडेवारी सांगते. म्हणून लवकरच आहे या जेलची क्षमता वाढविणे, बरॅक वाढवून अधिक क्षमता निर्माण करणे, अन्य परिसरात आणखी एक जेल वाढविणे या बाबी सरकारच्या विचाराधीन आहेत.

सभापती महोदय, माननीय सदस्यांनी जेलची क्षमता वाढवून कैद्यांची क्षमता वाढविण्यापेक्षा कैदीच निर्माण होणार नाहीत या दृष्टीने शासन काय प्रयत्न करणार असा प्रश्न उपस्थित केला

..2..



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

आहे. हा प्रश्न खूप चांगला आहे. महाराष्ट्रातील सगळ्या जेल ज्या दिवशी 100 टक्के मोकळ्या असतील तो दिवस राज्याच्या दृष्टीने अतिशय भाग्याचा आणि महत्वाचा दिवस असेल. इतिहासामध्ये सुध्दा तसा दिवस कधी उगवला नव्हता आणि भविष्यात सुध्दा कधी उगवेल असे मलाही वाटत नाही. पण माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी आणि गृहमंत्री या नात्याने मी या जेल मोकळ्या होतील असे स्वप्न बघायचे.

सभापती महोदय, दोन मार्ग आहेत. एक म्हणजे गुन्हेगार कमी होणे आणि गुन्हेगारांना न पकडणे. गुन्हेगारांना जर पकडायचे नाही असे ठरविले तर जेलमधील संख्या कमी होईल. गुन्हेगारी प्रवृत्तीची माणसे समाजामध्ये वावरतील. म्हणून या परिसरातील जेलची क्षमता वाढवून, बरॅक वाढवून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या लोकांना जेलमध्ये टाकले पाहिजे. त्यांना समाजापासून तोडले पाहिजे आणि कायद्याचे पालन करणारे लोक शांतपणे जीवन जगू शकले पाहिजेत, सुरक्षित जीवन जगू शकले पाहिजेत. म्हणून कैद्यांची संख्या वाढली तरी सुध्दा त्याची चिंता बाळगण्याचे कारण नाही. अनेक गोष्टीमुळे गुन्हेगार वाढत असतात. त्याची कारणे कमी झाली तर गुन्हेगार सुध्दा कमी होऊ शकतात. शासनाने आतापर्यंत केलेल्या प्रयत्नांमुळेच गुन्हेगारांची संख्या एवढ्यापर्यंत आहे. अन्यथा संख्या यापेक्षा कदाचित वाढली असती.

सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांनी महत्वाचे प्रश्न उपस्थित केले आहे. कसाब याला लवकर फाशी होण्यासाठी काय केले जाणार, ज्याने मुंबईतील शेकडो निरपराध माणसांना मारले त्याला लवकरात लवकर शिक्षा कधी होणार, त्याच्यावर किती खर्च केला जातो?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील.......

वर्तमान पत्रामध्येही अधून मधून बातम्या येत असतात त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, कसाबला पकडल्यापासून दि. 29.2.2012 पर्यंतचा त्याच्यावर झालेला आहारावरील खर्च रुपये 34975/- एवढा झालेला आहे तर वैद्यकीय उपचाराचा खर्च रु. 28060/- इतका झाला आहे. तसेच ऑर्थर रोड जेलमध्ये अशा कैद्यांसाठी काही भाग बांधकाम करणे आवश्यक होते पण कसाबला फाशी झाल्यानंतर हे बांधकाम केलेले स्ट्रक्चर परमनेंट राहील व त्याची आवश्यकता असते. या बांधकामावर रु. 5.25 कोटी इतका खर्च झालेला आहे. त्यानंतर अधिकारी आणि कर्मचारी यांच्या वेतनावर 1 कोटी 22 लाख 18 हजार 406 रुपये एवढा खर्च झाला आहे. या सुरक्षिततेसाठी आयटीडीपी हे केंद्र सरकारचे पोलीस दल आपण पाचारण केले होते व ते अजूनही कार्यरत आहे. त्यांनी मात्र यापोटी फार मोठी डिमांड केली आहे. त्यांनी रु. 19.28 कोटी एवढी डिमांड राज्य शासनाकडे केलेली आहे. आतापर्यंत केंद्र शासन आणि राज्य शासनाची भूमिका आपण बघितली तर हा हल्ला जसा मुंबईवर होता तसा तो देशावर सुध्दा होता म्हणून कसाबच्या सुरक्षेवर झालेला खर्च ही संयुक्त जबाबदारी आहे, राज्याची आणि केंद्राची सुध्दा ही जबाबदारी आहे. म्हणून ही रु. 19.28 कोटीची मागणी जी आयटीडीपीने आपल्याकडे केली आहे ती रक्कम केंद्राने मागू नये, ती आपल्याला माफ करावी अशी विनंती राज्य शासनाने केंद्र शासनाकडे केलेली आहे, हे देखील या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

महोदय, आता प्रश्न कसाबच्या फाशीचा. त्याबाबत मी सांगणार आहे की, आपल्या देशात कायद्याप्रमाणे ज्युडिशियरी निर्णय घेत असते, अशी आपली व्यवस्था आहे. प्रयत्नांची पराकाष्ठा करुन चांगले वकील नेमून केस लवकर संपवून निकाली काढण्यात हायकोर्ट पातळीवर महाराष्ट्रात काम करणाऱ्या ज्युडिशियरीतील लोकांनी यामधील वकील आणि पोलीस अधिकाऱ्यांनी देखील चांगले काम केले आहे. तसेच जगभरात आतंकवादाच्या संदर्भात जे खटले चालले आहेत त्यापेक्षा लवकर हा खटला संपवून फाशीची शिक्षा देण्यापर्यंतची भूमिका राज्याने घेतलेली आहे. हाय कोर्टात ज्याला फाशीची शिक्षा होते त्यावेळेस आरोपीला सुप्रिम कोर्टात अपिल करण्याचा अधिकार असतो. त्याप्रमाणे सुप्रिम कोर्टाने सुध्दा लवकरात लवकर ही केस निकाली काढण्याचा प्रयत्न



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील........

केला आहे. एकदा सुप्रिम कोर्टाचा निर्णय झाल्यानंतर केंद्र शासन आणि राष्ट्रपतींची मान्यता लवकरात लवकर घेऊन तातडीने फाशी दिली पाहिजे या मताशी शासन 100 टक्के सहमत आहे व यादृष्टीनेच उपाययोजना केल्या जातील असे मी सांगू इच्छितो.

श्री. जयंत प्र. पाटील : महोदय, कसाबच्या दिमतीला 6 स्वयंपाकी ठेवले होते. या स्वयंपाक्यांची नावे श्री. ज्योतिराम सुतार, कृष्णा म्हसकर आणि जगदीश शेट्टी अशी असून.या कर्मचाऱ्यांना स्वयंपाकासाठी ठेवल्यानंतर पोलीस आयुक्त श्री. अरुप पटनाईक यांनी त्याबाबत चौकशी करण्याचे आदेश दिले होते, ही गोष्ट खरी आहे काय, तसेच तुरुंगात टॉयलेट वगैरेची व्यवस्था जशी केलेली आहे त्याचा विचार करता ग्रामीण भागातील पोलीस स्टेशनमध्ये अशा प्रकारची कोणतीही सोय नाही. अनेक वेळा मंत्री महोदय आणि आम्ही आंदोलनाच्या निमित्ताने हे अनुभवलेले आहे. मंत्री महोदय देखील सुरुवातीला माझ्या बरोबर होते. त्यावेळेस जी परिस्थिती होती ती आणि आजची व्यवस्था पाहिली तर त्यात बदल झाला पाहिजे, त्यासाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद करणे आवश्यक आहे. यादृष्टीने शासन विचार करणार काय ?

श्री. आर.आर.पाटील : महोदय, सहा स्वयंपाकी नेमून त्यांनी तयार केलेला स्वयंपाक जर कसाबने खाल्ला असता कसाब फाशीऐवजी खाऊन खाऊनच मेला असता. पण असे सहा स्वयंपाकी वगैरे काही नेमले नव्हते तर एखादा प्रकृती अस्वाथ्यामुळे कामावर आला नसेल तर त्याच्या बदल्यात दुसरा बोलाविला असावा. तसेच त्या काळात आवश्यक ती प्रिकॉशन घेण्यासाठी शासनाला जेल मॅन्युअल प्रमाणे आवश्यक वाटत होते तसे काम केलेले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

सभापती महोदय, कसाबसाठी दोन स्वयंपाकी होते परंतु एक आला नाही तर दुसरा येत असे व दुसरा आला नाही तर पहिला येत असे अशा रीतीने हे दोन्ही स्वयंपाकी आलटून पालटून काम करीत होते. जनरल कैद्याला जे खाद्य पुरवले जाते तेच खाद्य कसाबलाही पुरवले जात आहे.

श्री. हेमंत टकले : सभापती महोदय, कारागृहांचा प्रश्न लक्षवेधीच्या निमित्ताने उपस्थित झालेला आहे. कारागृहाची अधिकची माहिती माननीय गृह मंत्र्यांकडून मिळावी यासाठी मी प्रश्न उपस्थित करीत आहे. माननीय गृहमंत्र्यांनी जेलमधील कैद्यांची जी संख्या सांगितलेली आहे त्याची बेरीज केली तर 22295 व 23444 यांचा मेळ बसत नाही. ही संख्या 23444 पेक्षा अधिक आहे असे प्रथमदर्शनी वाटते. मला या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय गृहमंत्र्यांना असे विचारावयाचे आहे की, कारागृहामध्ये कामकाज कारागृहाच्या मॅन्युअल प्रमाणे चालत असते. मध्यंतरी मी माननीय गृहमंत्र्यांबरोबर नागपूरच्या कारागृहाला भेट दिली होती. सूर्यास्तापूर्वी कैद्यांना रात्रीचे जेवण द्यावे असा उल्लेख मॅन्यूअलमध्ये आहे. त्यावेळी विजेची सोय नसल्यामुळे सूर्यास्तापूर्वी म्हणजे सायंकाळी 5.00 वाजता जेवण दिले जात असे. त्याकाळी कैद्यांच्या जेवणाची जी वेळ ठरविण्यात आली होती ती वेळ आज तशीच्या तशीच ठेवण्यात आलेली आहे. मॅन्यूअलमध्ये कालबाहय झालेल्या बाबी असतील तर त्याबाबत शासनाने पुनर्विचार करण्याची गरज आहे. न्यायालयाने जी काही शिक्षा सुनावली असते ती शिक्षा गुन्हेगाराला कारागृहात भोगावी लागत असते. सर्वच गुन्हेगार गुन्हे करुन कारागृहात जातात असे नाही तर चुकीच्या पध्दतीने सुध्दा लोकांना शिक्षा होऊ शकते. त्यामुळे अशा कैद्यांसाठी सामाजिक न्यायाच्या दृष्टिकोनातून कौन्सीलींग करणे किंवा त्यांना जी काही कामे चांगल्या पध्दतीने करता येऊ शकतात ती करण्याच्या बाबतीत आपल्या विभागाची काही सूचना आहे काय ?

श्री. आर.आर.पाटील : सभापती महोदय, जेलमध्ये असणाऱ्या सर्व कैद्यांना तातडीने फाशी दिले पाहिजे असे काही नसते. काही वेळेला भावनेच्या आहारी जाऊन गुन्हा घडू शकतो. जीवनामध्ये त्यांना सुधारण्याची संधी देणे आवश्यक असते. महाराष्ट्रातील कारागृहे ही सुधार गृहे



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर.आर.पाटील ....

व्हावीत यासाठी अनेक उपाययोजना न्यायालयाच्या सूचनेमुळे तसेच एनजीओंने व्यक्त केलेल्या भूमिकेमुळे राज्य सरकारने सुध्दा तशा प्रकारची पाऊले उचलली आहेत. जेलमधून कैदी बाहेर पडल्यावर त्याच्याकडे समाजाचा पाहण्याचा दृष्टिकोन वेगळा असतो. या लोकांना समाज आपल्यामध्ये मिसळून घेत नाही, कामाला ठेवले जात नाही. या लोकांवर गुन्हेगारीचा शिक्का कायमचा बसून जातो. शिक्षा भोगून बाहेर आल्यानंतर त्याला जगण्याचे कौशल्य जेलमध्ये शिकविण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जातो आहे. त्या व्यक्तीमधील क्षमता विकसित करुन ती व्यक्ती बाहेर आल्यानंतर काम करु शकेल, चांगले जीवन जगू शकेल अशी कौशल्य शिकवणे तसेच जेलमध्ये असतांना अशा कैद्यांना रोजगार पुरविणे व त्यातून काही पैसे निर्माण करणे अशा बाबतीत शासनाने प्राधान्य दिलेले आहे.

सभापती महोदय, जेलमध्ये कैद्यांना संध्याकाळी 5.00 वाजता जेवण दिले जाते.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.आर.आर.पाटील...

दिवस मावळण्यापूर्वी त्याने जेवण करून आत जावे अशा पद्धतीची भावना त्यात व्यक्त केली जाते. जुन्या काळात विद्युत पुरवठा नसेल म्हणून ती पद्धत अवलंबिली असेल. हे मॅन्यूअल इंग्रजांनी केलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी जी भूमिका व्यक्त केली त्यात तथ्य आहे. उशिरा जेवण देता येईल काय, हे प्रायोगिक तत्त्वावर अमरावती कारागृहामध्ये सुरूही केले आहे.आमचा तो प्रयोग यशस्वी झाला, रात्रीचे जेवण जेवून झाल्यानंतर आपल्या बॅरकीमध्ये परतण्याची भूमिकी स्वीकारली तर ती चांगली गोष्ट होईल. पण अंधाराचा फायदा घेऊन पळून जाण्याचा प्रयत्न केला तर मग गार्ड वाढवावे लागतील. यामुळे विधान मंडळाच्या सभागृहात प्रश्न येण्याची शक्यता आहे की, कैदी कसे पळाले ? यातील जे शिस्तबद्ध कैदी आहेत, पळून जाण्याची शक्यता नाही, ज्यांनी शिक्षेचा मोठा कालावधी भोगला आहे अशांच्या बाबतीत अमरावतीचा प्रयोग बघून लवकरात लवकर निर्णय केला जाईल. रात्रीचे जेवण पाच वाजता न देता ते थोडे उशिरा म्हणजे जेवण्याच्या वेळी देण्याची भूमिका स्वीकारली जाईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, कारागृहांचे व्यवस्थापन कशा प्रकारे होते हा एक महत्वाचा प्रश्न आहे. आपण उत्तरात म्हटले आहे की, मंजूर पदे 216 असून 184 पदे भरली आहेत. इतर कारागृहांमध्ये देखील काही जागा रिक्त आहेत. येरवडा कारागृहात निरीक्षकांची पोस्ट आहे. तेथे श्री.प्रकाश पवार हे कार्यरत आहेत. त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल अनेक प्रश्न पहिल्याच आठवड्यामध्ये उपस्थित करण्यात आले होते. त्यावेळी आपण सांगितले होते की, आम्ही त्याची चौकशी करतो. त्यांनी खाजगी सुरक्षेसाठी कारागृहाचे रक्षक वापरले आहेत. कर्मचाऱ्यांनी त्यांच्या विरूद्ध लेखणी बंद आंदोलन केले आहे. तेव्हा या कारागृहा निरीक्षकांच्या अहवालाचे काय झाले आहे ? तसेर इतर कारागृहांमध्ये किती पदे रिक्त आहेत व ती पदे कधी पर्यंत भरणार आहात ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्रातील कारागृहांसाठी एकूण 5592 पदे मंजूर असून 3617 पदे भरली असून 975 पदे रिक्त आहेत. सदर पदे भरण्याच्या सूचना दिल्या आहेत. यातील काही पदे भरण्याची प्रक्रिया सुरू झालेली आहे. जाहिरात वगैरे दिलेली आहे.

येथे श्री.पवार यांच्या संबंधातील तक्रार केली आहे. ॲडिशनल डी.जीं.ना चौकशी करून तातडीने अहवाल देण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. येत्या 8-10 दिवसात तो अहवाल शासनाला अपेक्षित आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी येरवडा कारागृहा संबंधीचा प्रश्न उपस्थित केला आहे. मी त्यांना विचारू इच्छितो की, आपण येरवडा कारागृह पाहिले आहे काय ?

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, तेथील महिला कैद्यांना भेटण्यासाठी मी विधान मंडळाच्या समितीच्या वतीने गेले होते. तेथील पोलीस स्टाफच्या प्रशिक्षणासाठी मला वक्ता म्हणून बोलाविले होते. अशी माझी येरवडा कारागृहाशी ओळख आहे.

**उप सभापती** : कारागृहांच्या बाबतीत वर महिला सदस्या जास्त का बोलतात हे मला कळत नाही ? सन्माननीय सदस्या श्रीमती अलका देसाई, आपल्याला ऑर्थर रोड कारागृहासंबंधी काही बोलावयाचे आहे काय ?

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, पुण्याचे महिला कारागृह पुण्याचा मध्यवर्ती कारागृहामध्ये समाविष्ट झाले आहे. गेल्या 3-4 वर्षापासून महाराष्ट्रामध्ये महिलांसाठी जेल असावे अशी आम्ही मागणी करीत आहोत. पुण्याचे महिला कारागृह वेगळे आहे. त्याला स्वतंत्र दर्जा द्यावा अशी आम्ही मागणी केली होती. ती अद्याप पूर्ण झालेली नाही. ती पूर्ण करणार आहात काय ? चंद्रपूर मध्ये एक खुले कारागृह बांधायचे शासनाने ठरविले आहे. यासाठी शासनाने जागा देखील बघितली होती. ते खुले कारागृह शासन बांधणार आहे काय ?

श्री.आर.आर.पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या दृष्टीने एक बाब चांगली आहे की, महिला कैद्यांची संख्या पुरूष कैद्यांच्या तुलनेमध्ये फार कमी आहे. सगळ्या कैदी महिलांना एकत्र करून ठेवायचे म्हटले तर ते अडचणीचे जाईल. याचे कारण असे की, त्यांना तारखेच्या वेळी कोर्टामध्ये हजर रहावे लागते. विदर्भातील महिला कैद्यांना मध्यवर्ती ठिकाणी ठेवले तर त्यांना तेथून कोर्टामध्ये न्यावे लागेल.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. आर. आर. पाटील...

सभापती महोदय, एखादे स्वतंत्र कारागृह उभारण्या इतपत महिला कैद्यांची संख्या जर त्या विभागात असेल तर त्या ठिकाणी स्वतंत्र कारागृह उभारण्यात येईल. परंतु पुन्हा अनुशेष राहिल्याबद्दल आपणाकडून तक्रार येण्याची शक्यता आहे.

ॲड. उषा दराडे : सभापती महोदय, योगा येगाने या ठिकाणी कारागृहांचा प्रश्न उपस्थित करण्यात आलेला आहे. मी आणीबाणीच्या काळात 19 महिने येरवडयाच्या जेलमध्ये होते त्यामुळे तेथील महिला कैद्यांचे प्रश्न मला माहीत आहेत. येरवडा किंवा महाराष्ट्रातील कारागृहामध्ये महिला कैदी असतात त्यांना रोजगार उपलब्ध करुन दिला जातो काय, असेल तर तो कोणत्या स्वरुपाचा असतो, त्यासाठी त्यांना किती रोजंदारी दिली जाते? दुसरा प्रश्न असा की, नागपूरच्या कारागृहामध्ये पुरुष कैद्यांना कॉम्प्युटर शिकविले जाते परंतु महिला कैद्यांना शिकविले जात नाही हा दुजाभाव कशासाठी ठेवला आहे, या बाबत शासन कोणती उपाय योजना करणार आहे?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, कारागृहातील कैद्यांना कॉम्प्युटर प्रशिक्षण देण्यामध्ये जर दुजाभाव केला जात असेल तर त्याबाबत माझ्याकडे माहिती नाही. परंतु जर दुजाभाव होत असेल तर तो तातडीने दूर केला जाईल. ज्या फॅसिलिटी पुरुष कैद्यांना दिल्या जातात त्या महिला कैद्यांना सुध्दा दिल्या जातील. कैद्यांनी कारागृहामध्ये आठ तास काम केल्यानंतर अन्स्किल्ड वर्कसाठी 25 रुपये, सेमी स्किल्ड वर्कसाठी 35 रुपये, स्किल्ड वर्कसाठी 40 रुपये वेतन दिले जाते. कैद्याची शिक्षा संपल्यानंतर कारागृहामधून बाहेर पडतांना पुढील जीवन जगण्यासाठी हे पैसे त्यांना उपलब्ध करुन दिले जातात. त्या कैद्यांची शक्ती वाया जाऊ नये, त्या मधून काहीतरी निर्मिती व्हावी हा उद्देश देखील याच्या पाठीमागे आहे. त्याचप्रमाणे महिला कैद्यांना शक्य होतील अशाप्रकारे शिलाईसारखी कामे कारागृहामध्ये दिली जातात. ती कामे महिला कैदी करीत असल्याचे मी स्वत: पाहिले आहे. एखाद्या कारागृहामध्ये महिला कैद्यांना काम उपलब्ध करुन दिले जात नाही अशाप्रकारची तक्रार असेल तर त्या ठिकाणी काम उपलब्ध करुन दिले जाईल.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामधील कारागृहामध्ये कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे तेथील कर्मचाऱ्यांच्या संगनमताने ज्ञानेश्वर लोकरे नावाचा कैदी नारळाच्या किशीपासून दोरखंड तयार करुन कारागृहातून पळून गेला, तो अद्यापि पोलिसांना सापडलेला नाही. त्याचा आपण शोध घेतला आहे काय?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**उप सभापती** : असे कितीतरी प्रकार होतात, याचा अर्थ माननीय सदस्यांना काहीच माहिती नाही आपण या बाबत फारच अज्ञानी आहात.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, माननीय सदस्यांच्या प्रश्नाचे उत्तर आपणच दिले असल्यामुळे मला उत्तर देण्याची आवश्यकता नाही.

**उप सभापती** : मंत्री महोदय, आपण मुख्यमंत्री व्हाल तेव्हा अशाप्रकारे उत्तर देण्याचा अधिकार आपण मला द्यावा.

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, जर तशी वेळ आली तर आपल्याला नक्कीच संधी दिली जाईल.

**उप सभापती** : मी आपल्याला शुभेच्छा देतो.

श्री. मनिष जैन : सभापती महोदय, माननीय गृहमंत्र्यांनी उत्तर देतांना सांगितले की, कारागृहातील कैद्यांनी काम केल्यानंतर त्यांना 40 रुपयांपर्यन्त मजुरी देतो. त्यांची शिक्षा संपल्यानंतर कारागृहाबाहेर पडतांना पुढील जीवन जगण्यासाठी त्या सर्व मजुरीचे पैसे त्याला दिले जातात. माझा प्रश्न असा आहे की, मजुरीची रक्कम फार कमी आहे असे शासनाला वाटत नाही काय? महिला कैद्यांना मिळणारी मजुरी अतिशय कमी आहे, पुरुषांची देखील कमी आहे. या मजुरीच्या दरामध्ये आपण वाढ करणार काय? रोजगार हमी योजनेच्या कामावरील मजुरांइतके सुध्दा त्यांना व्हेजेस दिले जात नाहीत. माणुसकीच्या नात्याने किमान वेतन कायद्यानुसार आपण त्यांना मजुरी कां देत नाही?

श्री. आर. आर. पाटील : सभापती महोदय, हे सरकार माणुसकीने ओतप्रोत भरलेले आहे. या मजुरी व्यतिरिक्त कैद्यांना रोजची लागणारी औषधे, त्यांना दिले जाणारे जेवण, त्यांच्या निवासाची व्यवस्था या सर्व गोष्टींच्या बाबतीत अलीकडच्या काळात न्यायालयाने व ह्युमन राईट्स कमिशनने काही डायरेक्टिव्हज दिल्या आहेत. त्यामध्ये त्यांना कोणत्या कंपनीचा साबण दिला पाहिजे, त्यांना कोणत्या कंपनीची टूथपेस्ट द्यावी यासंबंधी सूचित केले आहे. त्यानुसार आपण त्यांची व्यवस्था करीत आहोत. यापूर्वी अकुशल कामासाठी 12 रुपये 75 पैसे मजुरी होती त्यामध्ये वाढ करुन आज आपण त्यांना 25 रुपये मजुरी देत आहोत. अशाप्रकारे आपण त्यांच्या मजुरीच्या दरामध्ये दुप्पट वाढ केली आहे. यापेक्षा अधिक मजुरीमध्ये वाढ केली तर आपल्याकडे कारागृह अपुरी पडतील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(यानंतर श्रीमती रणदिवे)

अस्धारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ MMP/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 15.35

**लक्षवेधी सूचना क्रमांक 4 बाबत**

**उप सभापती** : आजच्या कामकाज पत्रिकेवर दाखविण्यात आलेल्या चौथ्या लक्षवेधी सूचनेतील विषयाच्या अनुषंगाने यापूर्वीच एकदा नाही तर अनेक वेळा चर्चा झालेली आहे. त्यामुळे सदरहू लक्षवेधी सूचना मी चर्चेसाठी घेत नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आम्हाला याबाबतीत प्रश्न विचारावयाचे आहेत.

**उप सभापती** : या विषयाच्या अनुषंगाने चर्चा झालेली आहे आणि उत्तरेही तीच येणार आहेत. याबाबत चार-पाच वेळा चर्चा झालेली आहे.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, आपण म्हणत आहात त्याप्रमाणे चर्चा झालेली आहे. पण खटाव व माणच्या बाबतीत माझे दोन-तीन वेगळे प्रश्न आहेत. मी थोडक्यात प्रश्न विचारतो.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्यांनी याबाबतीत दोनच प्रश्न विचारावेत.

श्री.विक्रम काळे : होय.

-----

3ई-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : सातारा जिल्ह्यातील खटाव व माण हे दोन्ही तालुके अवर्षणग्रस्त असून तेथे निर्माण झालेली पाणी टंचाई

मु.शी. : सातारा जिल्ह्यातील खटाव व माण हे दोन्ही तालुके अवर्षणग्रस्त असून तेथे निर्माण झालेली पाणी टंचाई यासंबंधी श्री.प्रभाकर घार्गे वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.प्रभाकर घार्गे (सांगली-सातारा स्थानिक प्राधिकारी संस्था) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"सातारा जिल्ह्यातील खटाव आणि माण हे दोन्ही तालुके अवर्षणग्रस्त असून गत वर्षाच्या पावसाळी हंगामात अत्यल्प प्रमाणात पाऊस पडणे, पाणी टंचाई, जनावरांचा चारा इत्यादी प्रश्न निर्माण होणे, सुमारे 200 फूटांपर्यंत विंधण विहिरी खोदण्याचा शासनाने निर्णय घेणे, तथापि, भूगर्भातील पाण्याची पातळी फार खाली गेल्याने विंधण विहिरीची खोली 300 फूट करण्याची आवश्यकता, तसेच गाव, वाड्या यांना लोकसंख्येचे लावलेले निकष बदलून पिण्याच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी जास्तीतजास्त टँकर पुरविण्याची आवश्यकता, तसेच जनावरांच्या चाऱ्या बाबत छावण्या उभारण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.रणजित कांबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उप सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.)





असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, सातारा जिल्ह्यातील प्रामुख्याने खटाव, माण मध्ये अतिशय दुष्काळी परिस्थिती निर्माण झालेली आहे. तसेच पिण्याच्या पाण्याचीही टंचाई निर्माण झालेली आहे. या टंचाई निवारणाच्या अनुषंगाने माझा पहिला प्रश्न असा आहे की, विंधण विहिरी खोदून पाणी पुरवठा करण्याची सोय करीत असतो. पण आता पाण्याची पातळी खोल गेलेली आहे. शासनाच्या निकषाप्रमाणे आपल्याला 180 किंवा 200 फूटापर्यंत विंधण विहीर खोदता येते आणि खाजगी स्तरावर लोकांनी 400-500 फूटाच्या विंधण विहिरी खोदलेल्या आहेत. त्यामुळे आपल्यालाही विहिरींची खोली वाढवून द्यावी लागणार आहे. अशा वेळी शासन विंधण विहिरींची खोली 200 फूटावरुन 300 फूटापर्यंत नेणार आहे काय हा माझा पहिला प्रश्न आहे.

सभापती महोदय, माझा दुसरा प्रश्न असा आहे की, टंचाईच्या परिस्थितीमध्ये पाण्यासाठी टँकरची व्यवस्था केलेली आहे. आज खटाव सारख्या तालुक्यामध्ये 140 गावे, 50 वाड्या आणि वस्त्या आहेत, माण मध्ये देखील 105 गावे आणि 40-50 वाड्या आणि वस्त्या आहेत. त्याठिकाणी त्या भागासाठी 35, 40 टँकर आहेत. अशा वेळी येथील सर्व लोकांना पाणी देण्यासाठी कमीतकमी प्रत्येक तालुक्याला 100 टँकरची व्यवस्था करावी लागणार आहे आणि तसे केले तरच तेथील लोकांना पाणी मिळू शकेल. तेव्हा शासन तशा प्रकारची व्यवस्था करणार आहे काय ?

सभापती महोदय, तसेच माझा तिसरा प्रश्न असा आहे की, या कायम दुष्काळी तालुक्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी प्रादेशिक योजना केलेल्या आहेत. पण खटाव मध्ये असणारी 121 गावांची योजना असेल, खातोळे मधील 12 गावांची योजना असेल, माण तालुक्यामध्ये शिक्रापूरची योजना असेल, परंतु त्या वर्षानुवर्षापासून बंद आहे. पण आता टंचाईच्या परिस्थितीत पाणी देऊन त्या तात्पुरत्या सुरु केलेल्या आहेत. परंतु उद्या पाण्याची टंचाई संपल्यावर पुन्हा त्याठिकाणी पाण्याचा प्रश्न निर्माण होतो. या योजना तेथे चालत नाहीत याचे कारण म्हणजे ग्रामीण भागामध्ये विजेचा दर हा 4 रुपये प्रति युनिट लावण्यात आलेला आहे आणि शेतीसाठी 20 पैसे प्रति युनिट नुसार विजेची आकारणी केली जाते. माझी अशी मागणी आहे की, आपण कमीतकमी 1 रुपया युनिट करावे त्याबाबत शासन कोणता निर्णय घेणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी तीन प्रश्न विचारले आहेत. त्यांचा पहिला जो प्रश्न होता, त्याबाबतीत सांगावयाचे तर शासनाच्या धोरणाप्रमाणे आपण 60 फूट पर्यंतच खोल खणू शकतो. परंतु सन्माननीय सदस्यांनी निवेदन वाचले तर त्यामध्ये स्पष्टपणे लिहिलेले आहे की, पूर्वी शासनाने जी.आर.काढला की, ज्याठिकाणी तीव्र टंचाई आहे आणि जेथे



APR/ MMP/ 15.35

श्री.रणजित कांबळे . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी आहे तेथे कलेक्टर यांनी जी.एस.डी.ए.ची परवानगी घेऊन 300 फूटापर्यंत खोदता येऊ शकते. पण याबाबत मी आणखी एक माहिती देऊ इच्छितो की, अर्थसंकल्पीय अधिवेशन संपण्यापूर्वी जी.एस.डी.ए.च्या अनुषंगाने सदनासमोर आम्ही एक विधेयक आणत आहोत. त्यानुसार यानंतर पिण्याच्या पाण्याशिवाय मग सिंचन असो, उद्योग असो किंवा घरगुती कोणताही उद्योग असो, अशा वेळी आपण 200 फूटापेक्षा जास्त खोदू शकणार नाही. फक्त पिण्याच्या पाण्यासाठी गरजेप्रमाणे आपण तेवढे खोल बोअर मारु शकतो अशा प्रकारचे विधेयक आणण्यात येणार आहे. विधानसभेमध्ये सदरहू विधेयक मंजूर झाले असून आता ते विधान परिषदेमध्ये मंजुरीसाठी मांडण्यात येणार आहे.

सभापती महोदय, याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी टँकरच्या बाबतीत दुसरा एक प्रश्न उपस्थित केला असून त्याबाबत सांगावयाचे तर आज खटावमध्ये 33 आणि माण मध्ये जवळपास 51 टँकर्स् सुरु आहेत. याबाबतीत लोकांच्या गरजेप्रमाणे कलेक्टर यांना पूर्ण अधिकार दिलेला आहे. गरजेनुसार जेवढे टँकर्स् पाहिजेत तेवढे टँकर्स् देण्याची आमची मानसिक तयारी आहे आणि याबाबतीत कलेक्टर यांना पूर्ण अधिकार दिलेला आहे आणि ते त्याप्रमाणे काम करणार आहेत. तसेच सन्माननीय सदस्यांचा शेवटचा प्रश्न विजेच्या बाबतीत होता. विजेचे दर किती असावयास पाहिजेत हे एम.ई.आर.सी. ठरविते. कमर्शिअल आणि घरगुती कनेक्शनचे रेट लावले पाहिजेत यासाठी आपण तीन वेळा एम.ई.आर.सी.समोर गेलो आहोत आणि तीनही वेळेला एम.ई.आर.सी.ने ते मान्य केलेले आहे.त्यामुळे एम.ई.आर.सी. जो दर ठरविते त्याप्रमाणे आपल्याला वीज घ्यावी लागते. सन्माननीय सदस्यांचे म्हणणे खरे आहे की, आपण टंचाईच्या काळाबाबतच रिजनल वॉटर सप्लाय स्कीम सुरु करतो. आपण जर कोणत्याही रिजनल वॉटर सप्लाय स्कीमच्या बाबतीत पहिले आणि जर सगळयांनी एम.एस.ई.बी.चे बिल दिले तर ते निश्चितपणे कायम स्वरुपामध्ये सुरु ठेऊ शकतो हे लक्षात येईल.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रणजित कांबळे.......

आपण देखील पाणपट्टी भरण्याची मानसिकता ठेवली पाहिजे. पाणीपट्टी भरली नाही तर कोणतीही योजना चालविणे शक्य होणार नाही. टंचाईच्या काळात शासन निश्चितपणे पाणी पुरवठा सुरु करेल. परंतु योजना पुढे चालवावयाची असल्यास ग्रामपंचायत पाणीपट्टी देणार नाही तोपर्यंत ही योजना चालविता येणे शक्य होणार नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, दुष्काळी तालुक्यांतील हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे. आमच्या कठवेमहाकांळ, तासगाव व मिरज भागामध्ये ताकारी-म्हैसाळ योजना आहे. या योजनेच्या विजेचे बिल 70 लाख रुपये आहे. ही रक्कम टंचाईच्या माध्यमातून भरली तर कवठेमहाकांळ, तासगाव आणि मिरज भागांतील शेतकऱ्यांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायम स्वरुपी सुटेल. आम्ही पाण्याचे पूजन करतो. विजेचे बिल भरले नाही म्हणून शेतकऱ्यांच्या मोटारी बंद केल्या जातात त्यामुळे शेतकऱ्यांना पाणी मिळत नाही. तेव्हा टंचाईच्या माध्यमातून विजेचे बिल भरुन आमच्या भागातील पाण्याचा प्रश्न सोडविण्यात येईल काय ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, टंचाईच्या काळात बिल भरण्याचा आणि पाणी पुरवठा करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

--------

..2..

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**लक्षवेधी क्रमांक 5 बाबत**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहात सार्वजनिक आरोग्य विभागाचे मंत्री किंवा राज्यमंत्री उपस्थित नाहीत. तेव्हा माझ्या लक्षवेधी सूचनेचे उत्तर कोण देणार आहे ?

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय श्री.सुरेश शेट्टी हे विधानसभा सभागृहात आहेत. त्या ठिकाणी त्यांच्या विभागावर चर्चा सुरु आहे. त्यांनी मला या लक्षवेधी सूचनेचे उत्तर देण्यास सांगितले आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सभागृहात राज्यमंत्री देखील उपस्थित नाहीत.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आम्ही सामुदायिक जबाबदारी समजू शकतो. परंतु श्री.रणजित कांबळे हे त्या विभागाचे मंत्री किंवा राज्यमंत्री नाहीत. नियम 93 अन्वये सूचनेवरील निवेदन असते तर आम्ही समजू शकलो असतो.

श्री.रणजित कांबळे : सभापती महोदय, या प्रश्ना मध्ये जास्त काही नाही. मला या विषयाची काहीच माहिती नाही असे नाही. या पूर्वी या विभागाचा कार्यभार माझ्याकडे होता. त्यामुळे मला या विषयाची माहिती आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय,सभागृहात अशी नवीन प्रथा पाडू नये अशी माझी विनंती आहे.

**उप सभापती** : ही लक्षवेधी सूचना उद्याच्या कामकाजपत्रिकेत प्रथम क्रमांकावर दाखविण्यात येईल.

--------



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**विशेष उल्लेख**

**पृ.शी./मु.शी.**: राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत विविध संवर्गातील कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या सेवे बाबत या विषयावर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले ): सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

राज्यातील राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान (एनआरएचएम) अंतर्गत विविध संवर्गातील कर्मचारी कार्यरत आहेत. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानाच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाकडून येणारा निधी योग्य त्या कारणासाठी वापरण्यात येत नाही. तसेच जिल्हा पातळीवर अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या नकारात्मक दृष्टीकोनामुळे मुख्य उद्दिष्टांना बगल देण्यात येत असल्याने कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांना दिनांक 31 मार्च 2012 पासून कमी करण्यात येणार असल्याने त्या कर्मचाऱ्यांवर बेकारीची कुऱ्हाड कोसळून अनेक कुटुंबे देशोधडीला लागणार आहेत.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत सांप्रत परिस्थितीमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांना सेवा सातत्य देणे बाबत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. सबब त्यांना न्याय मिळण्यासाठी शासनाचे धोरणात्मक निर्णय घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारा शासनास विनंती करीत आहे.

---------



असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: तळकोकणातील भात वाहतुकदारांनी वाढीव दराची मागणी करीत भाताची वाहतूक थांबविल्याने तळकोकणातील भात खरेदी पूर्णत: ठप्प होणे या बाबत श्री.परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

तळकोकणातील भात पीक हे सर्वाधिक उत्पन्न देणारे पीक आहे. परंतु एप्रिल 2012 पासून भात वाहतुकदारांनी वाढीव दराची मागणी करत भाताची वाहतूक थांबविल्याने मार्केटिंग फेडरेशनच्या गोडाऊन मधील भाताच्या साठ्याची उचल होऊ शकली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील भात खरेदी पूर्णत: ठप्प झाली असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये नाराजी व भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा फायदा घेऊन व्यापारी शेतकऱ्यांकडून कमी किंमतीमध्ये भाताची खरेदी करुन त्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान करीत आहेत. तेव्हा या बाबत शासनाने मध्यस्थी करुन वाहतुकदारांच्या मागणी बाबत तोडगा काढावा, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

----------

यानंतर श्री.बरवड..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : अमरावती महानगरपालिकेत सन 1998 ते 2008 या कालावधीत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत झालेला गैरव्यवहार याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"अमरावती महानगरपालिकेमध्ये सन 1998 ते 2008 या कालावधीत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत झालेला गैरव्यवहार, त्याबाबत माननीय विभागीय आयुक्त, अमरावती यांनी चौकशी समिती नेमून त्याचा अहवाल माननीय संचालक, नगर प्रशासन संचालनालय, मुंबई यांना सादर करणे, अमरावती महानगरपालिका क्षेत्रामध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचा सर्व्हे करण्यात येणे, सदर सर्व्हेत दारिद्र्य रेषेच्या यादीत समाविष्ट करताना केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या निकषानुसार सर्वेक्षण केल्याबाबतचा कोणताही अभिलेख चौकशी समितीस उपलब्ध करुन न देणे, तसेच सदर यादीस माननीय आयुक्त, महानगरपालिका,अमरावती यांची मान्यता न घेता 35,243 दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांची पुरवणी यादी अवैधरित्या तयार केल्याचे सदर चौकशी समितीच्या निदर्शनास येणे, त्यातच सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना सन 1998 ते 2008 पर्यंतचे प्रशिक्षणार्थी विद्यार्थी हे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील नसल्याचे चौकशी समितीच्या निदर्शनास येणे, त्यातच स्वयंरोजगार योजनेमधून लाभार्थ्यांना मंजूर कर्ज रकमेच्या 15 टक्के जादा रक्कम प्रदान केल्याचे दिसून येणे, त्यामुळे यात मोठ्या प्रमाणात झालेला गैरप्रकार, त्यामुळे सदर अहवालाची चौकशी करुन कारवाई करण्यासाठी मी हा विशेष उल्लेख मांडत आहे.

----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.** : मुंबई महानगरपालिकेने अधिकृत झोपडीधारकांना घरात शौचालय बांधण्याची परवानगी देण्याच्या घेतलेल्या निर्णयाप्रमाणे पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर या सारख्या शहरात निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

डॉ. नीलम गोऱ्हे ( विधानसभेने निवडलेल्या ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

"मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीतील अधिकृत झोपडीधारकांना यापुढे घरात शौचालय बांधण्याची परवानगी देणार असल्याचा नुकताच मुंबई महानगरपालिकेने घेतलेला निर्णय अभिनंदनीय आहे. अशा प्रकारचा निर्णय राज्यातील पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर या सारख्या मोठ्या महानगरपालिकांमध्ये घेऊन हा प्रकल्प घेतल्यास शासनाच्या हगणदारीमुक्त शहर योजनेस याचा लाभ होणार आहे. या योजनेकरिता शासनाने राज्यातील या महानगरपालिकांना विशेष अनुदान देण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता असल्याने याबाबत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेच्या संदर्भामध्ये अनेक वेगवेगळे प्रश्न मांडले जात असतात. परंतु मुंबई महानगरपालिकेने एक विशेष आणि ज्याला आपण नागरी जीवनाच्या दृष्टीने ऐतिहासिक म्हणता येईल असा निर्णय घेतला आहे. त्याला आतापर्यंत अनेक कारणांमुळे परवानगी मिळत नव्हती परंतु जे अधिकृत झोपडीधारक आहेत त्यांना त्यांच्या घरातच स्वच्छतागृहाची व्यवस्था करण्यासाठी परवानगी देण्याचा निर्णय घेतलेला आहे. मुंबई महानगरपालिकेने हा जो निर्णय घेतलेला आहे त्याचा फायदा लक्षावधी झोपडपट्टीवासीयांना होणार आहे आणि त्या ठिकाणच्या गोरगरीब माणसांची कुचंबणा थांबणार आहे. अधिकृत झोपडीधारकांना घरातच शौचालय बांधण्याची

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे .....

परवानगी देण्याचा मुंबई महानगरपालिकेने जसा निर्णय घेतलेला आहे त्याचप्रमाणे पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, संभाजीनगर यासारख्या मोठ्या महानगरपालिकांमध्येही हा विषय स्वीकारण्यात यावा आणि त्या पध्दतीने नागरी धोरणामध्ये त्याचा अंतर्भाव करावा याकडे मी या विशेष उल्लेखाव्दारे लक्ष वेधत आहे.

...4...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : प्राथमिक स्तरावर मुलींना दररोज दिला जाणारा उपस्थिती भत्ता सातवीचे शिक्षण संपल्यावर एकदम देण्याचा मुंबई महानगरपालिका शिक्षण समितीने घेतलेला निर्णय याबाबत श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. रामनाथ मोते ( कोकण विभाग शिक्षक ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

"प्राथमिक स्तरावर मुलींचे उपस्थितीचे प्रमाण वाढावे व पालकांनी मुलींना शाळेत पाठवावे या दृष्टीकोनातून शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन पहिली ते सातवीच्या मुलींना शाळेत उपस्थित राहिल्याबद्दल दररोज एक रुपया या प्रमाणे उपस्थिती भत्ता दिला जातो. तथापि, मुंबई महानगरपालिका शिक्षण समितीने धोरणात्मक निर्णय घेऊन मुलींना दिला जाणारा उपस्थिती भत्ता दरमहा अथवा तिमाही न देता इयत्ता सातवीचे शिक्षण संपल्यानंतर 7 वर्षांनी एकदम देण्याचा निर्णय घेतला आहे. उपस्थिती भत्त्याच्या प्रोत्साहनामुळे मुलींच्या उपस्थितीत वाढ झाल्याचे दिसून आले होते. उपस्थिती भत्ता एकदम 7 वर्षांनी देण्याचा निर्णय आक्षेपार्ह असून याचा विपरीत परिणाम मुलींच्या उपस्थितीवर होणार आहे. म्हणून मुलींना दिला जाणारा उपस्थिती भत्ता 7 वर्षे रोखून धरण्याऐवजी नियमितपणे दिला जावा याबाबत शासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी विनंती आहे.

----

...5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : विक्रोळी पार्क साईट येथील महानगरपालिकेच्या चार मजली रुग्णालयाचा पुनर्विकास करण्याची आवश्यकता याबाबत श्री. किरण पावसकर, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री. किरण पावसकर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ची सूच□ मांडतो.

कालच राजावाडी हॉस्पिटलवर मोर्चा काढण्यात आला होता. कारण त्या हॉस्पिटलची परिस्थिती दयनीय होती.

"पार्क साईट, सूर्यनगर पवई, अमृतनगर, हनुमाननगर, कातोडीपाडा अशा सुमारे सहा लाखांच्या लोकवस्तीसाठी अत्यंत गरजेचे, मोक्याच्या ठिकाणी असलेले विक्रोळी पार्क साईट येथील पालिकेचे चार मजली रुग्णालय गेली वीस वर्षे बंद अवस्थेत असल्याने तेथील सहा लाख गोरगरीब जनतेकडून होत असलेल्या रुग्णालय पुनर्विकासाच्या मागणीकडे पालिका आयुक्तांपासून पालिका सत्ताधाऱ्यांकडून साधी दखलही घेतली गेली नाही. या इमारतीच्या परिसरात दारुडे, गर्दुल्यांचा अड्डा झाला असून रुग्णालयाचे आवार डंपिंग ग्राऊंड झाले आहे. या बाबत एकाही पालिका आयुक्तांनी काही वर्षात दखल घेतलेली नाही. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मोठमोठ्या घोषणा करणाऱ्या सत्ताधाऱ्यांकडून तसेच आम्ही करुन दाखवले म्हणणाऱ्यांचेही याकडे लक्ष न जाणे आणि काही वर्षात एकाही पालिका आयुक्तांनी याची दखल न घेतल्याची साक्ष देत रुग्णालय इमारतीचा जर्जर, उद्ध्वस्त सांगाडा उभा आहे. खरे म्हणजे महापालिका ज्यांच्या हातामध्ये आहे त्यांनी काय करुन दाखवले हे कळत नाही. अत्यंत उपयुक्त असणाऱ्या या रुग्णालयाकडे प्रशासनाने आणि आरोग्य खात्याने दुर्लक्ष का केले हे गुपित असून पालिका प्रशासनाच्या निष्काळजीपणाचा हे रुग्णालय उत्तम नमुना ठरले आहे. तरी तेथील जनतेच्या आरोग्याच्या दृष्टीने असलेली निकडीची अडचण लक्षात घेता शासनाने चौकशी करुन पुनर्विकासाबाबत तातडीने करावयाच्या उपाययोजनेसाठी मी या विशेष उल्लेखाव्दारे शासनास शिफारस करीत आहे."

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर...

कोणी तरी मोर्चा काढल्यानंतर व दुसऱ्या पक्षाचा मोर्चा येणार आहे याची कल्पना आल्यानंतर राजावाडी हॉस्पिटलसाठी ताबडतोब रात्री बैठका घेतल्या जातात. नियोजित मोर्चा येण्यापूर्वी शासनाने या विषयाकडे लक्ष द्यावे. नंतर करुन दाखविले असे सांगावे.

------

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: वाभवे, ता.वैभववाडी, येथील नळ पाणी पुरवठा योजनेसाठी 75 लाख रुपये खर्च होऊनही ग्रामस्थांना पाणी न मिळणे याबाबत श्री.रामदास कदम यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामदास कदम ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"वाभवे, ता.वैभववाडी, जिल्हा सिंधुदुर्ग येथे सन 2006-07 साली अंदाजे 75 लाख रुपये खर्चाची जलस्वराज्य योजनेंतर्गत योजना राबविणे, शासनाचा एवढा मोठा निधी खर्च होऊनही येथील जनतेला या योजनेच्या टाकीतून एक पेलाही पाणी न मिळणे, पाण्याचे स्त्रोत जवळपास टक्केवारी मिळविण्यासाठी जलस्वराज्य योजनेच्या अध्यक्षांनी मोठ्या रकमेचे अंदाजपत्रक बनविणे, अनावश्यक खर्चावर शासनाची व पर्यायाने जनतेच्या पैशाची उधळपट्टी करणे, पारकोंड माईणकरवाडी येथे या योजनेंतर्गत भूमीगत बंधारा व गाळ उपसण्यासाठी अंदाजे 4 लाख रुपये खर्च करणे, प्रत्यक्षात या कोंडीत उन्हाळ्यात एक थेंबही पाणी नसणे, जलस्वराज्य योजनेचे झालेले निकृष्ट काम, टाकी, पाईप, पंप, पंप कॅबिन, विहिरीची कामे निकृष्ट होऊनही शासनातर्फे चौकशी न होणे, जलस्वराज्य योजनेचे हस्तांतर अथवा पूर्णत्वाचा दाखला न घेता या योजनेचे पाईप जुन्या योजनेच्या टाकीत सांडणे, त्यामुळे या योजनेचा अनधिकृत वापर होणे, जनतेला पाण्यासाठी वणवण फिरावे लागणे, दोन-दोन दिवस पाणी न मिळणे, जलस्वराज्य योजना समितीवर खटले भरणे, त्यांच्यावर कारवाई होणे, जनतेची सतत मागणी असूनही त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने कार्यवाही व उपाययोजना करण्याची आवश्यकता असल्याने शासनाने तत्काळ निवेदन करावे.

सभापती महोदय, वाभवे, ता.वैभववाडी, जिल्हा सिंधुदुर्ग येथे सन 2006-07 मध्ये अंदाजे 75 लक्ष रुपये खर्च करुन जलस्वराज्य योजनेंतर्गत पाण्याची योजना केली. परंतु इतकी रक्कम खर्च होऊनही मागील 5 वर्षामध्ये तेथील ग्रामस्थांना एक प्याला सुध्दा पाणी मिळू शकलेले नाही. या नळ योजनेमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झालेला आहे. त्यामुळे याबाबत चौकशी करुन वाभवे गावच्या ग्रामस्थांना पिण्याचे पाणी तत्काळ उपलब्ध करुन देण्यासाठी मी विशेष उल्लेखाची सूचना देत आहे.

-----

3...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

## पॉईन्ट ऑफ प्रोसिजरबाबत

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय,सन्माननीय सदस्यांना विशेष उल्लेखाची सूचना मांडण्याची संधी दिली जाते.ती विशेष उल्लेखाची सूचना आपल्याकडे देणे आवश्यक असते काय ?

**उप सभापती** : होय.

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम हे छोटयाशा कागदावरुन विशेष उल्लेखाची सूचना वाचत होते, तो कागद आपल्याकडे येणार आहे काय ?

**उप सभापती** : तोच कागद माझ्याकडे आलेला आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, सन्माननीय राज्यमंत्री हे या सभागृहाचे सदस्य होते. त्यामुळे त्यांना ही प्रोजिसर माहीत असावयास पाहिजे.

श्री.रामदास कदम : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी या सदनाचे सदस्य म्हणून काम केलेले आहे. या सदनामध्ये त्यांनी सदस्य म्हणून कामकाज केलेले असल्यामुळे त्यांना येथील कामकाजाची माहिती आहे. असे असताना या सभागृहाची चेष्टा करणे हे मंत्री महोदयांना शोभादायक नाही. त्यामुळे आपण त्यांना सक्त ताकीद द्यावी, समज द्यावी अशी मी आपल्याला विनंती करतो.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी आपल्याला माहिती विचारली होती, सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्याकडे माहिती विचारलेली नाही. माझ्या माहितीप्रमाणे सन्माननीय सदस्यांनी स्वत:च्या लेटरहेडवर टाईप केलेले विशेष उल्लेखाच्या सूचनेचे पत्र आपल्याकडे किंवा विधिमंडळाच्या सचिवांकडे रितसर दिले पाहिजे. परंतु त्यांच्या हातामध्ये एक छोटासा कागद होता. त्यांनी आपल्याकडे तोच कागद दिला आहे का अशी मी आपल्याकडे विचारणा केली होती.

श्री.रामदास कदम : विशेष उल्लेखाची सूचना देण्यासाठी जी प्रोसिजर असते ती मी पार पाडलेली आहे.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामदास कदम यांच्या हातामध्ये जो कागद होता आणि सन्माननीय राज्यमंत्र्यांच्या मनामध्ये जे आहे ते माझ्याकडे रेकॉर्डवर आहे.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मी माननीय मंत्री महोदयांच्या माहितीसाठी सांगतो की, सन्माननीय सदस्यांनी विशेष उल्लेखाची सूचना दिल्यानंतर माननीय सभापती त्याला मान्यता देतात. त्यानंतर आपल्या कार्यालयाकडून सन्माननीय सदस्यांना त्याबाबत कळविण्यात येते. ही पध्दत मंत्री महोदयांना माहीत असावी. कदाचित त्यांच्या डोक्यात हवा गेली असावी. ते या सदनाचे सदस्य होते.

4...



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी./मु.शी.**: राज्यातील दगडखाण कामगारांच्या मुलामुलींसाठी सुरु असलेल्या पाषाणशाळांना मान्यता व अर्थसहाय्य देणे याबाबत श्री.भगवान साळुंखे यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.भगवान साळुंखे (पुणे विभाग शिक्षक) : सभापती महोदय,, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"राज्यामध्ये विविध प्रकारच्या बांधकामासाठी दगडांची फार मोठ्या प्रमाणात आवश्यकता असते. खाण कामगार या संदर्भामध्ये मोडणारे वडार व अन्य गोरगरीब समाजातील कामगार पिढ्यांपिढ्या या दगडखाणीवरुन त्या खाणीवर स्थलांतर करीत सहकुटुंब राबत आहे. या दगडखाण कामगार वर्गाची मुले-मुली शिक्षणापासून नेहमीच वंचित राहतात. 'संतुलन' व तत्सम अशासकीय स्वयंसेवी संस्था या खाण कामगारांच्या मुला-मुलींसाठी 'पाषाणशाळा' चालवित आहेत. अशा शाळांना मान्यता देणे, त्यांना अर्थसहाय्य देणे तसेच ज्या ठिकाणी अशा संस्था सक्रिय नाहीत त्या ठिकाणी शासनाने शाळा सुरु शिक्षणाचा अधिनियम 2009 अन्वये राज्य शासनावर निर्धारित असणे यासाठी करावयाची कार्यवाहीकडे या निमित्ताने लक्ष वेधित आहे."

राज्यामध्ये 2200 दगडखाणी असून त्यामध्ये सुमारे 50 लाख कामगार काम करीत आहेत. हे कामकार वडार व तत्सम समाजातील आहेत. हे काम ते पिढ्यांपिढ्या करीत आहेत. हे कामगार एका खाणीवरुन दुसऱ्या खाणीवर स्थलांतर करीत असताना त्यांच्यासोबत त्यांची लेकरेही जात असतात. या मुलांना शाळा हा प्रकार माहीत नसतो. अशावेळी शासनाच्या माध्यमातून वेगळ्या शाळा चालू करणे आवश्यक आहे, संतुलन यासारख्या स्वयंसेवी संस्था शाळा चालवित आहेत. या संस्थांना शासनाने अर्थसहाय्य दिले पाहिजे आणि मान्यताही देण्याची आवश्यकता आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत/प्रसिद्धीसाठी नाही

MSS/ पूर्वी श्री. खंदारे 15:55

श्री. भगवान साळुंखे...

आज ती मंडळी आझाद मैदानावर उपोषणाला बसलेली आहेत. शालेय शिक्षण मंत्री सभागृहामध्ये उपस्थित आहेत.मी त्यांना विनंती करतो की, दगडखाण कामगारांच्या मुलांसाठी नवीन शाळा सुरु करण्याबाबत तातडीने कार्यवाही करावी.

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री ) : सन्माननीय सदस्यांनी पाषाणशाळांचा मुद्दा उपस्थित केलेला आहे. जे लोक आझाद मैदानावर उपोषणाला बसलेले आहेत त्यांची आणि माझी भेट झालेली आहे. आपल्याला कल्पना आहे की, राईट टु एज्युकेशनखाली पर्यायी शाळा देता येत नाही. असे असले तरी खाणीमध्ये काम करणा-यांच्या मुलांच्या शिक्षणाचा हा प्रश्न आहे. या संदर्भात जे सर्वशिक्षा अभियानाचे काम पहातात ते एसपीडी, श्री. संजय देशमुख यांना तातडीने या संदर्भात बैठक घेण्यास सांगितलेले आहे. या मुलांच्या शिक्षणासाठी काही मार्ग काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे आणि तशा सूचना मी दिलेल्या आहेत.

----

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : राज्यात वृक्षतोड, वन्यप्राण्यांची शिकार, बेकायदेशीर उत्खनन यामुळे पर्यावरणाचा होत असलेला -हास याबाबत श्री. चंद्रकांत पाटील, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. चंद्रकांत पाटील (पुणे विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच[illegible] मांडतो.

"महाराष्ट्र राज्यामध्ये पश्चिम महाराष्ट्र हा आयुर्वेदिक औषधी वनस्पतींचा खजिना असणे, पश्चिम महाराष्ट्रामध्ये आजरा, चंदगड, राधानगरी, ज्योतिबा डोंगर हे जंगल क्षेत्र म्हणून ओळखले जाणे, जंगल क्षेत्र असलेल्या भागांमध्ये वनविभाग अधिका-यांच्या आशीर्वादाने वनस्पती औषधी व लाकडांची तस्करी मोठया प्रमाणात होणे, चोरटी वृक्षतोड, शिकारी व तस्करांकडून होणारी जंगली प्राण्यांची हत्या, यामुळे जंगल व जंगलातील प्राण्यांचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होणे, त्यामुळे गर्द वनराईने नटलेली जंगले उजाड माळ बनत असणे, वृक्षतोडी बरोबरच बेकायदेशीर दगड उत्खनन व वन्यजीवाच्या शिकारीमुळे मोठ्या प्रमाणात पर्यावरणाचा ऱ्हास होत असताना शासनाने याकडे डोळेझाक करणे, त्यामुळे या भागातील लोकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन कारवाई करण्याची आवश्यकता".

--

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी./मु. शी.** : रिक्षाचे ई-मीटर टॅम्पर होऊ नये म्हणून करावयाच्या उपाययोजनेबाबत डॉ.दीपक सावंत,वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

"रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर लावावेत अशी सूचना जी.आर.च्या स्वरुपात मिळाली. 1 एप्रिल पासून ही मोहीम सुरु झाली. पण आज 10 दिवसात किती इलेक्ट्रॉनिक मीटर लागले ? हा वेग अत्यंत कमी आहे. एकूण रिक्षांची संख्या पाहिल्यानंतर कधीपर्यन्त हे इलेक्ट्रॉनिक मीटर बसणार आहेत ? एकाही जुन्या रिक्षाला मीटर बसलेला नाही. ज्याच्या परवान्याचे नूतनीकरण करायचे आहे त्यानी ई मीटर बसविल्याशिवाय त्यांच्या रिक्षा परवान्याचे नूतनीकरण होणार नाही. हे रिक्षांचे मीटर टॅम्पर होऊ शकतात हेही सत्य पुढे आलेले आहे. यासाठी छोटा डिव्हाईस (यंत्र) आवश्यक आहे. त्याचा आकार संगणकाच्या माऊस एवढा आहे. त्यामुळे मीटरच्या रिडिंगमध्ये एक्स्ट्रा पल्स ॲड होतील व मीटर वाढेल. सध्याचे मीटर आणि ई मीटर लावल्यानंतरचे रिक्षाचे भाडे यात तफावत आहे. जुन्या मीटरमुळे रिक्षाचे भाडे जास्त व ई-मीटरमुळे रिक्षाचे भाडे कमी येते. त्यामुळे ही रक्कम वाढावी यादृष्टीने ई मीटरमध्ये टॅम्परींग होऊ शकते. ते होऊ नये म्हणून शासनाने तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना ई मीटर बनविणा-यांना द्याव्यात व याबाबतीत शासनाने तात्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, 16 एप्रिलला रिक्षाचालकांचा संप आहे. रिक्षांना इलेक्ट्रॉनिक मीटर लावावेत असे राज्य शासनातर्फे सांगण्यात आलेले आहे. 1 एप्रिल पासून मोहीम हाती घेण्यात आलेली आहे. इलेक्ट्रानिक मीटर बसविण्याचे काम अत्यंत धिम्या गतीने सुरु आहे. 10 दिवसामध्ये फक्त 20-25 रिक्षांनाच ई-मीटर बसविण्यात आलेले आहेत. संगणकाच्या छोट्या माऊस सारख्या यंत्राच्या सहाय्याने या ई-मीटरमध्ये टॅम्परींग होऊ शकते अशा बातम्या वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेल्या आहेत. अशा प्रकारच्या टॅम्परिंगमुळे पल्सरेटमध्ये वाढ होऊन रिक्षाचे मीटर वाढते आणि ग्राहकाकडून जास्त भाडे घेण्यात येते. जुन्या मीटरमुळे येणारे भाडे आणि ई-मीटरमुळे

..4..



असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

येणारे भाडे यामध्ये खूप तफावत आहे. इलेक्ट्रॉनिक मीटरचे भाडे कमी येते त्यामुळे या ई-मीटरमध्ये टॅम्परींग होणार नाही याची काळजी घेण्याच्या सूचना ई-मीटर बनविणा-यांना देण्यात याव्यात अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनाला विनंती करीत आहे.

----

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही



**पृ. शी./मु. शी.** : मुंबई विद्यापीठातील प्रकुलगुरुंचे पद भरण्याबाबत

श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष
उल्लेखाची सूचना.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूच□ मांडतो.

"गेले काही दिवस मुंबई विद्यापीठ आणि त्याच्या पाठोपाठ इतर विद्यापीठांचेही प्रश्न सभागृहामध्ये उपस्थित होत आहेत. मुंबई विद्यापीठामध्ये कायद्या प्रमाणे कुलगुरुनंतर क्रमांक दोनची जागा ही प्रकुलगुरु म्हणजे प्रोव्हाईस चान्सलर अशी असते आणि प्रोव्हाईस चान्सलरकडे प्रामुख्याने प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी देण्यात येते. मुंबई विद्यापीठात हे पद दीर्घकाळ रिक्त राहिल्याने ब-याच समस्या निर्माण झाल्या आहेत. योग्य व्यक्तीची नेमणूक करुन हे पद तातडीने भरावे."

....नंतर श्री. खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ.शी.**: मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक.

L.A. BILL NO. V OF 2012

( A BILL FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT AND THE MAHARASHTRA (URBAN AREAS) PROTECTION AND PRESERVATION OF TREES ACT, 1975.)

( विधेयक विचारात घेण्यासंबंधीचा प्रश्न पुन: प्रस्तुत झाला )......

श्री.भास्कर जाधव (नगरविकास राज्यमंत्री) : मी आपल्या अनुमतीने विधान सभेने संमत केल्याप्रमाणे सन 2012 चे वि.स.वि.क्रमांक 5 - मुंबई महानगरपालिका अधिनियम आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, 1975 या मध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक विचारात घेण्यात यावे असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता विधेयक खंडश: विचारात घेण्यात येईल.

खंड 2 ते 12 (दोन्ही सम्मिलित) विधेयकाचे भाग झाले.

खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य विधेयकाचे भाग झाले.

श्री. भास्कर जाधव : महोदय, मी आपल्या अनुमतीने विधानसभेने संमत केलेले सन 2012 चे वि.स.वि.क्र.5 संमत करण्यात यावे, असा प्रस्ताव मांडतो.

प्रश्न मतास टाकून संमत झाला.

**उप सभापती** : सन 2012 चे वि.स.वि.क्र. 5 संमत झाले आहे.

-----

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाच्या धोरणानुसार वाढीव पदांना मंजुरी मिळण्यात होत असलेला विलंब

**मु. शी.** : शासनाच्या धोरणानुसार वाढीव पदांना मंजुरी मिळण्यात होत असलेला विलंब यासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांनी उपस्थित केलेली अर्धा-तास चर्चा

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 92 अन्वये पुढील विषयावर अर्धा-तास चर्चा उपस्थित करतो :-

"सन 2002-03 पासून शासनाने अनुदानित शाळांमध्ये पायाभूत पदांमध्ये वाढ झाल्यास या वाढीव पदांना शासनाची मंजूरी मिळाल्याशिवाय वैयक्तीक मान्यता व वेतन न मिळणे, सन 2003-04 व 2004-05 मधील वाढीव 28 पदांना अद्यापही मान्यता न देणे, सन 2005-06 व 2006-07 व 2007-08 मधील पदांना माहे सप्टेंबर, 2010 मध्ये मान्यता देणे, नेमणूक दिनांकापासून शिक्षकांना वेतन न देणे, शिक्षकांचे आर्थिक नुकसान होणे, विनावेतन काम करण्यास भाग पाडणे, शासनाकडे येणारे प्रस्ताव वेळेवर व बिनचूक न येणे, 2008-09 व 2009-10 च्या प्रस्तावाबाबत अद्यापही कार्यवाही न होणे, संगणकीय प्रणालीनुसार पायाभूतपेक्षा वाढीव पदांवर नेमणूका न करण्याचे आदेश क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी दिल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणे, शासनाने मंजूरी दिल्यानंतर 4-5 वर्षांनी वैयक्तीक मान्यता देताना प्रस्ताव नामंजूर होणे, पायाभूतपेक्षा वाढीव पदांना मान्यता देण्याच्या संपूर्ण प्रक्रियेत अमुलाग्र बदल करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया, करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

महोदय, या चर्चेच्या माध्यमातून माध्यमिक आणि उच्च माध्यमिक स्तरावर वाढीव पदे निर्माण होतात. त्यांच्या मान्यतेसाठी असलेल्या प्रलंबित प्रकरणांच्या संदर्भात आणि एकूण या योजनेअंतर्गत पदांना मान्यता मिळण्यात व शिक्षकांना देण्यात जो विलंब होतो तो टाळण्यासाठी या संपूर्ण प्रक्रियेत शासनाने धोरणात्मक निर्णय घेऊन बदल करण्यासाठी ही अर्धा-तास चर्चा मी उपस्थित केली आहे. शासनाने दि. 26.3.2002 रोजी धोरणात्मक निर्णय घेतला होता. या धोरणानुसार माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शाळांमध्ये कार्यभार किंवा विद्यार्थी संख्या वाढल्यामुळे या अनुदानित शाळांमध्ये दि. 31 डिसेंबर, 2001 नंतर जी नवीन पदे निर्माण होतील त्या पदांवर नियुक्ती करण्यासाठी त्या व्यक्तिला मान्यता मिळण्यासाठी अशा मान्यताप्राप्त शिक्षकाला

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ......

शासनाकडून वेतन मिळण्यासाठी शासनाची मान्यता किंवा परवानगी मिळाल्याशिवाय संबंधित शिक्षकांना वेतन मिळत नाही, मान्यता सुध्दा मिळत नाही. शासनाने घेतलेला धोरणात्मक निर्णय मान्य आहे पण ज्या पध्दतीने या निर्णयाची अंमल बजावणी होते, ज्या पध्दतीने मान्यता मिळण्यात शासनाकडूनच विलंब होतो त्यात बदल करण्याची गरज आहे. त्याचे मुख्य कारण सांगतो की, आज सन 2011-12 या शैक्षणिक वर्षामध्ये आपण आहोत तरी सुध्दा शासनाकडून गेल्या 10 वर्षात माध्यमिक शाळांमध्ये जी पदे निर्माण झाली त्या पदांना चार-सहा महिने समजू शकतो पण जेव्हापासून ही योजना सुरु झाली तेव्हापासून कोणत्याही वाढीव पदांना मान्यता मिळालेली नाही, ही बाब मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणू इच्छितो.

**( सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री. विनायक मेटे )**

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ...

आपल्याला विलंबाने माहिती उपलब्ध झाली असेल परंतु 10-10 वर्षापासून प्रस्ताव प्रलंबित राहणे हे काही बरोबर नाही. 10 वर्षापासून काम करणाऱ्या शिक्षकांना मान्यता मिळत नाही, हे शिक्षक काही विना अनुदानित, कायम विना अनुदानित शाळेमधील नाहीत तर हे शिक्षक 100 टक्के अनुदानित शाळेत काम करणारे आहेत. पदे वाढली तरी त्यांना शासन मान्यता देत नाही, पगार देत नाहीत. त्यामुळे या प्रस्तावांना तातडीने मान्यता मिळण्याची आवश्यकता आहे.

उच्च माध्यमिक विभागामध्ये सन 2006-2007, 2007-2008 पर्यंतची पदे निघालेली आहेत. सन 2008-2009, 2009-2010, 2010-2011, 2011-2012 या चार वर्षात उच्च माध्यमिक विभागातील वाढीव पदांच्या संदर्भात जे काही प्रस्ताव आपल्याकडे आलेले आहेत या प्रस्तावांना अद्यापही मंजुरी मिळालेली नाही. उच्च माध्यमिक शाळेमध्ये गणित व संख्याशास्त्राच्या प्रात्यक्षिकाचे कामकाज वाढल्यामुळे त्याही ठिकाणी जवळ जवळ सन 2008-2009, 2009-2010, 2010-2011, 2011-2012 ही चार वर्षाची पदे आजही शासन स्तरावर प्रलंबित आहेत. सुरुवातीला सन 2002-2003, 2003-2004, 2004-2005 ची पदे शासनाने मंजूर केली होती. त्योवळी आपण केवळ 511 पदांना मंजुरी दिली होती व त्यांना 4 वर्षानंतर शासनाने वेतन दिले. आताही शासनाने सन 2005-2006, 2006-2007, 2007-2008 च्या पदांना मान्यता दिली आहे परंतु यानां सुध्दा मागच्या वर्षापासून वेतन मिळू लागले आहे. याचा अर्थ चार वर्षानंतर वेतन मिळावयास लागले आहे. शासनाची मान्यता असावयास पाहिजे ही शासनाची तांत्रिक बाब आहे. त्यामुळे यासंदर्भात शासनाने धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. शासन प्रस्तावांना उशिरा मान्यता देते व अनुदानित संस्थामध्ये काम करणा-या कर्मचाऱ्यांना वेतनापासून वंचित ठेवतो.

शासनाची मान्यता 1 वर्षानंतर, 2 वर्षानंतर मिळेल परंतु त्या कर्मचाऱ्याच्या नेमणुकीच्या दिनांकापासून पगार देण्याची हमी शासनाने घेतली पाहिजे. तुम्ही ज्या दिवसापासून पदाला मान्यता दिली त्या दिवसापासून पगार देतात ते काही बरोबर नाही. खरे म्हणजे शिक्षकांची आपण एक प्रकारे पिळवणूक करीत आहात. एकूणच या प्रक्रियेच्या संदर्भात आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. शाळांकडून प्रस्ताव घेणे, शिक्षण उपसंचालकांनी ते संचालकांना पाठविणे व संचालकांनी ते प्रस्ताव शासन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ...

स्तरावर पाठविणे ही जी काही प्रक्रिया आहे त्यामध्ये विलंब होत असतो. कधी कधी तर शाळेकडून प्रस्ताव येत नाहीत तर कधी उपसंचालक प्रस्ताव पाठवित नाहीत. मुंबईचे सन 2007-2008 चे प्रस्ताव सन 20011-2012 मध्ये सादर होत असतील तर ते योग्य नाही. शिक्षण उपसंचालकाने प्रस्ताव उशिरा प्रस्ताव पाठविले आहेत असे उत्तर देण्यात आलेले आहे. ही सर्व माहिती माहितीच्या अधिकाराखाली मागविण्यात आलेली आहे. आमच्या पत्रांना शिक्षण उपसंचालक एक एक वर्ष उत्तर देत नाहीत. परंतु माननीय दर्डा साहेबांचे मला एक महिन्याच्या आत पत्र मिळते.

आमच्या आदिवासी शाळेतील आश्रमशाळेला इंडेक्स नंबर मिळण्यासाठी 4 दिवस उशीर झ ाला तर आम्हाला 1.80 लाख रुपये बोर्डाने दंड केला. एवढा दंड आकारण्यात येऊ नये अशी आम्ही बोर्डाला विनंती केली परंतु बोर्डाने आमची विनंती धुडकावून लावली. दंड भरण्यासाठी 12 टक्के व्याजाने कर्ज काढून आम्ही 1.80 लक्ष रुपये दंड भरला आहे. हा विलंब सुध्दा आमच्या स्तरावर झाला नव्हता तरी आम्ही हा दंड भरलेला आहे. शिक्षण उपसंचालकांच्या स्तरावर, शिक्षणाधिकाऱ्यांच्या स्तरावर विलंब झाला आणि आम्हाला इंडेक्स नंबर उशिरा मिळाला म्हणून 1.80 लक्ष रुपये दंड भरावा लागला. असे असतांना 4-4 वर्षे प्रस्ताव पाठवित नाही त्यांच्यावर शासन काय कारवाई करणार आहे? संबंधितावर आकसाने कारवाई व्हावी असे आम्ही म्हणत नाही. परंतु ज्या पध्दतीने काम होत आहे ते आक्षेपार्ह आहे एवढेच मला या निमित्ताने सांगावयाचे आहे. यामध्ये आमच्या शिक्षकांचे नुकसान होत आहे. शिक्षकांना वेळेवर पगार मिळत नाही. त्यामुळे आज जे काही प्रस्ताव प्रलंबित आहेत, माध्यमिक विभागाचे गेल्या 10 वर्षापासूनचे प्रलंबित प्रस्ताव,

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

सर्वसामान्य उच्च माध्यमिक शिक्षकांचे गेल्या 4 वर्षाचे प्रस्ताव, गणित आणि संख्या शास्त्र या विषयाचे 4 वर्षाचे प्रलंबित प्रस्ताव आपण तातडीने एक-दोन महिन्याच्या आत निकाली काढणार आहात काय, असा माझा पहिला प्रश्न आहे.

या प्रक्रियेमध्ये बदल करावा, असा माझा दुसरा प्रश्न आहे. साधारणत: शैक्षणिक वर्ष संपण्याच्या आत तरी म्हणजे सन 2011-12 च्या मान्यता 2011-12 अखेर पर्यंत, सन 2012-13 च्या मान्यता सन 2012-13 अखेर पर्यंत मिळतील काय ? याबाबत आपण धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे. येथे आपण जाहीरपणाने सांगावे की, शासन 4-4 वर्षे प्रलंबित प्रस्ताव ठेवणार नाही.

शासनाचे कुठल्याही प्रकारचे आदेश नसताना आमचे शिक्षणाधिकारी आपल्या स्तरावर आपल्या पद्धतीने वेगवेगळे इन्टरप्रिटीशन करून निर्णय घेत आहेत. पायाभूत पेक्षा वाढीव पदांचे हजारो शिक्षकांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित आहेत. आमचे अधिकारी संस्था चालकांना कळवितात पायाभूत पेक्षा वाढीव पद निर्माण झाले असेल तर शासनाची मान्यता मिळाल्याशिवाय हे पद भरू नये. म्हणजे काय तेच मला कळत नाही. शासनाची पदाला मंजुरी मिळाल्यानंतर पगार मिळणे हे आम्ही समजू शकतो. पण हे पद भरूच नका असा कोणताही नियम नाही. शासनाचा कोणताही निर्णय नाही. शिक्षकांच्या पायाभूत पदा पेक्षा वाढीव पद नियुक्तीला जो काही प्रतिबंध अनेक शिक्षणाधिकाऱ्यांनी केला आहे तो शासन ताबडतोब उठविणार आहे काय ? या संपूर्ण प्रक्रियेमध्ये आपण तातडीने निर्णय घ्यावा, अशी माझी विनंती आहे.

चार वर्षाचे प्रलंबित प्रस्ताव आता आपण चार वर्षाच्या विलंबाने मंजूर करणार आहात. त्यामुळे माझी सन्माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, प्रत्येक प्रकरणामध्ये आम्हाला न्यायालयात जायला लावू नका.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते....

शंभर टक्के अनुदानित शाळांमधील हे शिक्षक आहेत. ज्या दिवसांपासून आपण पदाला मंजुरी देणार आहात, तेव्हा पासून वेतन देण्याची जबाबदारी शासनाने न घेता ते जेव्हा पासून लागले तेव्हा पासून वेतन देण्याची जबाबदारी शासनाने घेतली पाहिजे. प्रथम नियुक्तीच्या दिनांकापासून या पदांना मान्यता देणार आहात. तेव्हा पासून त्यांच्या वेतनाची जबाबदारी शासनाने घ्यावी अशा प्रकारची विनंती या निमित्ताने मी करणार आहे. पायाभूत पेक्षा वाढीव पदांवर निर्माण झालेल्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षकांच्या संदर्भात, गणित आणि संख्याशास्त्र विषयाच्या संदर्भात मी हे मुद्दे उपस्थित केले आहेत.  माननीय मंत्री महोदय सकारात्मक दृष्टिकोन ठेवून विचार करतील अशी मला आशा आहे. या संपूर्ण योजनेमध्ये आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. त्याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांनी  निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पॉईंट ऑफ इन्फर्मेशनबाबत**

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, इंडोनेशियाला 8.6 रिस्टर स्केल तीव्रतेचा भूकंपाचा धक्का बसला आहे. भारताला देखील भूकंपाचा धक्का बसला आहे. त्सुनामी येण्याची शक्यता असल्यामुळे दक्षिण भारतामध्ये रेड अलर्ट जाहीर करण्यात आला आहे. काही मिनिटातच आपले आजचे कामकाज संपणार आहे. आपल्याकडे त्सुनामीचा धोका नसला तरी भूकंपामुळे संपूर्ण किनारपट्टीवर काय धोका उद्‌भवू शकतो, काय परिणाम होऊ शकतो, काय दक्षता घेतली पाहिजे, कोळी बांधवांनी कसे वागले पाहिजे या संबंधीच्या सूचना शासनाने ताबडतोब देणे गरजेचे आहे म्हणून मी हा पॉईंट ऑफ इन्फर्मेशन मांडत आहे.

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हे यांनी उपस्थित केलेला मुद्दा भारताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. सदर माहिती शासनाकडे आलेली आहे. याबाबत शासनाचे माहिती घेण्याचे काम सुरू आहे.

आता मंत्रिमहोदयांनी अर्धा-तास चर्चेला उत्तर द्यावे.

यानंतर श्री.सरफरे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

**पृ. शी.** : शासनाच्या धोरणानुसार वाढीव पदांना मंजुरी मिळण्यात होत असलेला विलंब

**मु. शी.** : शासनाच्या धोरणानुसार वाढीव पदांना मंजुरी मिळण्यात होत असलेला विलंब यासंबंधी श्री. रामनाथ मोते, वि. प. स. यांी उपस्थित □लेली अर्धा-तास चर्चा

(चर्चा पुढे चालू...)

श्री. राजेंद्र दर्डा (शालेय शिक्षण मंत्री) : सभापती महोदय, पायाभूत पदांपेक्षा वाढीव पदांना मान्यता मिळण्यास होणारा विलंब या विषयावर सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी अर्धा तास चर्चेच्या माध्यमातून विवेचन केले आहे. त्यांनी अत्यंत चांगल्या प्रकारे हा विषय मांडला असून मला त्याची जाणीव देखील आहे. त्यामुळे मी देखील फार लांबलचक भाषण करणार नाही. आपल्याला चांगल्या प्रकारे प्रश्न माहीत असल्यामुळे त्याचे उत्तर कशाप्रकारे शोधावे याची मला पूर्ण कल्पना आहे. सभापती महोदय, 26 मार्च 2002 च्या शासन निर्णयानुसार शिक्षकांच्या मान्य पदांवर कार्यभार वाढल्यास अशा वाढीव पदांना शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. आपणा सर्वांना कल्पना आहे की, या सर्व नवीन किंवा वाढीव पदांना उच्चस्तर सचिव समितीची मान्यता घेणे आवश्यक आहे, आर्थिक व्यवस्थापनामध्ये शिस्त आणण्याच्या दृष्टीने ही गोष्ट महत्वाची आहे.

सभापती महोदय, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी तीन महत्वाचे मुद्दे उपस्थित केले आहेत. त्यांचा पहिला मुद्दा असा की, गेल्या दहा वर्षामध्ये एकाही माध्यमिक शाळेमध्ये एकाही वाढीव पदाला मंजुरी मिळालेली नाही किंवा त्यामध्ये वाढ करण्यात आलेली नाही. त्यानंतर दुसरा मुद्दा असा होता की, उच्च माध्यमिक शाळेमध्ये गेल्या तीन-चार वर्षामध्ये मान्य झालेली पदे प्रलंबित आहेत त्या बाबतीत तोडगा निघाला पाहिजे.त्यांचा तिसरा मुद्दा असा की, एकूणच या प्रक्रियेमध्ये सुटसुटीतपणा आणणे आवश्यक आहे.

सभापती महोदय, माननीय सदस्यांना व मला या संपूर्ण प्रकरणाची माहिती असल्यामुळे संपूर्ण इतिहास सांगून सभागृहाचा वेळ घेण्यात काहीच अर्थ नाही. सन 2003-04 आणि 2004-05 मध्ये उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या वाढीव पदांना मान्यता मिळाली आहे. त्याचप्रमाणे सन 2005-06, 2006-07 आणि 2007-08 मधील उच्च माध्यमिक शाळेतील शिक्षकांच्या वाढीव पदांना सुध्दा सन 2010 मध्ये मान्यता मिळालेली आहे. ही गोष्ट सत्य आहे की, ही मान्यता मिळण्यास फार मोठा कालावधी लागला आहे. त्या बाबतीत माझ्या पूर्वीच्या मंत्री महोदयांनी लक्ष घातल्यामुळे सप्टेंबर 2010 मध्ये निर्णय लागला आहे. एक गोष्ट सत्य आहे की, या प्रकरणांचा अभ्यास करुन

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा....

खालच्या पातळीवरुन ज्या पध्दतीने माहिती यायला पाहिजे ती बरोबर येत नाही. दोन्ही ठिकाणाहून चुका होत असतात. एक म्हणजे शाळा, संस्थेच्या पातळीवर प्रचलित कार्यपध्दतीनुसार जी माहिती पाठविणे आवश्यक आहे त्यानुसार पूर्णपणे माहिती पाठविली जात नाही. त्यानंतर क्षेत्रीय पातळीवर अधिकाऱ्यांकडून देखील माहिती बरोबर येत नाही हे सत्य आहे. त्यामुळे यामध्ये सुटसुटीतपणा आणण्यासाठी येणाऱ्या महिना दोन महिन्याच्या काळात मी त्यामध्ये लक्ष घालणार आहे.

सभापती महोदय, एक गोष्ट निश्चित आहे की, कोणत्याही शाळेतील पायाभूत पदांच्या संख्येनुसार जर सात-आठ पदे देय असतील तर ती प्रचलित कार्यपध्दती नुसारच भरली गेली पाहिजेत. त्या ठिकाणी जर आरक्षणाचा मुद्दा येत असेल तर तो देखील पाळला गेला पाहिजे. अनेकदा असे घडते की, वरच्या पातळीवर माहिती प्राप्त होते. त्यानंतर पदांना मंजुरी मिळाल्यानंतर खालच्या पातळीवर ती बाब जाते त्यावेळी आरक्षण पाळले गेले नसल्याचे लक्षात येते. त्यामुळे संस्थेकडून आणि क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून माहिती येत असतांना ती अचूक येईल, ज्यामुळे शासनाच्या पातळीवर आपल्याला तातडीने निर्णय घेता येईल. सभापती महोदय, हा शब्द मी आपल्या माध्यमातून देऊ इच्छितो.

सभापती महोदय, दुसरे असे की, माध्यमिक विभागामध्ये सन 2001-02 पासून 2008-09 पर्यंन्त वाढीव विद्यार्थ्यांच्या संख्येमुळे आणि शिक्षकांचा कार्यभार वाढल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वाढीव पदांना मंजुरी देणे आवश्यक होते त्यामध्ये देखील उशीर झालेला आहे. माझ्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार मूळ मंजूर पायाभूत पदांव्यतिरिक्त 218 शिक्षक आणि 785 शिक्षकेतर कर्मचारी अशा एकूण 1703 नवीन वाढीव पदांना मान्यता देण्याचा प्रस्ताव शिक्षण संचालक यांच्याकडून आपल्याकडे आला होता. सदर प्रस्तावाला वित्त विभागाची मान्यता मिळाली असून संयुक्त सचिव समितीसमोर तो ठेवण्यात आलेला आहे. यामध्ये 785 शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांसंबंधी अधिक माहिती मागविण्यात आली आहे. शिक्षकांची मंजूर पदे दहा-दहा वर्षे प्रलंबित रहातात ही गोष्ट चांगली नाही. येणाऱ्या तीन महिन्यांच्या कालावधीत मी या मधून निश्चितपणे मार्ग शोधून काढणार आहे.

सभापती महोदय, आणखी एक प्रश्न असा आहे की, पायाभूत पदांना मंजुरी मिळाल्यानंतर सुध्दा शिक्षकांना वेळेवर पगार मिळत नाही असा मुद्दा आपण उपस्थित केला. ही गोष्ट खरी आहे की, वाढीव पदांना वेतन अनुदान उपलब्ध करुन देण्यासाठी आपल्याला पुरवणी मागणीचा आधार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. राजेंद्र दर्डा....

घ्यावा लागतो. सभागृहामध्ये पुरवणी मागण्या रितसर मंजूर झाल्यानंतरच या पदांना वेतन अनुदान प्रदान करण्यात येते. जोपर्यन्त हा निधी उपलब्ध होत नाही तोपर्यन्त त्या शिक्षकांना वेतन देण्याची जबाबदारी संबंधित शिक्षण संस्थेची आहे याची आपल्याला कल्पना आहे. जेव्हा हा निधी उपलब्ध होतो तेव्हापासून तो अनुज्ञेय ठरतो. आजच्या परिस्थितीत 10 सप्टेंबर 2001 च्या शासन निर्णयातील ज्या विविध कार्यपध्दती आहेत.

(यानंतर श्रीमती रणदिवे)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

APR/ KTG/ पूर्वी श्री.सरफरे . . . . 16:20

श्री.राजेंद्र दर्डा . . . .

त्याच्यामध्ये जी काही विहित कार्यपध्दती आहे, त्यामध्ये सद्यस्थितीत काही बदल करता येणार नाही. मात्र सन्माननीय सदस्यांनी तीन मुद्दे सांगितले असून पहिला मुद्दा म्हणजे दहा वर्षापेक्षा जास्त काळ माध्यमिक शाळेतील पदांच्या बाबतीत काही झाले नाही आणि मी याबाबतीत आजच तातडीने आदेश देतो. तसेच हा प्रश्न देखील पहिल्यांदाच माझ्यासमोर आलेला आहे. याबाबतीत आपल्याला मार्ग काढता येईल.

सभापती महोदय, दुसरा मुद्दा म्हणजे गेल्या चार वर्षापासून उच्च माध्यमिक शाळांचा जो प्रश्न आहे, त्याबाबतीत देखील तातडीने कार्यवाही करण्यात येईल आणि प्रक्रियेत बदल करण्यासाठी दोन पध्दतीच्या गोष्टी आवश्यक असतात. एक म्हणजे त्याच्यासाठी पैसा लागतो आणि दुसरे म्हणजे तुम्हाला तांत्रिकदृष्ट्या काही बदल करावे लागतात. आपल्याला जरी आर्थिकदृष्ट्या बदल करता येत नसले तरी या पध्दतीमध्ये जर आपण काही बदल केले तर खालच्या स्तरावरुन अर्ज येत असताना किंवा प्रस्ताव येत असतानाच जर तो 100 टक्के चांगला असेल, व्यवस्थित असेल तर मग पुढे कारण नसताना आपल्याला प्रस्ताव परत पाठवावा लागत नाही. या दृष्टीकोनातून शासन निश्चितपणे कार्यवाही करील. याठिकाणी आपण अर्ध्या तासाच्या चर्चेच्या निमित्ताने अत्यंत चांगला आणि महत्वाचा प्रश्न मांडलेला आहे आणि त्याच भावनेतून शासन निश्चितपणे कारवाई करील असे मी सांगू इच्छितो.

-------

. . . .3 एन-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, मला माननीय मंत्री महोदयांच्या निदशर्नास आणून द्यावयाचे आहे की, पायाभूत पदांना शासनाची मान्यता मिळाल्याशिवाय ही पदे भरण्यात येऊ नयेत असा काही अधिकाऱ्यांनी चुकीचा अर्थ लावलेला आहे. त्यामुळे पायाभूत पदांना शासनाची मान्यता मिळाल्याशिवाय ही पदे भरण्यात येऊ नयेत अशी संबंधितांनी तळटीप टाकून संच मान्यता दिलेली आहे किंवा त्यांनी आमचा कार्यभार मंजूर केलेला आहे. त्यामुळे हे आदेश तातडीने रद्द करण्याच्या संदर्भात सूचना देणार आहात काय ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोतेसाहेबांनी येथे जो मुद्दा उपस्थित केला आहे त्याबाबत मी अधिक खोलामध्ये जाऊ इच्छितो. मी आपल्याला आणि संबंधित अधिकाऱ्यांना बोलावून घेतो आणि जर तसे करणे शक्य असेल तर ते निश्चितपणे करण्यात येईल.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, . . . ..

**तालिका सभापती (श्री.विनायक मेटे)** : या विषयाच्या अनुषंगाने जास्त प्रश्न विचारता येणार नाहीत. केवळ एक किंवा दोन प्रश्न विचारता येतील.मघाशी माननीय मंत्री महोदयांनी उत्तराच्या भाषणामध्ये सांगितले की, ते याबाबतीत बैठक घेणार आहेत.त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.भगवान साळुंखे यांना देखील बोलाविण्यात यावे.

सभागृहाची बैठक आता स्थगित होत आहे. गुरुवार, दिनांक 12 एप्रिल 2012 रोजी सकाळी 10.00 ते 11.45 या वेळेमध्ये सभागृहाची विशेष बैठक भरेल. त्यामध्ये महाराष्ट्र विधान परिषद नियम 93 अन्वये प्रलंबित असलेल्या अर्धा तास चर्चा घेण्यात येतील. त्यानंतर सभागृहाची नियमित बैठक दुपारी 12.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक दुपारी 4 वाजून 23 मिनिटांनी, गुरुवार, दिनांक 12 एप्रिल 2012 रोजीच्या सकाळी 10.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

-----

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही